# माणूस

१ व १५ जुलै १९६६

चाळीस पैसे



## अधिक अन्नासाठी, अधिक पाण्यासाठी सव्वा लाखाचे प्रस्थान

## अवमूलन






वर्ष सहावे : अंक तिसरा-चौथा : १ व १५ जुलै १९६६

किंमत चाळीस पैसे : वार्षिक वर्गणी दहा रुपये

संपादक : श्री. ग. माजगावकर

पत्ता : ४१९ नारायण, पुणे २. : दूरध्वनी : ५७३५९.

'माणूस'चा यापुढील अंक

१५ ऑगस्ट १९६६

निवेदन पाहा—पृष्ठ २, ३, ४, ५

व मुखपृष्ठ ३

वर्गणीसंबंधी खुलासा १५ ऑगस्ट

अंकातच पाहावा.

—व्यवस्थापक

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' पाक्षिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# प्रस्थान....

तसा 'माणूस'चा सध्याचाच वाचकवर्ग
पन्नास-साठ हजारांच्या घरात असावा.
हा दुपटीने वाढविणे अशक्य आहे का?
अशक्य नाही.
अवघड मात्र आहे.

बंगाली, मल्याळी, व तामिळी इत्यादी प्रांतिक भाषांतून 'माणूस'च्या स्वरूपाची जी नियतकालिके प्रसिद्ध होतात, त्यांचे खप लाखाच्या घरात सहज असतात. मग मराठीतच हे का जमू नये! आज मराठी वाचकवर्ग झपाट्याने वाढतो आहे, विकत घेऊन साहित्य वाचण्याची प्रवृत्तीही दिसून येत आहे. मग मराठी नियतकालिकांचे खप दहा-वीस हजारांच्याच घरात का? याबाबत प्रगतीला खूप वाव आहे असे वाटते.

मात्र हेही खरेच, की वाचकांची संख्या वाढणे, अंकाच्या खपाचे आकडे फुगणे हे काही कोणत्याही नियतकालिकाच्या यशाचे मुख्य गमक समजता येणार नाही. खप हे साधन आहे, साध्य वेगळे असते— ज्याच्या-त्याच्या प्रकृतिधर्माप्रमाणे.

'माणूस'ची प्रकृती विधायक राजकीय–सांस्कृतिक आचारविचारांची आहे.

या दृष्टीने विचारप्रचाराचे कार्य गेली पाच वर्षे 'माणूस'ने यथाशक्ती केलेच आहे. पण यापुढे विचाराप्रचाराला आचाराचीही जोड द्यावी, उक्तीबरोबर कृतीही हातून घडावी यासाठी

## 'माणूस प्रतिष्ठान'

[माणूस फौंडेशन]

ही योजना पुढे येत आहे.
योजनेचे सध्याचे स्वरूप अगदी साधे आहे.

विक्री झालेल्या 'माणूस' अंकाच्या दर प्रतीमागे एक पैसा 'माणूस प्रतिष्ठान्'साठी वेगळा काढणे व अशा मार्गाने जमा झालेल्या निधीतून एखादे निकडीचे समाजोपयोगी कार्य सुरू करणे.

आज अन्नस्वावलंबनाची निकड आहे. निदान 'माणूस'ला असे वाटते, की आज या एका प्रश्नावर तरी मतभेद नसावेत, सर्व विरोध बाजूस सारले जावेत, सरकारी प्रयत्नांना पूरक ठरतील असे धान्योत्पादन वाढीचे उपक्रम व्यक्तीव्यक्तीने, गटागटाने, पक्षोपपक्षाने आपल्या हिमतीवर अंगावर घेऊन पूर्ण करावेत. स्वावलंबनाचे, स्वयंपूर्णतेचे देशव्यापी उद्दिष्ट साध्य होण्यासाठी अशा छोट्याछोट्या, लहानसहान, स्वयंप्रेरित उपक्रमांचेही खूप साहाय्य होऊ शकेल– निदान एक वेगळी हवा-तरी निर्माण होईल.

'माणूस प्रतिष्ठान'चे कार्य तरी प्रथम या दिशेने सुरू व्हावे असा प्रयत्न आहे. पुढचे पुढे. सध्या तरी महाराष्ट्रातला एखादा लहानसा दुष्काळी वा मागासलेला भाग निवडून, तेथे पाणीपुरवठ्याच्या काही योजना प्रत्यक्ष अंमलात आणणे, त्यासाठी अवश्य ते द्रव्यसाहाय्य व मनुष्यबळ उभे करणे हे 'माणूस प्रति-

ष्ठान 'चे पहिले कार्य राहील. एखाद्या तलावाचे किंवा तळ्याचे काम, काही विहिरी........असे हे स्वप्न आहे.

स्वप्न थोडे अधिक उघडायचे तर–

卐 आगामी शिवजयंतीपासून (एप्रिल ६७ चा सुमार) प्रत्यक्ष कार्याला सुरुवात व्हावी. तोपर्यंतचा काळ प्राथमिक चाचणी व चौकशीला लागणारच.

卐 आगामी गांधी जन्मशताब्दीला ( ऑक्टोबर १९६९ ) कामाचा योजलेला टप्पा पूर्ण व्हावा.

卐 म्हणजे २॥ वर्षांचा कालावधी. सरकारची पंचवार्षिक योजना. आपली छोटी २॥ वर्षांची.

卐 या २॥ वर्षांत किमान १। लाख रुपयांचा निधी या पाणीपुरवठा कार्यासाठी 'माणूस प्रतिष्ठान 'कडे जमा व्हावा.

卐 २॥ वर्षांत १। लाख रुपये म्हणजे महिना सुमारे पाच हजार रुपये.

卐 'माणूस' सध्या पाक्षिक असल्याने महिन्याचे अंक दोन. महिना पाच हजार म्हणजे दर पक्षाला–दर पंधरवड्याला– २॥ हजार रुपये.

卐 विकल्या गेलेल्या दर अंकामागे १ पैसा या हिशेबाने पाक्षिकाच्या २॥ लाख प्रती विकल्या गेल्या तरच दर पंधरवड्याला २॥ हजाराचा निधी जमा होऊ शकेल, शेवटी १। लाखाचा संकल्प पूर्ण होईल.

卐 पाक्षिकाचे २॥ लाख अंक खपणे हे सध्याच्या स्थितीत केवळ अशक्य आहे.

卐 मग महिन्यातून दोनऐवजी चार अंक काढले तर !

卐 पाक्षिकाऐवजी साप्ताहिकात 'माणूस 'चे रूपांतर केले तर!

卐 काम निम्मे झाले. दर आठवड्याला फक्त १। लाख प्रतींची विक्री.

अर्थात साप्ताहिक म्हटल्यावर 'माणूस'लाही आपल्या साहित्याची मांडामांड व सजवणूक अधिक जागरूकतेने केली पाहिजे हे उघड आहे. १। लाख वाचकांच्या घरात अंक पोचण्यासाठी तो अधिक रंजक, अधिक ताजा असणे अवश्यच आहे. आपली पातळी न सोडता ही रंजकता, हा ताजेपणा ठेवण्याचा 'माणूस'चा नेहमी प्रयत्न राहीलच.

चार कोटींच्या महाराष्ट्रात १। लाख मराठी वाचक नाहीत, की ज्यांना 'माणूस साप्ताहिका'चा व त्यातूनच उभ्या राहणाऱ्या 'माणूस प्रतिष्ठान'चा हा उपक्रम आवडेल, यात तनाने नाही तरी मनाने आणि धनाने विनायास सहभागी व्हावेसे वाटेल! आणि यासाठी कोणताही त्याग वाचकांकडून अपेक्षित नाही. फक्त 'माणूस'चा यापुढे दर आठवड्याला निघणारा अंक नियमितपणे विकत घेणे, आपल्या आवडीचे साहित्य विकत घेऊन वाचण्याची सुसंस्कृतपणाची खूण असलेली सवय लावून घेणे आणि या सरळ व्यवहारातूनच एका चांगल्या निकडीच्या कार्यालाही चालना देणे– काय यात कठीण आहे?'

*आणि कठीण असो वा नसो! 'माणूस'ने 'सव्वा लक्ष' निधीचा संकल्प योजला आहे, त्या दिशेने प्रस्थान ठेवले आहे. भारताची अन्नसमस्या केवढी? त्यात 'माणूस'चा हा प्रयत्न म्हणजे 'दर्यामें खसखस'देखील नाही. नसेल. हा एवढासा अतिसूक्ष्म संकल्पही सव्वा लाख मराठी ग्राहक 'माणूस'ला लाभले नाहीत तर पूर्ण होणार नाही. न होऊ दे! काहीतरी तर होणारच. रामायणातल्या त्या छोट्या खारींने कुठे विचार केला होता, की आपला जीव केवढा, समुद्र केवढा आणि त्यावर पूल बांधण्याचे काम केवढे! ती आपली अंगावर मावेल एवढी काठावरची वाळू समुद्रात नेऊन भरत होती, सेतुबंधन कार्यात आपणही आहोत, या आनंदात चूर होती. हे भाग्यही नसे थोडके.*

—संपादक

# विचार धारे

समीर

## □ नागरी जीवनाचे पैलू

वास्तुकार (आर्किटेक्ट) आणि इंजिनीयर यांनी भरपूर उजेड, मोकळी हवा आणि मुलांना खेळायला पुरेशी जागा यांच्याकडे नीट लक्ष पुरविले तर 'स्कायस्क्रेपर' मध्ये आनंदात राहता येते असे, मत कु. मार्जरी बर्गर या अमेरिकन नगररचनातज्ज्ञाने नुकतेच दिल्लीला प्रगट केले. शिकागोला ४० मजल्यांच्या इमारतीत राहणाऱ्या या बाई २२ प्रसिद्ध आर्किटेक्ट आणि नगररचना-तज्ज्ञांच्या प्रमुख म्हणून टोकियोला एक आंतरराष्ट्रीय गृहरचना-परिषदेला गेल्या होत्या तेथून परतताना दिल्लीला थांबल्या होत्या. त्यांच्या मते कदाचित् लहान मुलांच्या दृष्टीने गगनचुंबी इमारती सोयीच्या वाटल्या नाहीत तरी अविवाहित स्त्री-पुरुष आणि अपत्यहीन जोडपी यांच्या दृष्टीने त्या निश्चित सोयीच्या आहेत.

त्या म्हणाल्या, भारतातील व अमेरिकेतील आर्किटेक्ट व नगर-योजनाकारांच्या समोर खूपच सारख्या समस्या आहेत. दोन्ही देशांत लोकसंख्येचा लोंढा खेड्यांकडून शहरांकडे वाहत आहे, आणि दोन्ही देशांत वाहतुकीची व घरांची तूट आहे, ज्यांच्या डोक्यावर अजिबातच छप्पर नाही असे लोक अमेरिकेत नसले तरी किमान दर्जाच्या खाली असणारी अनेक घरे आहेत. अमेरिकेतल्या लोकसंख्येपैकी एक-पंचमांश जनतेला चांगल्या घरांची आवश्यकता आहे. हिन्दुस्थानप्रमाणे अमेरिकेतही घाणेरड्या वस्त्यांच्या सफाईची चळवळ जोरात आहे. प्रत्येक कुटुंबाला किती चौरस फूट जागा स्वत:साठी मिळते याला अमेरिकन माणूस फार महत्त्व देतो.

कु. बर्गरने स्कायस्क्रेपरचे गुण गाईले, तर बेहरूज सिनिसी या तुर्की आर्किटेक्टनी त्याच्या विरुद्ध मत दिले, त्यांनी बांधलेली अंकारा विश्वविद्यालयाची प्रेक्षणीय इमारत पाहून प्रभावित झालेले डॉ. झकीर हुसेन यांनी तेथल्या तेथे सिनीसींना भारत-भेटीचे आमंत्रण दिले होते व त्याचा स्वीकार करून सिनिसी भारतात आले आहेत. सिनिसींच्या मते स्कायस्क्रेपर इमारती फार तंत्रप्रधान वाटतात. त्यांनी शहराची 'आकाशरेषा ( "सिल्हूट" ) बिघडते, त्यांच्या भोवतालच्या दृश्यांशी मेळ नसतो, आणि मुख्य म्हणजे त्यांच्यामुळे माणसाच्या मनांत खुजेपणाचा न्यूनगंड निर्माण होतो. आपल्या डिझाइनच्या द्वारे घरातल्या हवामानावर नियंत्रण ठेवणे हे आर्किटेक्टचे काम असते. घरातले हवामान नियंत्रित करण्यासाठी जी यांत्रिक साधने वापरावी लागतात, त्यांच्यावर अवलंबून राहावे लागू नये, निदान शक्य तेवढे कमी अवलंबून राहता यावे असे घर बांधणे यात चांगल्या आर्किटेक्टची परीक्षा असते.

दिल्लीतील वास्तूबद्दल मत काय? उत्तर : इस्तंबूल या सर्वांत सुंदर तुर्की शहरात वास्तुकलेचा विकास एका विशिष्ट दिशेने होत असलेला दिसतो व त्या शहराची सर्वंकष वाढ व्हावी असा बुद्धिपुरस्सर प्रयत्न दिसतो तसे नव्या दिल्लीत दिसत नाही. त्यातल्या त्यात विचित्र गोष्ट म्हणजे नवी दिल्ली व जुनी दिल्ली या दोन शेजार शेजारच्या शहरांची वाढ अगदी विरुद्ध प्रकारांनी होऊ देण्यात येत आहे. नव्या दिल्लीत रचनेचा काही तरी प्रयत्न आहे, जुनी दिल्ली म्हणजे सावळा गोंधळ आहे.

कु. बर्गरबरोबरच्या मंडळींत साल्वाडोर पडिल्ला हे पोर्टोरिकोचे नगररचनातज्ज्ञ होते. ते दिल्लीतल्या वाहन प्रकारांची कमालीची विविधता पाहून थक्क झाले. त्यांच्या मते वाहतुकीची सुबद्ध व्यवस्था हे नगररचना कार्यक्रमाचेच एक अविभाज्य अंग आहे. बस आणि रेल्वे या दोन सामान्य वाहतूक साधनांकडे प्रत्येक शहरात अधिक लक्ष पुरवावे लागेल. आदर्श कल्पना करायची म्हणजे प्रत्येकाला आपल्या कामाच्या जागी चालत जाता येईल अशी नगररचना हवी.

प्रत्येक देशातल्या वास्तुशास्त्राची तेथले हवामान व तेथली संस्कृती यांच्याशी सांगड घालण्यासाठी संशोधन झाले पाहिजे. उदाहरणार्थ, जपानमध्ये एकाच खोलीचा बैठकीची खोली, जेवण्याची खोली व शय्यागृह म्हणून उपयोग करता येतो. तेव्हा तेथल्या घरांची रचना इतर देशांतल्या घरांपेक्षा साहजिकच निराळी असणार. हल्ली सर्वत्र लोकप्रिय झालेली वास्तुकला ही माफक हवामानाच्या पाश्चिमात्य देशाला साजेल अशी आहे. विषुववृत्तीय देशाला अनुरूप अशी वास्तुकला अजून तयार व्हायची आहे.

## □ आफ्रिका-चीन घटस्फोट

सुमारे दोन वर्षांपूर्वी चीनने आफ्रिकेत चंचुप्रवेश करण्याचा प्रयत्न केला. आणि त्या वेळी बरेचसे आफ्रिकन नेते चीनच्या मायावी स्वरूपाला बळी पडले होते; पण चिनी भस्मासुराने आपले खरे स्वरूप प्रकट केल्यापासून आफ्रिका तितकी भोळी राहिलेली नाही, असे मत दक्षिण आफ्रिकेतल्या जोहान्सबर्ग येथील 'संडे टाइम्स' चे एक राजकीय वार्ताहर श्री. सर्फाँटीन यांनी नुकतेच दिल्लीत बोलून दाखविले. 'आता आफ्रिकेत क्रांतीला योग्य अशी वेळ आली आहे' या चाऊ–एन्–लायच्या या प्रसिद्ध घोषणेचा उलटा परिणाम होऊन निरनिराळ्या आफ्रिकन देशांत ज्या आठ क्रांत्या पाठोपाठ झाल्या त्यांतल्या सहा तरी चीनच्या विरुद्ध होत्या. आफ्रिकेला प्रथम चीनबद्दल जे प्रेम वाटले ते गोऱ्यांना तोंड देण्यासाठी पिवळ्यांनी व काळ्यांनी एक व्हायला हवे या भावनेतून निर्माण झाले होते. पण पिवळ्यांनी आपले खरे 'लाल' स्वरूप दाखविल्यावर ते ओसरले. पौर्वात्य चीनच्या कारवायांमुळे आता आफ्रिकन मतप्रवाह पश्चिमेकडे निश्चित वळला असला तरी पाश्चिमात्य भांडवलशाहीला आपण बळी पडता कामा नये, याची जाणीव आफ्रिकेच्या देशांत दिसून येते. •



# ग्यानबाचं गुऱ्हाळ

## □ ‘ कारागीर ’ हा कुशलच असतो !

आजकाल कोणत्या प्रश्नावर वादंग माजेल याला काही धरबंदच नाही. परवाची मुंबईचीच गोष्ट; लेबर कमिशनरसमोर असाच प्रश्न चर्चेला आला. दुकानातले ‘कारागीर ’ हे कुशल की निमकुशल ? मालकांचे म्हणणे ते निमकुशल, तर कारागिरांच्या संघटनेचे म्हणणे ( अर्थातच ) आम्ही कुशल. तुम्ही म्हणाल, हा वाद झालाच सुरू कशासाठी ? कारण उघड आहे. किमान वेतनसमितीच्या शिफारशी नुकत्याच जाहीर झाल्या आहेत. त्यात कुशल कामगारांना वेतन ओघानेच जास्ती दिलेले आहे. निमकुशल कामगारांना कमी आहे. प्रश्न असा की, दुकानात काम करणारा ‘ नाभिक ’ हा यांपैकी कोण ? पैशासाठी दुकानाच्या मालकांनी त्यांना निमकुशल ठरवून टाकले. साहजिकच भांडणाचा प्रसंग आला. कारागिरांचे शिष्टमंडळ मजूर मंत्र्यांना भेटले. शेवटी लेबर कमिशनरनी दोघांचीही संयुक्त बैठक बोलाविली. या बैठकीत काय झाले याचा वृत्तांत अद्यापि समजलेला नाही, असे मजूरमंत्र्यांनी सांगितले. मजूर मंत्री म्हणतात की, माझे किंवा सरकारचे मत काही कारागिरांना निमकुशल मानावे असे नाही, निकाल लवकरच लागेल.

ते जाऊ द्या. मला मात्र ही सगळी बातमी वाचून वाईट वाटले. कारागीर हा केवढा महत्त्वाचा प्राणी. त्याला आपले निमकुशल ठरवायचे म्हणजे काय ! मालकांचा लुच्चेपणा· दुसरे काय. ‘ अहो, कारागीर हा निमकुशल कधीच नसतो असे माझे मत आहे. तो कुशलच असतो. संत सेना न्हावी यांनी एके ठिकाणी म्हटले आहे–– “ आम्ही बारिक बारिक ! करूं हजामत बारिक बारिक. ” बारिक हजामत करणारा बारिक ही काय साधीसुधी असामी आहे ? फार कौशल्याचे काम असते ते. येरा गबाळाचे काम ते नव्हेच. नव्या माणसाला आधी गाडग्याला चुना लावून किंवा करवंटीला चुना लावून तो साफ काढण्याची प्रॅक्टिस करावी लागते. मग महिषींचा देह साफ करण्यात काही वेळ घालवावा लागतो. असे होता होता बारीक हजामत हा प्रकार जमतो. माणसाचे डोके जेव्हा हातात येते तेव्हा कारागीर हा खरोखर ‘ कुशल कारागीर ’च झालेला असतो हे सरकारने लक्षात घ्यावयास पाहिजे. परवाच एक चुटका वाचला. गिऱ्हाईक पांढरा कपडा परिधान करून खुर्चीवर बसले होते. कारागीर त्याचे केस कापीत होता. खाली खुर्चीच्या

पायाशी एक कुत्रे आशाळभूतपणे तोंड वर करून बसलेले होते. गिऱ्हाईकाला काही समजेना, हे कुत्रे का असे वर तोंड करून बसले आहे ? शेवटी कामगारांलाच विचारले, तेव्हा हातातली कात्री चिपळयासारखी वाजवीत कारागिराची स्वारी गंभीरपणे म्हणाली, "त्याचं काय आहे साहेब, कानाजवळचे केस मी कापतो ना, त्या वेळी एखाद्या वेळी कानाचाच तुकडा पडतो तुटून खाली. त्यासाठी बसलंय ते "– असा कारागीर जर तुम्हांला भेटला तर कसे होईल सांगा पाहू....

मागे श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी 'हजामतीची नीतिमिमांसा' नावाचा एक लेख लिहिला होता त्याची आठवण झाली. कारागीर हा कुशलच हे मत त्यांनादेखील मान्य असावे असे वाटते. त्यांनी लिहिले आहे की, कारागीर हा नुसता कारागीर नसतो तर श्रेष्ठ कलावंत असतो. किंबहुना चित्रकला, गायन, इ. अनेक कला त्याच्या ठायी एकत्र झालेल्या असतात. चित्रकार नाही तरी काय करतो ? कुठला तरी फलक घेऊन त्यावर रंगाच्या दहाबारा रेघोट्या ओढतो की झाले ! मग कारागीरसुद्धा तेच करतो. तुमचे डोके धरून वस्तऱ्याने दहापाच ठिकाणी कापून रक्ताच्या रेघोट्या काढतो. यावरून चित्रकला त्याला येते ही गोष्ट आपोआप सिद्ध होते. गायन कलेचेही ज्ञान त्याच्याजवळ असते. गवई मारे आपले डोके इकडे तिकडे हलवून हलवून मोठमोठ्यांदा आरडतो ओरडतो. यालाच गायनकला म्हणतात. मग कारागीर तरी यापेक्षा वेगळे काही करतो काय ? स्वतःच्या डोक्याऐवजी तो गिऱ्हाइकाचे डोके घेतो आणि ते वाटले तसे फिरवतो इतकेच आणि त्याच्याऐवजी ते गिऱ्हाईक वेडेवाकडे आरडते ओरडते एवढाच फरक. पण बाकीचे साम्य लक्षात घेतले तर त्यास गायन कलेचे ज्ञान अवगत असते असे म्हणायला काय हरकत आहे ?...

— मुद्दा एवढाच की, कारागीर हा कुशलच. जास्त वाद करू नका. शेवटी आपले डोके त्याच्याच हातात आहे हे लक्षात असू द्या !

## □ कानडीने केला मराठी भ्रतार

'महाराष्ट्र आणि म्हैसूर सीमातंटयाबाबतची वस्तुस्थिती' या नावाची एक पुस्तिका म्हैसूर सरकारने प्रसिद्ध केली आहे. या पुस्तिकेत म्हैसूर राज्याचा नकाशा आहे. या नकाशात गोव्याचा समावेशही म्हैसूर राज्यात करण्यात आला आहे. ही पुस्तिका म्हैसूरचे अर्थमंत्री श्री. रामकृष्ण हेगडे यांनी परवाच दिल्लीच्या पत्रकारांना वाटली. पत्रकारांनी नकाशा पाहिला तो गोव्याचा समावेश म्हैसूरमध्ये केलेला. गोव्याचे भविष्य अजून ठरायचं आहे. त्याआधीच आपण हे नकाशावरील आक्रमण कसे काय केले असा प्रश्न कुणीतरी रामकृष्णसाहेबांना विचारला. तेव्हा रामकृष्णसाहेब म्हणाले, "आम्ही विचार करूनच गोष्ट केली आहे म्हटले !

गोव्याचा समावेश जर म्हैसूरमध्ये आम्ही केली नाही तर काय होईल माहीत आहे ? हे महाराष्ट्रीय लोक म्हणतील की, गोव्यावरचा महाराष्ट्राचा अधिकार म्हैसूर राज्याने मान्य केलेला आहे ! ”

श्री. हेगडे यांनी वृत्तपत्र प्रतिनिधींना हे जे मार्मिक उत्तर दिले ते पाहून माझ्यासारख्या मान्य माणसाला किती उचंबळून आले असेल आणि हेगडे यांच्या बुद्धिमत्तेबद्दल किती आदर वाटला असेल याची कल्पनाच केलेली बरी. एखादा लहानसा पण नेमका प्रश्न कुणी विचारला तर माझी बोबडी वळते, काय उत्तर द्यावे हे सुचत नाही. हा तर केवढा बोचक अन् खवचट प्रश्न. पण हेगडे आमचे काय बोलले आहेत पण ! मराठीच काय पण कानडी माणसानेही तोंडात बोट घालावे. ‘ अडगुलं मडगुलं... ’ हे मूळचं कानडी गाणं आहे तेच म्हणावे अन् या बाळाचे कौतुक करावे असेही मला प्रेमाने वाटले. वाहवा, काय अर्ग्युमेंट आहे ! काय युक्तिवाद आहे. ‘ हे स्थानिक स्वराज्य ’ नाटकातली घेनुवल्लभ खूष होऊन ‘ पांढऱ्या, पांड्या, अरे बालिस्टर का नाहीस ?’ असे म्हणत असतो त्याची आठवण झाली. त्याच चालीवर काय म्हणता येईल हेही डोक्यात आले. पण ते जाऊ द्या. विषयांतर नको उगीच.

बाकी एवढी गोष्ट खरी की, मुद्दा अगदी समर्पक. म्हैसूरमध्ये गोवे दाखवले नाही तर हे दुष्ट मराठी लोक टपलेले आहेत त्याचा फायदा घ्यायला. ते लगेच किंचाळून उठतील आणि म्हणतील, “ बघा ! गोव्यावर आपला काही हक्क नाही हे म्हैसूरला मान्यच आहे. मग राहिलो आम्हीच. तेव्हा सरळ गोव्याचे महाराष्ट्रात विलीनीकरण करून टाका पाहू. ” हा धोका पत्करावाच कशाला ? अस्वलाआधी आपली आरोळी असावी, मागाहून काय व्हायचे ते होईल सावकाश. चीनचे चौ-एन-लाय, पाकिस्तानचा आयूबखान या थोर मंडळींची खरी ही कल्पना. चीनच्या नकाशात सगळा हिमालय, नेपाळ, भूतान, नेफा हे सगळे प्रदेश चीनचेच दाखवले आहेत म्हणतात. पाकिस्तानच्या नकाशात सबंध काश्मीर पाकिस्तानात घातलेले आहे सांगतात. थोरामोठ्यांचे अनुकरण आपोआपच होते, शत्रू असले म्हणून काय झाले ? शत्रूपेसुद्धा चांगले गुण घ्यायला काय हरकत आहे ? आमच्या मुत्सद्देगिरीचे दिवाळे वाजले आहे असे म्हणता ना ? घ्या हे चोख उत्तर म्हणावे. म्हैसूर सरकारने मुत्सद्देगिरीची कशी शर्थ केली हे पाहा आणि लाजेने (असेल तर) माना खाली घाला लेको.

हेगड्यांसारख्या बुद्धिमान मनाला माझ्यासारखा गबाळा माणूस काय सांगू शकणार ? पण सहज आपले सांगावे म्हणून सांगतो. म्हैसूर सरकारने केवळ गोवे आणि बेळगाव-निपाणी-कारवार यांचा समावेश नकाशात करून थांबू नये. शक्य झाल्यास सबंध महाराष्ट्रच म्हैसूरच्या नकाशात घालून टाकावा. तसे थोडेफार पुरावेही (पाहिजेच असल्यास) मिळतील. पंढरपूरचा विठोबा पूर्वी विजयनगरच्या

राजाने विजयनगरला नेला होता म्हणतात. विजयनगर, हंपी म्हणजे कर्नाटकच. ' विठ्ठल कानडा ' असा संतवाङ्मयात उल्लेखच असल्याचे माझ्या शेजारच्या विद्वान प्राध्यापकांनी सांगितले. ( हो. मी पुण्यांत राहतो. त्यामुळे माझ्या चारी बाजूंस साहित्यिक आणि प्राध्यापक यांचीच दाट वस्ती आहे, ते असो. ) या मुद्यावर विठोबावर हक्क सांगायला काय हरकत आहे ? नकाशात विठोबा विजयनगरला दाखवावा म्हणजे झाले ! नाहीतर पंढरपूर कर्नाटकात दाखवावे. फारसे अवघड नाही. सोलापूरवर हक्क सध्या आपण दाखवतोच आहोत. थोडीशी आणखी मुसंडी आत मारायची इतकेच ! महाराष्ट्राच्या अनेक भागांत कानडी लिपीत शिलालेख सापडतात. तो भाग पूर्वी ' कानडा ' होता हे यावरून स्वच्छ दिसते. तोही प्रदेश नकाशात ढकलावयास काय हरकत आहे ? ( अमेरिकेतला ' कॅनडा ' या देशावर-देखील या पद्धतीने हक्क सांगता येईल का ? हेगडे आज मंडळींनी विचार करावा. संयुक्त राष्ट्रसंघाकडे अर्ज तरी करून टाका. हां, तूर्त नकाशात मात्र कॅनडा हा म्हैसूरचा भाग असल्याचे दाखवून ठेवा. पुढचे पुढे !

आणि मराठीतल्या कानडी शब्दांचे काय ? शब्द कानडी आणि महाराष्ट्राने ते खुशाल आपले म्हणून वापरायचे म्हणजे काय ? हा धडधडीत अन्याय आहे. दडपे-गिरी आहे. ' अडकित्ता ' हा शब्द कानडी. ' आप्पा ', ' आण्णा ', ही नावे कानडी, एक का दोन, शेकडो शब्द आहेत. ज्ञानेश्वरीत तर किती तरी कानडी शब्द आहेत. म्हैसूर सरकारने आता एक गोष्ट करावी, प्रदेशाचा नकाशा जसा प्रसिद्ध केला तसाच भाषेचाही कोश प्रसिद्ध करावा. त्यातले कानडी शब्द कुणी मराठीत वापरीत असतील तर त्यास कडाडून विरोध करावा. अप्पा, आण्णा सगळे बंद. तरच हे माजोरी मराठी लोक शुद्धीवर येतील आणि निमूटपणे तडजोड करतील. म्हैसुरी मुत्सद्दी गप्प आहेत म्हणून ठीक आहे. एकदा का ते अन्यायाविरुद्ध चिडले म्हणजे कोणाला भ्यायचे नाहीत. असे झाले तरच हा प्रश्न मिटेल हे त्यांनीही लक्षात ठेवावे नाहीतर कानडीने केला मराठी भ्रतार ! एकाचे उत्तर एक येते, ही सध्याची अवस्था अशीच चालू राहील.

## □ सांगलीच्या गल्लीत ' नापास क्लब '

ही नवीन बातमी तुम्ही वाचलीत की नाही ? सांगलीला नापास होणाऱ्या श्रीमंतांच्या मुलांनी वखार भागात ' नापास क्लब ' नावाचा एक स्वतंत्र क्लब स्थापन केला आहे. या क्लबचे कार्यक्रम पूर्वी खाजगी व्हायचे. पण परवा-म्हणजे दि. १९ जूनला या क्लबाने एक सार्वजनिक कार्यक्रम केला. त्याच्या निमंत्रण-पत्रिकाही काढण्यात आल्या होत्या. आता तुम्ही म्हणाल, हा कसला क्लब ? त्याला काही घटना, नियम वगैरे आहेत की नाहीत ? कुणाला या संस्थेचा समासद व्हायचे असेल तर काय करायचे ?... आहेत. या क्लबलाही स्वतःची

घटना, नियम सगळे काही आहे. हे नियम थोडक्यात सांगावयाचे म्हणजे असे, ' (१) कमीत कमी मार्क मिळून जे नापास झाले असतील त्यांना अग्रस्थान. (२) कुणी एखादा कॉपी करताना पकडला गेला आणि त्यामुळे नापास झाला तर त्याला एकदम कार्यकारी मंडळींवर स्थान. (३) अभ्यास झाला नाही म्हणून कुणी ड्रॉप घेतला तर सदस्यत्व मिळणार नाही. (४) प्रत्येक सदस्याजवळ स्कूटरसारखे एखादे तरी वाहन असणे आवश्यक आहे. (५) पास होण्याची शंका आलीच तर सदस्याने चुकूनही त्या गोष्टीचा कोठे उच्चार करायचा नाही. (६) चुकून एखादा बहाद्दर गडी पास झालाच तर त्याचा निषेध करून त्याचे सभासदत्व रद्द करायचे.

कुठल्याशा वर्तमानपत्रात बातमी वाचली आणि मन कसे समाधानाने काठोकाठ भरून गेले. या लोकशाहीच्या काळात कुणीही संघटना करावी आणि आपले प्रश्न सोडवावेत असे आपण तोंडाने बोलतो फक्त. प्रत्यक्ष काही करीत नाही. मूर्खांनादेखील मूर्खपणा करण्याचा हक्क असणे यालाच लोकशाही म्हणतात. मग नापासांना तो अधिकार का बरे असू नये ? सांगलीच्या मुलांनी 'नापास क्लब' काढला या गोष्टीला माझ्या दृष्टीने फार महत्त्व आहे. अशा संस्था गावोगाव निघाल्या पाहिजेत आणि त्यांची भरभराट झाली पाहिजे. तरच निकोप लोक-शाहीची वाढ या देशात होईल.

नापास क्लबने आपली जी घटना आणि नियम तयार केले आहेत ते तर फारच मार्मिक आहेत. याला म्हणतात घटना. घटनातज्ज्ञांनीसुद्धा धडे घ्यावेत असा बारकावा या नियमांत आहे. नुसते नापास होणे याला काही फारशी अक्कल लागत नाही. चुकून पस्तीसाच्याऐवजी तीस मार्क पडले की झाली नापास. त्यात विशेष काय आहे ? पण कमीत कमी मार्क मिळवून नापास होणे याला बुद्धिमत्ता लागते. ते 'श्रेष्ठ वरिष्ठ' अंगी असणाऱ्यास अग्रस्थान मिळाले पाहिजे हा नियम किती सूक्ष्म आहे बरे, निवडणुकीत तिकिटांच्या वाटपाच्या वेळी उमेदवार कमीत कमी शिकलेला असावा अशी जशी काँग्रेस पक्षाची अट असते तसेच हे आहे. मॅट्रिक झालेल्या उमेदवारापेक्षा मराठी चौथी झालेल्या उमेदवारास जशी प्रथम पसंती मिळते त्यातलीच गोष्ट. तीस गुण मिळवून भुक्कड रीतीने नापास होण्यापेक्षा शून्य किंवा एकदोन गुण मिळणे आणि नापास होणे यात प्रतिष्ठा आहे. (एकदोन गुणतरी म्हणण्याचे कारण काही वेळेस तेवढे गुण निरुपायाने पडतात. काही परीक्षांत स्वच्छता आणि टापटीप यांसाठी चारपाच गुण राखून ठेविलेले असतात. काहीच पेपरात न लिहिल्यास पेपराची अंतर्गत स्वच्छता आणि टापटीप चांगली राहते आणि मग एखादा दुष्ट परीक्षक एकदोन गुण देऊन मोकळा होतो. असो.) उत्तर मुद्दा असा की अशा प्रतिष्ठित नापास पोरास अग्रस्थान मिळणे रास्त आहे. कॉपी करताना एखादा सापडला आणि त्यामुळे नापास झाला तर त्याची योग्यता केव्हाही मोठी. अशा पुरुषोत्तमास लगेच कार्यकारी मंडळात स्थान द्यावे ही

सूचेना मौलिक नाही असे कोण म्हणेल ? क्लबाच्या अध्यक्षाबद्दल काय तरतूद घटनेत आहे ते काही कळले नाही. पण त्या बाबतही काहीतरी नियम पाहिजेत. कॉपी गुपचूप करूनही नापास होणारा आणि एकेका वर्गात किमान तीनतीन वर्षे राहणाऱ्या विद्यार्थी-पुंगवास हे स्थान देण्यात यावे अशी माझी शिफारस आहे. क्लबाच्या घटनापटू विद्यार्थ्यांने विचार करावा.

समासदत्व रद्द करण्याबाबतचे नियमही उत्कृष्ट आहेत. अभ्यास झाला नाही म्हणून कुणी ड्रॉप घेतला किंवा कुणी चुकून पास झाला तर त्याचे समासदत्व रद्द करण्यात यावे ही तरतूद योग्यच आहे. मी तर म्हणतो की, कुणीही अभ्यासाचे पुस्तक हाती धरता कामा नये असाच स्वच्छ नियम असावा, हो, म्हणजे चुकून काही पाने, वाचली ती लक्षात राहिली आणि बेसावधपणे उत्तर लिहून पास झाला अशी आपत्तीच कुणावर ओढवली जायला नको; कर्तृत्वाने ध्येयवाक्य त्या दृष्टीने ठरवून टाकावे. 'पास होना हराम है' अभ्यास हटाव' 'यतो वा प्राप्स्यसि स्वर्गं।' ही किंवा यांसारखी बोधवाक्ये या मंडळीने क्लबात ठळक अक्षरात लावून ठेवावीत. अधिक काय सांगावे ? राख शिपलेच वर जातात राने मात्र सागराच्या तळाशीच असतात हा न्याय सर्वांनाच टाऊकच आहे.

– ग्यानबा

---

## ▫ झोपेचे 'कीर्तन'

कथा–कीर्तनाला गेले की झोप ही हटकून यायचीच, किंबहुना कथा-कीर्तन हा निद्रानाशावर रामबाण उपाय आहे, असंही काहींचं म्हणणं आहे.

हे असं का होतं....


कुंभकर्ण व निद्रा यांचा संबंध सर्वांनाच माहीत आहे.. पण... राम–रावण युद्धांत कुंभकर्णाच्या वधानंतर त्याच्या इतर राण्यांप्रमाणेच निद्रा देवीलाही वैधव्य प्राप्त झालं.

विधवा झालेल्या निद्रादेवीनं रामाला आता मी काय करू असं विचारलं. त्यावर 'कथा-कीर्तन श्रवण करून आपलं आयुष्य सार्थकी लाव, असं रामानं तिला सांगितलं. तेव्हापासून ती कथाकीर्तनास नियमितपणे येऊ लागली.

पण... यौवन व आसुरी वृत्ती त्यामुळे ती कथेला येते; ती थेट पुरुषांत बसते. येताना विचारते मी येऊ का ? मी येऊ का ? व बिचारे पुरुष स्त्रीदक्षिण्यामुळे मानेनेच या या म्हणून तिला खुणावतात. तीही व अगदी मांजरांच्या पावलान येऊन अगदी अल्लद न कळत त्याच्या गळयात पडते.

–चिंता थोरात

---



शां ता रा म

" नकटे, का का आणलं वो आज ? "
आजोबांनी खरंच नकटया व तोंडानं खाष्ट आजीला असं म्हणावं न् आजीनं लाजेनं मुरकावं —
सुख सुख म्हणतात ते हेच असेल का ?

आमचं गाव नागपूर, खास.

माझ्या वयाची सुरुवातीची बरीच म्हणजे जवळजवळ सतरा-अटरा वर्षं तिथेच गेलीत. नंतर मी बरंच बाहेरचं जग पाहिलं पण जे नागपुरात पाहिलं अन् अनुभवलं ते कुठंच आढळलं नाही. नागपूर हे विविध वैशिष्टयाचं असं गाव. येथे रोजच बाजार भरतो, बदलत्या पेठात. पेठांची नावंसुद्धा दिवसांच्या नावांप्रमाणं आहेत. बुधवारी बुधवारीत बाजार भरायचा अन् तो आमच्या घरापासनं जवळ. आजी नेमानं त्या बाजारात जायची. मी अगदी लहानपणापासून तिच्याच अंगाखांद्यांवर खेळलो. माझ्याशिवाय ती कुठेच जात नसे. मी अगदीच लहान म्हणजे दहा वर्षांचा असेन तेव्हाची गोष्ट......

मी बाजारात तिच्या मागे मागे चाललो. ती क्वचित मागे वळून पाहायची. बरंच पुढं गेल्यावर तिच्या लक्षात आलं की, नातवानं ब्रोट धरलेलं नाही. तिनं इकडे तिकडे पाहिलं, थोडी बावरल्यासारखी झाली अन् भर रस्त्यात गळा फाडून ओरडली, " कोठी गेला रे, हाडी हेपीच्या ? " हेही आमच्याच गावचं वैशिष्टय... ही भाषा, ह्या शिव्या क्वचितच कुठे ऐकायला मिळतील. मी आजीला ' बय्या ' म्हणत असे. धावतच जाऊन मागनं तिचा पदर धरला अन् म्हणालो—

" कायले बोंबलतेवो, बय्या—मी का मेलो ?"

" नायरे बापा, मले भेव लागला; कोठी तू भूल्शीन् गिल्शीन् !"

आमच्या घरात आमची आजीच सगळं पाहायची. भाजीपाला, धान्य, लाकूड, कपडालत्ता, सगळा तीच आणायची. आमची आई किंवा काकू ह्यांना घरात काम करण्यापेक्षा दुसऱ्या भानगडीत वा कारभारात लक्ष घालायची मुभा नव्हती. आजी घरात राहिली म्हणजे घर कसं चुपचाप लपून बसल्या मांजरासारखं वाटायचं...



पण एकदा का कुठे ती बाहेर गेली म्हणजे सगळ्या एका ठिकाणी बसायच्या अन् आजीच्या बाबतीत काही काही बोलायच्या. त्यांच्या बोलण्याचा विषय म्हणजे आमची आजीच. माझी सकाळची शाळा राहायची व आई-काकूबरोबर दुपारच्या जेवणाला मी राहतच असे. त्यांना जेवायला बरोबर दोन तास लागत. जेवताना त्यांच्या गोष्टीच चालायच्या अन् मी पटकन् जेवण आटोपून कान देऊन त्यांच्या गोष्टी ऐकत बसत असे.

आमची बय्या पण बरीच धोरणी होती. बाजारात जाताना मला म्हणाली—
" अरे गुलाब्या, तुझी माय अन् काकी का का बोलत्येत् रे ?"

" काईबी नाई. "

तेवढ्यावरच चूप बसेल अशी आमची आजी नव्हती.

थोडं पुढं जाऊन ती थांबली, कमरेला खोचलेली पिशवी काढली अन् माझ्या हातावर तिनं तिच्या कपाळावर असलेल्या कुंकवाएवढा ढब्बू (जुना पैसा) ठेवला. मग मात्र माझ्याच्यानं खोटं बोलणं होत नसे. शाळेतल्या मास्तरांनी ' जीव गेला तरी खोटं बोलू नये ' अशा कोणत्यातरी गोष्टीचं तात्पर्य सांगितल्याचं आठवलं अन् मी मनात म्हणतच होतो, आता आजीनं विचारलं तर सगळं सगळं खरंखरं सांगून टाकायचं. थोडं पुढं जाऊन ती म्हणालीच — " का रे, का म्हणत व्हत्या ते मट्वाया ?"

मी सगळं सगळं—खरंखुरं—जसं ऐकलं तसंच सांगून टाकलं.

बाजार लागताच तिनं मुरमुऱ्याचे ... ( हां. आमच्या नागपुरात कुरमुऱ्याला मुरमुरे म्हणतात. ) तीन लाडू घेतलेत. " घे, खाऊन टाक. " म्हणत दोन मला दिल्लेत व एक स्वत: खाल्ला.

नील सिटी हायस्कूलपासूनच बाजाराला सुरुवात व्हायची. इथंच जुन्या–पुराण्या सामानाची दुकानं होती. अशाच ठिकाणी जुनी पुस्तकं पाहण्यात माझ्या आयुष्याच्या बऱ्याच घटका घालवल्यात मी.

मी म्हणालो—" बय्या, तू बाजार घेऊन ये—मी पुस्तका पायतो. "

" का पाव्हाच्या हायेत् रे पुस्तकाऽ ऽ राऊ दे. "

" नाई, कवाकवा चांगल्या पुस्तका येतेत् का वो ऽ ऽ "

तरी ती म्हणाली, " चाल् रे, पयले भाजल्या मासऱ्या घेवाले जाऊ "...झालं ! आम्हांला कोणी जग दिलं असतं तरी भाजल्या मासोळीपुढं फिक्कं. नाव घेताच तोंडाला पाणी सुटलं. " भाजल्या मासऱ्या ' हीपण आमच्या गावाकडचीच स्पेशॅलिटी. आता मी मुंबईत राहतो पण मासळी खाऊन खाल्ल्यासारखी वाटतच नाही. भाजल्या मासळ्या दर्शनाला इकडे दुर्लभ . आमच्याकडच्या मासळीची चव पण आगळीच.

बय्या मार्केटाला ' मार्पीट ' म्हणायची. ' आला र ... मासऱ्याचा मार्पीट, पाय्... पाय् न मासऱ्या ?" म्हणतच तिनं कोळिणीपुढं ठेवलेल्या वाटचातून एक मासळी काढली व तिथंच मला खायला दिली. " ब्येस् लागत्ये वो, " म्हणतच मी मासळीची जळकी साल काढून फेकली, मधल्या काट्यापर्यंतचा नरम गुदा गपकन् तोंडात फेकला. वाकडं तिकडं तोंड करीत बोटाएवढी ती भाजली मासळी मी नरड्याखाली घसरवली. मला आधाशासारखं खाताना पाहून आजी खूप हसली होती. मासळ्या विकणारी कोळीण आपुलकीचा भाव दाखवीत म्हणाली,—

" कोन, नातू होय् का वो माय् ?"

" नातूच होय्. मोठ्याचा होय् !" आजी खुशीत येऊन अभिमानाने म्हणाली.

" एकाचे एक्कीस हो. बेलभंडार वाढो बापा, मोटा गुणी हाय् वो माय् " म्हणत हाताची पाच बोटं तिनं माझ्या ओठांजवळ आणलीत व परत आपल्या ओठांजवळ नेलीत. मला वाटतं तिनं माझा मुकाच घेतला. नंतर वाटचातली चांगली भरलेली आजीच्या जाड्या आंगठ्याएवढी मासळी—(भाजलीच) मला दिली व म्हणाली, " खानं गा बापू ! "

मला तिनं गुणी म्हणताच आजी तिथंच बसली, परसाकडे बसतात तशी. अन् तिला सांगायला लागली..." तुले ठाऊक नाई. एक डाव का झाला याले घेऊन मी कपडे धुवाले म्हून सुक्करवार तऱ्यावर गेली. हा माय् पायरीवरच खेळत होता. याले पाऊन एक सायब सुटाबुटात आला. मनते कसा– ' किसका बेटा है ?' मी धावली माय्, पोराला कडेवर घेतली. तवा तीनेक वरसाचा होता हा. पुना बाई तो सारखा पोराकडे पाहाले लागला. ' याच्याबराबर तुम्हाले, आमी सोना देऊ, आमाला पोरगा देऊन टाका–मनला माय् '

" मी म्हनली—पोरं कोनी ईकतेत का बापा, माहा नातू हाय्. मोठ्याचा

ल्येक ! मले बाई मेवच लागला. मी पोराला घरात ठेवूनच आली. दीठ काढली माय् त्याची ! गुलाबाच्या फुलावानी दिसायचा तवा, म्हून तं नाव त्येचा गुलाव ठेवला मिनं ऽऽऽ"

कोळीण पुन: 'सुखी राय बापा' म्हणाली. आजी पुढं निघाली. आजीनं इतर बऱ्याच गोष्टी घेतल्या. आणलेलं टोपलं भरून गेलं. डोक्यावर टोपलं घेऊन घरी परतली तेव्हा अंधार पडला होता, आई तुळशीजवळ अंगणात दिवा लावत होती. ओसरीतच आजीनं डोक्यावरचं ओझं पटकलं. दमून गेली होती. सुस्कारा सोडला. टोपल्यातून एकेक वस्तू काढून ठेवायला लागली. माझा 'आजा--आम्ही त्यांना ताता म्हणत होतो--आजीवर खेकसला,--"पोराले कायले घेऊन गेलीस ? गावभर हिंडत रायतेस् ! अंधार पडला, फुकट पोराले तकलीप् !" माझ्या अंगावर मूठभर मांस चढलं. वंशाचा दिवा होतो न मी ? सगळेच मला जपायचे. नंतर ताता लाडात येऊन बय्याजवळ गेलेत. तिनं पदर डोक्यावरचा सावरला...तेव्हा म्हणाले, "नकटे ! का का आणलं वो आज ?"

आजोबांनी वापरलेलं संबोधन 'नकटे' कसंतरी वाटलं. पण मोठ्या प्रेमाने म्हटलेलं, आमच्या आजीला आवडायचं. आजोबांची कदाचित् प्रेम व्यक्त करण्याची तीच पद्धत असेल ? तशी आमची बय्या नाकानं थोडी डावीच. म्हणजे कमी. खरं म्हणजे आजोबांनी तिला 'चपटी' म्हणावं ! आजीची सगळ्या घरावर सत्ता चालायची, पण म्हाताऱ्यापुढे ती मूग गिळून अशी राहायची जशी काही गोगलगाय.

तिनं टोपलीतून हळूच नवीन चिलीम काढली व ताताच्या हातात देत म्हणाली, 'हे घे तुह्यासाठी..."

म्हातारा गालातल्या गालात हसला.

नंतर तिनं पिशवीतून एक पुडी काढून म्हाताऱ्याच्या हातावर ठेवली.

"का होय् वो, नकटे ! तमाकू होय का ?"

"नाई !"

"मंग ?"

"पायानं डोरे खोलून, काऊन, भोकना झाला का ?"

म्हाताऱ्यानं पुडी उघडली, नाकाजवळ नेली. मग त्याची कळी विशेष खुलली. म्हाताऱ्याची तलफ पुरी करायला म्हातारीनं गांजा आणला होता.

आज जेव्हा मी सुख, सौंदर्य, जीवन यांच्याविषयी तुलनात्मक विचार करतो, तेव्हा मला ही माणसं फार फार मोठी वाटतात. तसं पाहू गेलं तर आमचे आजोबा कसे दणकट. पीळ गेला तरी मिशीवर पीळ देतातच. पाहायला, त्यांच्या जवानीत त्यांनी काय कहर केला असेल ते फक्त भूतकाळालाच माहिती. त्यांच्या उलट, त्यांना मुळीच न शोभणारी ही माझी आजी---खुजी, काळी, नाकात चपटी तर

कानानं बहिरी. आजोबांनी ह्रिच्यात असं काय पाहिलं ! तोंडाची तर फार खाष्ट ! पण किती सुखी राहिलीत ती संसारात ? अजूनही त्यांनी तिला 'नकटे' म्हणावं व तिनं लाजेनं मुरकावं. ह्यापेक्षा सुखाची कोणती व्याख्या असू शकेल ? मी त्यांना भांडताना कधी पाहिलं नाही. पण आई सांगायची, एकदा त्यांचं असं खटक्यात भांडण झालं; तेव्हा आजीनं आजोबांनासुद्धा शिव्याशाप द्यायला कमी केल नव्हतं..." हुटाएवढाले किडे पडतील तुले " असं म्हटलं होतं, म्हणतात म्हातारीनं.

दुसऱ्या दिवशी जेव्हा मी शाळेतून परत आलो...तर आजी रडतच होती. आई, काकूपण घरात रडतच होत्या. कोणी मेलं म्हणजे लोक असंच रडतात. पण घरात मेलं नव्हतं. मला कळलं की बरंच कडाक्याचं भांडण झालं. आजीनं डोकं आपटून घेतलं, बरेच शिव्याशाप दिलेन अन् माझ्या मनात एक भीती घर करून राहिली— ...जर मी सगळं आजीला सांगितलं, हे आईला समजलं तर ?

उंबरठ्यावर आजी रडत बसली होती तिथे मी गेलो. माझ्या सदऱ्यानं आजीचे डोळे पुसले. कोणीतरी विचारायला यावं असं तिला वाटतच होतं. मी जाताच म्हणाली......


" बाप झर्यीच्या म्हणत्येत् कश्या आमी काई म्हनलंच नाई. "

मी धूम धावत सुटलो. काल आजीनं दिलेला ढब्बू माझ्या खिशात होताच. भडभुंज्याच्या दुकानात गेलो. पैशाचे तीनच मुरमुऱ्याचे लाडू आणलेत. चुपचाप मागून गेलो व म्हणालो—" चाल, बय्या, बाहार जाऊ. "

थोड्याच अंतरावर महादेवाचं देऊळ होतं. त्याच्या पायऱ्यांवरच आम्ही बसलो. मी म्हटलं—" हात पुढं कर वो ऽऽ ! "

" कायले रे ? " म्हणतच तिनं हात पुढे केलेत अन् त्यात मी दोन मुरमुऱ्याचे लाडू ठेवले, एक मी घेतला. तिनं दोनही लाडू गपागप् खाल्ले. एक ढेकर दिली. जेव्हा मी प्यायला पाणी आणलं तर अशी हसली जसं काही झालंच नाही.

मी तिचा हात धरून ओढतच घरी नेलं. स्वत: ताट वाढून आणलं. उंबरठ्यावरच मी व ती एकाच ताटात जेवलो......



# उन्हे

आजीमुळे उन्हाची किती रूपं मला पाहायला मिळाली ........ मायाळू, उर्बदार, लोभस, स्वप्नाळू, गंभीर, प्रौढ, हेकट, क्रूर !

**अनंतराव पाटील**

उन्हाशी माझी ओळख फार पूर्वीपासूनची: लहानपणी समजू लागल्यापासूनची. उन्हाची गट्टी जमली ती आजीमुळे. आजीचे दिवसाचे सारे वेळापत्रक उन्हाशीच जोडलेले असायचे. मागील दारच्या पडवीतल्या खांबाजवळ ऊन आले की आजी सुनांना न्याहऱ्या तयार ठेवायला सांगे. गडीमाणसांच्या न्याहऱ्या शेतात न्यायची वेळ झाली म्हणून ती सुनांच्या पाठीमागे तगादा लावी. ओटच्यावरच्या घडीव दगडाच्या जोत्यावर उन्हे रेंगाळू लागली की, शाळेतून पोरे घरी यायची वेळ झाली म्हणून ती आमच्या आयांना सूचना करी. त्या सूचनेवर पोरांच्या पंगतीची तयारी सुरू होई. गोठ्यातलं तान्हं वासरू हंबरू लागलं की तिचा जीव कळवळून उठे. बारा वाजले तरी त्याला कुणी पाणी दाखवलं नाही म्हणून ती हळहळे व स्वत: बादलीत पाणी घेऊन घडपडत जाई. वासराच्या अंगावर उन्हे दिसली की त्याला सोडून ती सावलीत बांधी. पुंडलीक तात्याच्या माडीवरच्या जिन्यावर उन्हे उतरली की आजी आजोबांच्या चहाच्या तयारीला लागते. एखादे दिवशी आम्हा पोरांना उठायला उशीर झाला की आजी कडाडायची,

" गांडीवर उन्ह आली की मेल्यांनो. उठा "–आं ! खरंच अंथरुणावर सकाळची पिवळी उन्हे पडलेली असायची व उशीरा उठायची शरम वाटायची.

दिवसाचे वेळापत्रक कशाला ? आजीच्या आयुष्यातल्या महत्त्वाच्या प्रसंगांच्या नोंदी उन्हाच्या खुणेच्या नोंदीशी निगडीत होत्या. उदाहरणार्थ, आमच्या घरावर भर दिवसा दरोडा पडला तेव्हा उन्हे आडाच्या भितीजवळ आली होती असं आजी सांगे. माझा जन्म झाला तेव्हा तिसऱ्या प्रहरची उन्हं पुंडलीक तात्यांच्या जोत्यावर आली होती, असे ती म्हणे. आजीचा मधला मुलगा आडात पडून वारला. तो पडला तेव्हा जनावराच्या गोठ्याजवळ उन्हं सरकली होती असे ती सांगे.

आजीच्या सान्निध्यातच मला उन्हाचे वेड लागले. थंडीच्या दिवसांत चार महिने ती मागच्या पडवीत खाटेवर उन्हातच बसून राही. थंडीच्या दिवसांत उन्हाच्या

संगतीतच शाळेत जाणे बरे वाटे. हिवाळ्याच्या दिवसांत सकाळचे ते कोवळे उबदार ऊन आजीच्या उबदार कुशीसारखे सुखद वाटे. पिवळ्या उन्हात स्वतःची लांब लांब सावली निरखीत शाळा केव्हा आली ते समजत नसे. शाळेतले वर्गदेखील मोकळ्या पटांगणात उन्हात भरत. पाठक मास्तर डोळ्यांवर वर्तमानपत्र घेऊन उबदार उन्हात खुर्चीवर रेलून घोरत पडत. त्या दिवसांत ते सकाळचे कोवळे ऊन अंगावर घेत बसून राहणे मोठे गोड वाटे. गढीवरच्या शाळेच्या त्या पटांगणात उन्हात बसले की पिवळे ऊन, पांघरलेल्या नकटया टेकडया, दूरवरचे हिरवे मळे, खालचे नदीचे उन्हात चकाकणारे पात्र, भवानीचे देऊळ, देवळाजवळून जाणारी गाडीवाट ही सारी दृश्ये भर दिवसा पडलेल्या स्वप्नासारखी वाटत.

त्या काळात भर दुपारच्या रणरणत्या उन्हाचे भारी आकर्षण असे. दुपारच्या वेळी भर उन्हात मळयात गडयांना भाकरी द्यायला जायला इतर मुले कुरकुर करीत. पण मी मात्र आनंदाने राजी होई. रुपेरी वर्खाप्रमाणे लखलखणाऱ्या उन्हातून आपल्या पायांखालच्या सावलीशी सोबत करीत जाणे हा एक आगळा अनुभव असे. सारा रस्ता निर्मनुष्य, पायाखाली जळणारी फुफाटयाची वाट, रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या रखरखीत टेकडया व डोक्यावर धगधगणारे ऊन या साऱ्या दिव्यातून जाण्यात एक वेगळी बेपर्वाई असे. पाय फारच पोळले, डोक्यावरचे ऊन असह्य झाले की एखाद्या तुटक्या झाडाच्या सावलीखाली उभे राहण्यात परमसुख वाटे. झाडाच्या कुशीखाली शिरल्यावर प्रथम डोळयाला अंधेरी येई. समोरचे काहीच दिसेना. मग हळूहळू उजव्या बाजूला लांबवर चमकणारे नदीचे पात्र. नदीच्या कोरडया पात्रावरचे वाळलेले केविलवाणे शेवाळ नजरेत भरे. चालून आलेल्या गाडीरस्त्याच्या बाजूला वळून बघितले की गावाच्या बाजूला गढीवर वसलेली लाल कौलारू मराठी शाळेची इमारत दुपारच्या उन्हाच्या झळांमध्ये थरथरताना दिसे. मधेच त्या निर्जन रस्त्यावर कुणाची तरी गाडी खडखडत येताना दिसली की, गाडीतला माणूस दया येऊन गाडीत बसायला सांगे.

मळयाशी पोचल्यावर हा सारा शीण नाहीसा होई. मोटेच्या थारोळयात पडणाऱ्या गार पाण्यात पाय सोडून कांद्याच्या शेतात पसरलेल्या हिरव्या उन्हाची गंमत पाहत राहणे मोठे सुखद असे. हिरव्याकंच मळयातल्या पिकावर पसरलेले ऊन रस्त्यावरच्या उन्हाइतके कर्कश व निर्दय नसे. मळयातल्या गार पाण्याच्या सान्निध्यात दुपारचे ते ऊन तितकेसे तापदायक नसे. थारोळयातल्या गार पाण्याने पाय थंड झाले की भर उन्हातून मळयाजवळच्या ओढयाच्या काठाने फिरायची हुक्की यायची. त्या निर्जन ओढयाच्या काठाकाठाने उगीचच उनाडक्या करीत हिंडणे हा एक आवडता छंद. हातात ओली शेलाटी घेऊन झुडुपे झोडपीत उन्हातून हिंडताना मस्तक तव्यासारखे तापे, तोंड घामाने डबडबून जाई, कपडे काटयांनी ओरबाडून निघत. अशा अवतारात विहिरीवर परतलो की म्हातारा साकुदार वडीलकीच्या मायेने धमकी देत.



"थांब. घरी गेल्यावर सांगतो आजीला."–पण त्याच्या दमाला कोण जुमानतो? तिसऱ्या प्रहरची उन्हे कलली की, त्या निवळलेल्या उन्हात रेंगाळत घरी निघावे.

पावसाळ्याच्या दिवसांत ऊन भलतेच दुर्मिळ व्हायचे. आषाढात काळ्याकुट्ट ढगांनी सारं वातावरण ओलंचिंब व अंधारं असायचं. अशा वेळी शाळेत वा घरात डांबून राहायचा भारी कंटाळा यायचा. शाळेतदेखील रपरपणाऱ्या पावसाच्या सरींनी कंटाळा यायचा. ते अंधारलेले, दुर्मुखलेले दिवस कधी संपतील असे होऊन जायचे. मात्र या काजळलेल्या वातावरणात कधीतरी झक्क पिवळे ऊन पडले तर कसे प्रसन्न वाटायचे. त्या दुर्मिळ उन्हाची वेगळीच अपूर्वाई असायची. दूरवरच्या हिरव्या टेकड्यांवर ऊन पडले की शाळेच्या खिडकीतून तीवरून दृष्टी काढावीशी वाटत नसे. त्या हिरव्या वातावरणात त्या उन्हाचा पिवळेपणा भलताच उठून दिसे. ते सोनेरी ऊन साऱ्या वातावरणावर आगळीच सोनकळा चढवीत असे.

पावसाळ्यातल्या उन्हाची खरी गंमत श्रावणात. पिवळ्याधमक उन्हात पडणारा तो नागवा पाऊस, आकाशात दिसणारे ते इंद्रधनुष्य, गवतावर चमचमणारे पाण्याचे थेंब हे सारे सारे मोठे लोभस असे. ऊनपावसाचा पाठशिवणीचा खेळ शाळेच्या खिडकीतून सारखा पाहावासा वाटे. दूरच्या डोंगरावर क्षणात ऊन व क्षणात सावली असा हा क्षणाक्षणी बदलणारा खेळ डोळ्यांनी पापणी न मिटता पाहावासा वाटे. पुढे वरच्या वर्गात शिकलेली श्रावणावरची ती कविता सारा वर्ग एकमुखाने म्हणू लागला की उन्हाची ती जादूची किमया चटकन डोळ्यांसमोर उभी राही-

श्रावणमासी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहीकडे
क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरुनी ऊन पडे
वरती बघता इंद्रधनुचा गोफ दुहेरी विणलासे
मंगल तोरण काय बांधिले नभोमंडपी कुणी भासे
झालासा सूर्यास्त वाटतो, सांज अहाहा! तो उघडे
तरु शिखरांवर, उंच घरांवर पिवळे पिवळे ऊन पडे!

भाद्रपदाच्या उन्हाचा चटका मात्र नकोसा वाटे. रविवारच्या सुटीच्या दिवशी म्हशी चारायचे काम आले की नकोसे वाटे. म्हशीसारखे निर्बुद्ध जनावर शेताच्या



बांधावर चरायला नेण्यासारखे कंटाळवाणे काम नसे. भर दुपारचे ऊन असह्य झाले, की म्हशी ओढ्यातल्या चिखलात ठाण मांडून चिखलाच्या गारव्याची मजा चाखत पडून राहत. अशा वेळी वेळ जाता जायचा नाही. त्या निबर राकट उन्हाने जिवाचे पाणी पाणी होई. भाद्रपदातले ते चरचरीत ऊन व शेतातल्या कोवळ्या हिरव्या पिकाला पिवळा प्रौढपणा आणणारे ऊन अगदी नको नकोसे वाटे.

डोंगरमाथ्यावरच्या व दऱ्याखोऱ्यांतल्या उन्हाला वेगळेच व्यक्तिमत्त्व असे. ते ऊन गंभीर, प्रौढ व स्वप्नाळू वाटे. आमच्या गल्लीतल्या शाळेच्या खिडकीतून दूरवरच्या जांभळ्या डोंगरावरचे अबोध व गूढ ऊन सारखे पाहावेसे वाटे. डोंगरावरचा जांभळेपणा भलताच गूढ वाटे. त्या डोंगरावर एक जुना पडका ऐतिहासिक किल्ला होता. त्या पडक्या किल्ल्यावर रेंगाळणारे दुपारचे ऊन व त्यांच्या भिंतींवरच्या छाया एखाद्या गहन स्वप्नासारख्या वाटत. ही सारी किमया उन्हानेच घडवून आणलेली असे. एकदा शाळेची सहल त्या किल्ल्यावर गेली. तेथे गेल्यावर त्या पडक्या भयाण भिंती, ती झुडपे व त्यांवर पडलेले ते पोरके ऊन पाहिल्यावर दुरून दिसणारे ते गहन वातावरण एकदम नष्ट झाले. उन्हाची दुरून दिसणारी किमया जादूप्रमाणे एकदम उडून गेल्यासारखी वाटली.

त्या मानाने घरच्या धाब्यांवर वा माडीतल्या गच्चीवर पडलेले ऊन मायाळू वाटते. धाब्यावर चढून सकाळ-संध्याकाळचे ऊन व त्याने घडवून आणलेली जादू पाहणे हा तर लहानपणीचा आवडीचा छंद. तासन् तास त्या वातावरणात मी उन्हे निरखीत वेड्यासारखा बसून राही. सकाळच्या त्या तजेलदार, ताज्या उन्हात झाडांचे माथे, जिने, गच्च्या, देवळांचे कळस या साऱ्यांवर लोभसवाणी पिवळी सोनकळा चढलेली असे. वाचनाची एकांताची आवड म्हणून मी आडगळीच्या खोलीत हरीभाऊंच्या ऐतिहासिक कादंबऱ्या वाचत पडून राही. धाब्यावरच्या गवाक्षातून उन्हाचा झोत आला की त्या काळ्या अंधाऱ्या खोलीत त्या उन्हाची सोबत बरी वाटे. त्या खोलीभर रेंगाळणारे उन्हाचे कवडसे पाहणे हा मोठाच

विरंगुळा असे.

उन्हाची खरी गंमत उन्हाळ्यात. त्यातल्या त्यात भरदुपारी डोक्यावर काही एक न घेता नदीच्या काठाने, आंबराईत, अनवाणी वणवण भटकणे हा उन्हाळ्याच्या सुटीतला आवडता छंद. दुपारच्या उन्हाचा सारा क्रूरपणा डोक्यात भरे व सहकाऱ्यां-समवेत डुकरे, गाढवे यांना दगड मारीत हिंडणे हा आवडता खेळ. कारण भरदुपारचे हटकायला कोणी वडीलधारे माणूस नसायचे. थकलीभागलेली वडीलधारी मंडळी दुपारची निवांत झोपली असताना आरडाओरड करीत लगोऱ्या खेळण्याचा आनंद वेगळा. ह्या आरडाओरडीने त्रस्त झालेली वडीलधारी मंडळी माणकासारखे लाल डोळे करीत आम्हा पोरांना दरडावीत.

—पण मला आता खरी आवड आहे ती सकाळच्या मुलायम तलम उन्हाची. झोपेतून उठल्यावरोवर पूर्वेकडच्या खिडक्या प्रथम उघडून मी ते कोवळे, बाळसेदार ऊन भरपूर अंगावर घेतो. आवाराच्या बागेतील झाडेदेखील सकाळच्या त्या उत्तेजक उन्हाने हुरूपलेली दिसतात. सकाळच्या ताज्या उन्हाचा मुलायम हात माझ्या उघड्या अंगावरून फिरला की मला बरे वाटते. सकाळी प्रथम दारे, खिडक्या, पडदे उघडून मी उन्हाला सर्व घरभर फिरू देतो. खिडक्यांच्या फटींतून, तावदानांतून चोरून मांजरीच्या पावलाने येणारी उन्हे माझ्या डायनिंग टेबलावर चहाच्या वेळी घुटमळू लागली की मला बरे वाटते.

सकाळच्या ९ वाजेनंतरचे ऊन मला बिलकुल आवडत नाही. वयात येऊ पाहणाऱ्या मुलाचा निबरटपणा त्यात असतो. ऑफिसला जायच्या वेळेपर्यंत ते उन बरेच बटवटीत झालेले असते. पण डोक्यावर छत्री घेऊन उन्हापासून बचाव करण्याचा बायकी नाजूकपणा मला बिलकुल आवडत नाही. ते निबरट ऊन अंगावर झेलीत मी ऑफिसला जातो. दुपारच्या १२ नंतरचे ऊन कर्त्या, करारी पण तापट माणसासारखे. अशा माणसाच्या डोळ्याला डोळा भिडवणे कठीण असते. तसेच या उन्हाचेदेखील. चारनंतरचे ऊन म्हणजे एकेकाळी दबदबा असणाऱ्या, पण आता म्हाताऱ्या झालेल्या प्रेमळ माणसासारखं असत. दिवस मावळण्याआधीच ऊन म्हणजे दात पडलेल्या आजीच्या हसण्यासारखे. निर्व्याज व निष्पाप. त्या उन्हात सकाळच्या कोवळ्या उन्हाचे ताजेपण नसते. थकलेल्या माणसाचा शीण त्यात असतो. पेन्शनीत असलेल्या पोलीस अधिकाऱ्याएवढीच जरब त्या उन्हात असते. अशा उन्हात पेन्शनर, बायका व कोवळे पुरुष बाहेर पडायची तयारी करतात. संध्याकाळच्या थकलेल्या, शिणलेल्या उन्हाची मला नेहमीच कीव येते. शेवटच्या घटका मोजणाऱ्या म्हाताऱ्याचा केविलपणा त्यात असतो.

डोंगर, टेकड्या, दऱ्या, हिरवी शेते, उजाड माळराने, विहिरी, नाले, डोह, नदीकाठ यांच्या सान्निध्यात उन्हाचे रूप वेगवेगळे असते. डोंगरावरच्या उन्हाचा डौल वेगळा. दऱ्याखोऱ्या, कपारीतून वास्तव्य करणारे ऊन भलतेच गूढ व अबोध

वाटते. मला स्वत:ला हिरव्या शेतांच्या आसमंतातले प्रसन्न ऊन आवडते. हिरव्या पिकांच्या सान्निध्यातले ते हिरवे ऊन कसे बाळसेदार वाटते. हिरवे वस्त्र ल्यालेल्या गर्भवतीचा भारदस्तपणापण त्यात असतो.

त्या मानाने उजाड माळरानावरचे ऊन कसे एकाकी व पोरके वाटते. स्वत:शी खंत करणाऱ्या दु:खी माणसासारखे. त्या पोरक्या उन्हामुळे उजाड माळरान जास्तच उजाड वाटते. तुडूंब भरलेल्या विहिरीतले ऊन मात्र शांत व भारदस्त माणसारखे वाटते. भरलेल्या विहिरीचा तळ छेदणारे ऊन तेजस्वी माणसाच्या डोळ्यांसारखे वाटते. मात्र जुन्या व पडक्या विहिरीतले ऊन भयानक व भेसूर वाटते. त्या विहिरीत उगवलेल्या वनस्पतीत गुरफटलेले ऊन चिंतनशील गंभीर माणसासारखे गूढ व अबोध वाटते. एकट्या दुकट्या माणसाला त्या खोल व गंभीर डोहापेक्षा त्या उन्हाचीच जास्त भीती वाटते. निर्जन एकाकी रस्त्याने जाताना मात्र उन्हासारखी दुसरी चांगली सोबत नाही. आपल्याच पायात घुटमळणाऱ्या सावलीची सोबत धरून व रस्त्यावरच्या मुक्या सावल्या निरखीत रस्ता तुडविल्याने कंटाळवाणेपणा वाटत नाही.


परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस

सहा साहसे — दा. सी. देसाई

**मूल्य प्रत्येकी दोन रुपये**

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.



सांडू प्रेग-युटेरो
गर्भिणी गर्भरक्षक
गरोदरपण हे आनंददायक तर खरेंच, पण त्या काळांत प्रकृतीची चिंताहि वाटूं लागते. मात्र सुरवाती पासूनच सांडू प्रेग-युटेरो घेत राहिल्यास गरोदरपणीं प्रकृति उत्तम राहून गर्भाची चांगली वाढ होते.
दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रा. लि.
चेंबूर—मुंबई—७१
सांडू औषधी
PREGUTERO
बाळराजाच्या आगमनाची चाहूल
सांडू बाळंत काढा
बाळंतपणांत गेलेली शक्ति पुन्हा मिळविण्यासाठीं सांडू बाळंत काढा हे एक अत्यंत प्रभावी औषध आहे.
STUSA 3/66.

# दिहांगच्या तीरावर



आजाद हिंद सेनेच्या
नेफा-आसाम-ब्रह्मदेशमधील क्रांतिकार्यावर आधारित
एक साहसरम्य प्रदीर्घ कथा

भाग ३ रा

लेखक

□ सुधाकर डोईफोडे



## कथेचे पूर्वसूत्र

दुसऱ्या महायुद्धाचा काळ. 'चलेजाव'ची चळवळ जोरात होती. बंगाली क्रांतिकारकांनी तर अनेक प्रखर मार्गांचा अवलंब केला होता.

लष्करी साहित्यनिर्मितीचा एक सरकारी कारखाना उडवून लावण्याचा कट क्रांतिकारकांनी आखलेला असतो. अशोपकुमार हा त्यांचा प्रमुख. आणि सरकारकडून हा कट मोडून काढण्याची जबाबदारी पडते आमोद विश्वनाथ कुंटे या एका राजनिष्ठ व गर्भश्रीमंत व्यक्तीवर.

कट उघडकीला येतो. क्रांतिकारक सापडले जातातच. परंतु आमोदही जखमी होतो. क्रांतिकारकांकडे ओढा असलेल्या करुणेच्या (पत्नी) शुश्रुषेमुळे बरा होतो. पण बदलतो. स्वतःचा मित्र सरित हाही क्रांतिकारक असल्याचे त्याला समजते. सुभाषचंद्रांनी रणशिंग फुंकलेले असते. करुणा, सरितच्या प्रयत्नांना यश येते. आमोद शस्त्रास्त्र निर्मितीचं आपलं ज्ञान वापरून क्रांतिकारकांच्या साहसात गुप्तपणे सामील व्हायचं ठरवतो.

भारतात घुसू पाहणाऱ्या आजाद हिंद फौजेला शस्त्रास्त्रांचा पुरवठा करणं अत्यंत आवश्यक होऊन बसतं. आमोदच्या साहाय्यानं भारतातच एक कारखाना उभारण्याची धाडसी योजना क्रांतिकारक तयार करतात. इंग्रज सरकारकडून गिर्यारोहणाची परवानगी घेऊन विलक्षण परिश्रमांनी कुशल क्रांतिकारकांचा गट हिमालयाच्या परिसरात ताकपाशिरी या दुर्लक्षित व दुर्गम जागी पोहचतो–

रात्री कडाक्याची थंडी होतीच. पर्वतारोहणासाठी खास वापरण्यात येणाऱ्या तंबूतही थंडी शिरली होती. त्या भीषण थंडीमुळे डोकेदुखीची तीव्र साथ सुरू झाली होती. भोटियांना अशा हवेचा सराव होता. परंतु आम्हा सर्वांस या थंडीने कसला न कसला प्रसाद दिला होता. अशोष तर अंथरुणाला खिळला होता. आम्ही फिरू लागण्याइतपत ठीक होतो. डॉ. चौधरींचा इलाज चालू होताच. सर्वांना मात्र डोकेदुखीनं झपाटलं नव्हतं. दुखण्यासाठी आधी 'ते' असावं लागतं असं अशोषचं त्यावर म्हणणं होतं !

कडाक्याच्या थंडीत आमची बैठक सुरू झाली. सरितने कार्याचा रिपोर्ट आम्हांपुढे ठेवला. आपण आजवर मारलेली मजल व त्यात आलेल्या अडचणी अहवालात नमूद केल्या होत्या. सरकारी आदेशाप्रमाणे कलकत्त्याला रोज बिनतारीने संदेश पाठविण्यात येत होता. याच वेळी बिनतारीने सादियाच्या क्रांतिकारक दलाशी संपर्क साधण्यात आला होता. मात्र दोन्ही ठिकाणी पाठविलेल्या संदेशांत आमच्या वास्तव्याची वेगवेगळी माहिती दिली होती. कलकत्त्यास दिलेल्या संदेशानुसार आम्ही पोशिग-लाच्या दक्षिण मुखाशी म्हणजे उत्तर अक्षांश २७·५ व पूर्व रेखांश ९२·६ येथे होतो तर सादियास दिलेल्या संदेशानुसार आम्ही पोशिग खिड ओलांडून उत्तर अक्षांश २७·६ व पूर्व रेखांश ९२·८ येथे पोचलो होतो ! आमच्या दोन्ही 'वास्तव्यात' पोशिग खिड पसरली होती !

"हे दोन वेगवेगळे रिपोर्टस् देण्याचे कारण काय ?" शिवस्वामींनी विचारले. "यांतील कोणती माहिती खोटी आहे ?"

"अर्थात सरकारला दिलेली !" वर्मा उत्तरले. "आपण पुढे रचित असलेल्या बेताला अनुसरून हे धोरण अनुसरण्यात येत आहे."

पण पुढे काय होणार आहे हे मात्र त्यांनी सांगितले नाही. पुढील धोरणाची माहिती वर्मा व सरित यांच्याशिवाय कुणासही नव्हती. सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांनी ती आमच्यापासूनही लपवून ठेवली होती. उद्याचा कार्यक्रम ठरवून आम्ही पथारी पसरली.

कांगटो शिखर एखाद्या शापित देवतेप्रमाणे भासत होते. सकाळच्या कोवळ्या उन्हात त्यावरील बर्फ चमकत होता. पण त्या चकचकीमध्ये मलूलता भासत होती. काय झालं असावं या देवतेला ?

फार फार वर्षांपूर्वी या भागात म्हणे सुखसमृद्धी नांदत होती. पर्वत चांदीचे व नद्या मधाच्या होत्या. भूमिमाता तयार अन्न देई तर वृक्षराजी वल्कले पुरवी ! या भागातील मिरी जमात अगदी ऐश्वर्यात नांदत असे.

स्वर्गातील देवता गिनात्से हिने या जमातीत जन्म घेतला. हिच्या आदेशाप्रमाणे सारी जमात वागू लागली. या जमातीवर संकट येणार असले तर तिला त्याचा आधी सुगावा लागे. तिच्याच मार्गदर्शनाने ते संकटातून पार होत. गिनात्से त्यांची

संरक्षक देवता होती.

काही मत्सरग्रस्तांना तिचे वर्चस्व आवडले नाही. ते तिचा द्वेष करू लागले. एकदा गावात कसलासा रोग आला. लोक पटापट मरू लागले. बुढाबाबांनी प्रमुखांची बैठक बोलाविली. धर्मगुरू म्हणाले, "ईश्वर कोपला आहे. त्याला बळी हवा. कुमारिकेचा बळी ! गिनात्सेला बळी द्या !"

लोक थरारले ! पण गिनात्से तयार झाली. ती म्हणाली,

"माझे जीवनच तुमच्यासाठी आहे, मृत्युही तुमच्याचसाठी होईल ! मी कुठेही असले तरी माझा आत्मा तुमच्याभोवती घोटाळत राहील. मी क्रांगटो शिखरावर वास्तव्य करीन. तुमच्या अडचणीत मार्गदर्शन करीन !"

कांगटो शिखरावरून गिनात्से आपल्याला मार्गदर्शन करते असे मिरो लोक अजूनही मानतात. आज कांगटो शिखर मलूल वाटत होते. पुढे घडणाऱ्या अशुभाचा तर गिनात्से आम्हांला इशारा करीत नसेल ना ?

पठार सोडून उद्या संध्याकाळपर्यंत आम्हांला शिद्राच्या दरीत शिरणे भाग होते. पठारावर थंडीचा कडाका वाढला होता. झाडीचं प्रमाण चांगलंच कमी झालं होतं. जिकडे तिकडे बर्फच बर्फ ! एवढ्या थंडीत खेचरांचा निभाव लागणार नव्हता. बिचाऱ्यांना या हवेत नीट श्वासोच्छ्वासही करता येत नव्हता.

"दक्षिण अमेरिकेतून लामा, अल्पाका आणले असते तर बरं झालं असतं !" वर्मा म्हणाले. "तेच प्राणी या उंचीवर टिकू शकतात."

"मग आणा नं ?" अशोष किंचाळला, "किंवा वर्मा, तुम्हीच का नाही ओझं वाहत ?"

"मूर्खासारखं बडबडू नकोस !" वर्मा भडकले. "अशोष, तुला सांगून ठेवतो, नाहीतर..."

"नाहीतर काय ?" अशोष आता हमरीतुमरीवर आला. वास्तविक, दोघांच्या रोज चकमकी झडत. पण त्यात कटुता नसे. पण आजचा नूर काही वेगळाच वाटत होता.

मग मलाही चिडल्यासारखे झाले ! मी दोघांवरही डाफरलो, "हे बघा, आता गप्प बसता की देऊ एकेक ठेवून...!"

दोघेही एकमेकांपासून दूर झाले आणि जखमी वाघासारखे माझ्याकडे पाहू लागले !

थोड्या वेळाने राग कमी झाल्यावर मला अस्वस्थ वाटू लागले. वर्मा–अशोष यांनी एकमेकांवर उखडावे आणि मी...मीही तोल सोडावा याची मला लाज वाटू लागली. मी सारा प्रकार डॉ. चौधरींना सांगितला तर ते खूप हसले !

"अहो, या हवेचा गुण बरं तो !" डॉक्टर हसून म्हणाले, "या विरळ हवेत विवेकशक्ती काम करीनाशी होते व चिडखोरपणा वाढतो. महाशय, तुम्हांला

अधिक ऑक्सिजनची आवश्यकता आहे ! ”

सरित एक टोळकं घेऊन बाहेर गेला होता. दहा वाजता तो परत आला तो विचित्र असे प्राणी घेऊनच ! बैलाच्या आकाराचे, बहुशः काळे, क्वचित डोक्यावर व खांद्यांवर पांढरे ठिपके असलेले, बिन वशिंडाचे असे ते प्राणी होते. अंगावर व शेपटीवर हातहात लांब केस होते.

“ लामा, अल्पाका ते हेच प्राणी काय ? ” अशोषने विचारले.

“ नाही रे बाबा, ” सरित त्याला समजावून सांगू लागला, “ ज्यांना तिबेटी भाषेत झांबू आणि आसामीत मिट्न ( मिथुनचा अपभ्रंश ) म्हणतात. तिबेटातील रानटी वनगायी ( चमर ) व पाळीव बैलांच्या संयोगाने झांबू उत्पन्न होतो. चमराला हिमालयाच्या माथ्याची हवा हवी तर साध्या बैलाला मैदानी हवा हवी. झांबूला मात्र दोन्ही प्रकारची हवा मानवते. ”

“ म्हणजे आम्ही यापुढे झोम्बूऐवजी झांबूवरून प्रवास करायचा वाटतं ! ” अशोष तोंड वाकडं करून म्हणाला. नंदीबैलावरून कैलासवासी होण्याची कल्पना त्याला फारशी पसंत नसावी !

सरितने आमच्या काफिल्यातील निम्मी खेचरं व काही भोटिया लोकांना परत पाठवून दिले. त्यांच्याबरोबर आमचा एक सहकारीही गेला. या लोकांना बोमदि–लाला जाऊन एक विशिष्ट कामगिरी बजवावयाची होती.

आज ७ नोव्हेंबर ! आज आम्ही रेडियोवर अतिशय आनंदाची वार्ता ऐकली. अंदमान व निकोबार बेटांवर आजाद हिन्द सरकारचा ताबा झाला होता. नेताजींनी पोर्ट ब्लेअरला स्वहस्ते राष्ट्रध्वज फडकावला ! इंग्रजांच्या ताब्यातून मुक्त झालेला हा पहिला भारतीय भूभाग ! आनंदातिशयानं त्या दिवशी आम्हांला काही सुचलं नाही.

दुपारी मिरी लोकांनी आमच्या स्वागतार्थ करमणुकीचे कार्यक्रम केले. या जमातीचा पूर्वज भालुक राजा याच्या पराक्रमाचे वर्णन करणारे कथानक नृत्य प्रकारात बसविले होते. श्रीकृष्णाचा नातू अनिरुद्ध याने ज्या बाणासुराच्या कन्येचे ( उषेचे ) हरण केले त्या बाणासुराचा भालुक हा नातू ! बाणासुराच्यानंतर उध्वस्त झालेलं राज्य याने पुन्हा उत्कर्षास नेलं. स्त्रीपुरुषांचा संमिश्र समाज लयबद्ध आवाजात तालावर पुढे मागे पाय टाकत होता. वाघाप्रमाणे बळकट असलेल्या हरिणाक्षी स्त्रिया व हरिणाप्रमाणे चपळ असलेल्या व्याघ्रमुख पुरुषांचा मिश्र समाज !

हे नृत्य पाहत असता माझ्या मनात विचार आला, कोण म्हणतो हे लोक परके आहेत. प्रत्यक्ष आपल्या परमेश्वराशी ज्यांचे नाते जडले ते का परके ? काळच साक्षी असलेला पुराणेतिहास आपण विसरलो आणि आपल्याच भाऊबंदांना परके मानून बसलो !

या प्रेमळ जमातीचा निरोप घेताना आमचे हृदय भरून आले.

यापुढचा बराचसा प्रदेश अशोधित व अपरिचित होता. सरकारी नकाशा कुचकामाचा होता. ताकपाशिरीला ध्रुव मानून पुढे जाणे हाच एक इलाज होता. या मार्गात शिन्द्रा हेच जगाला ज्ञात असलेले शेवटचे खेडे ! ते ओलांडले आणि आम्ही अक्षरशः अज्ञात प्रदेशात पाऊल टाकले !

दोन दिवस आम्ही शिन्द्राच्या दरीत भटकत होतो. अजूनही ताकपाशिरीकडे जाण्याचा रस्ता सापडत नव्हता. मग पोचणार की नाही आम्ही मुक्कामाला ? आम्ही कोठे आहोत, कोणत्या ठिकाणी आहोत हे आम्हांला कळत नव्हते. जगाशी अमचा संबंधच तुटला होता त्यातच सरितने कलकत्त्याला संदेश पाठविणे बंद केले ! त्याने तसे का केले हे मात्र आम्हांला समजले नाही.

परंतु त्याच रात्री सरितच्या कृतीचा आम्हांला बोध झाला.

बोध झाला तो किती भयंकर प्रकाराने ! रात्री ऑल इंडिया रेडियोवर आमची गिर्यारोहक तुकडी पोशिंग खिंडीत वादळात सापडून 'गारद' झाल्याची भयंकर वार्ता देण्यात आली. आमच्याकडून संदेश मिळणे बंद होताच त्यांना म्हणे अपघाताची शंका आली होती. आमच्या तुकडीतून काही लोक 'बचावून' बोमदिलाला परत आले. त्यातील आमच्या सहकाऱ्याने हा 'भयंकर वृत्तान्त' सरकारला दिला. त्याची व भोटियांची नाना प्रकारे उलटतपासणी करून सरकारने खात्री करून घेतली. आम्ही आधी दिलेल्या संदेशाप्रमाणे पोशिंग-ला ओलांडली नव्हती. त्यानंतर आमची तुकडी खिंडीत शिरली असता एकाएकी वादळ होऊन बाकीचे लोक ठार झाल्याचे त्या सहकाऱ्याने सांगितले. दरीत आमचा मागोवा लागतो का हे पाहण्यासाठी दोन टेहेळणी विमाने पोशिंग-लावर घिरट्या घालूनही आली. ( हा प्रकार काल झाला. तोवर आम्ही शिन्द्रा दरीत शिरलो होतो.) या दुर्घटनेने सारा देश म्हणे हादरला होता ! सरकारचे सारे लक्ष युद्धाकडे असल्यामुळे फारसा तपास झाला नाही व आम्ही 'मेल्याचे' दुःखाने अधिकृतपणे जाहीर करण्यात आले !

स्वतःच्या मृत्युची वार्ता ऐकून मी सुन्न झालो. स्वतःचा नव्हे तर करुणेचा विचार मनात येऊन ! माझ्या मृत्युची वार्ता ऐकून तिच्या मनावर केवढा आघात झाला असेल ! दुःखातिरेकाने तिने आपल्या जिवाचं बरंवाईट तर करून घेतलं नसेल ना ! माझ्या जिवाची तडफड सुरू झाली.

दूर बसलेला सरित उठून माझ्याजवळ आला व माझ्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला, "आमोद, तुझी चिंता माझ्या लक्षात आली. आमच्या या प्रकाराला तू क्रूरपणा असेही संबोधशील ! पण आम्ही तेवढे निर्दय नाहीत. कान इकडे कर, तुझ्या पत्नीस घरी निरोप मिळेल याची सोय केलेली आहे. कालच आमच्या दलातील माणसे तिला भेटली असतील. तिला परिस्थिती नीट कळविली असून देशाच्या व तुझ्या हितासाठी ती हे दिव्य पार पाडील याची मला खात्री वाटते !"

हा साराच प्रकार इतका विचित्र होता की, मला काहीच सुचेना !



**सरितने माझी समजूत घातली. माझे मन शांत झाले.**

एकदा वाटे साऱ्यांना ओरडून सांगावे की, बस्स करा हा खेळ ! ही लपवा-लपवी ! मला नको हे स्वातंत्र्य ! मला फक्त करुणा हवी. तिच्या जिवाशी केवढा क्रूर खेळ ! मला नाही हे सहन होत !

पण दुसऱ्याच क्षणी मनाला विवेकाचा लगाम लागे. दुसरे मन म्हणे, 'बाबारे, अशी दिव्ये केल्याशिवाय स्वातंत्र्य मिळत नाही. अरे, यासाठी हजारोंनी आपले सोन्यासारखे संसार अक्षरक्षः उध्वस्त करून घेतले आणि तू काल्पनिक...'

हळू हळू मन शान्त झालं !

शिंद्रा खिंड ओलांडून आम्हांला दोन दिवस झाले होते. आम्ही आता किरातांच्या भूमीत पोचलो होतो. भगवान शंकराची ही भूमी ! एका अर्थाने आम्ही कैलासवासी झालो, आणि सरकारच्या दृष्टीनेही आम्ही कैलासवासी नव्हतो काय ?

ताकपाशिरी हे आता बरेच नजीक आले होते. सरितने सादियाला संदेश पाठविला... ताकपाशिरीच्या आग्नेयेस १२ मैलांवर ... उत्तर अक्षांश २८° व रेखांश ९३° च्या छेदन बिन्दूच्या जवळपास ......!

या जागेपासून तिबेटची हद्द अतिशय जवळ म्हणजे सरळ रेषेत १०–१२ मैल होती. आमच्या पूर्वेस असलेला मुलुख आबोर, मिनयांग, पाशी या क्रूर जमातींनी व्यापलेला होता. या लोकांना टाळण्यासाठी आम्ही तिबेटच्या प्रदेशात शिरण्याचे ठरविले. तिबेटच्या भारतीय मुलुखाजवळील भागाचा त्यांच्या मध्यवर्ती सत्तेशी

फारसा संबंध नव्हता. त्यामुळे आम्हांला विशेष अडचण भासणार नव्हती.

आम्ही जो जो उत्तरेकडे जाऊ लागलो तो तो थंडीचे प्रमाण अधिकच वाढू लागले. प्राणवायूच्या अभावामुळे धाप लागू लागली. हवेत आर्द्रतेचा अभाव असल्यामुळे कातडी सालटू लागली. उललेल्या कातडीवर बर्फ जमून असह्य वेदना होऊ लागल्या. अती उंचीवर भयंकर थंडीतही तहान लागते व पाणी पिताच वांत्या होतात. आम्ही सारेच या त्रासाने बेजार झाली. मेंदूची शक्ती कमी झाल्यामुळे काहींना तर निरनिराळे भ्रम होण्यास सुरुवात झाली. त्यातच दुपारच्या परावर्तित किरणांचा दोघांना तडाखा बसला. एका भोटियाचे पाय बधीर झाले तर एका संरक्षकास हिमअंधत्व आले. या सर्वांना झांबूवर लादून पुढे न्यावे लागले.

पश्चिमेस ताकपाशिरी व पूर्वेस आज प्रसिद्धीस आलेले लोंगजू यांच्या दरम्यान असलेल्या एका अप्रसिद्ध खिंडीतून आम्ही तिबेटमधून प्रवेश करण्याचे ठरविले. ही खिंड अतिशय अवघड होती. स्थानिक रहिवासीदेखील हिचा उपयोग करण्याचे टाळीत. बर्फ सारखा पडत होता. चांगला १५ फुटांचा तरी थर झाला असेल. बर्फाचे मोठमोठे शिलाखंड कधीकधी वरून दरीत कोसळत. आम्ही खिंडीतून चालत असता एकदम थांबलो.

वर्मांच्या चेहऱ्यावर भीतीचा भाव होता! त्यांनी खुणेनेच आम्हांला वर पाहण्यास सांगितले.

ते दृश्य पाहून भयंकर थंडीतही मला घाम फुटला!

आमच्या समोरच उंच सुळक्यावरून बर्फाचा एक प्रचंड कडा खाली कोसळण्याच्या बेतात होता. दहा मजल्याएवढा हा प्रचंड हिमखंड घसरत घसरत एका बारीक सुळक्यास अडकला होता. वरचेवर पडणाऱ्या बर्फाने त्याचा दाब वाढत होता. आता तर तो थोड्याशा धक्क्याने...किंवा मोठ्या आवाजानेदेखील कोसळला असता! पुढचे भविष्य चक्क दिसू लागले. मागे फिरणेही तितकेच धोक्याचे होते. शिवाय हिमस्खलनानंतर ही पायवाटही बंद होण्याची शक्यता होती. सरित गंभीर होता. त्याने क्षणमात्र विचार केला आणि खुणेनेच पुढे जाण्याचा इशारा दिला.

मोठ्या हिमतीने आम्ही पुढे सरकलो. कुठलाही आवाज होत नव्हता. भोटियांनी जनावरांची तोंडे गच्च आवळून बांधली. न जाणो त्यांना ओरडण्याची लहर आली तर...! या गंभीर अवस्थेतही अशोषने वर्मांच्या तोंडाला फडके बांधण्याचा आविर्भाव केलाच! खरं म्हणजे तोंड बंद ठेवण्याची खरी आवश्यकता त्यालाच होती.

ईश्वराचे नाव घेऊन एकेकजण त्या सुळक्याखालून पलीकडे जाऊ लागला. क्षणोक्षणी सुळका आपल्या आधारापासून सुटत होता. प्रत्येकाच्या मनावर अतिशय ताण पडला होता. दोनतीन भोटिया स्त्रिया तर पलीकडे जाताच बेशुद्ध पडल्या.

आता माझी पाळी आली. ईश्वराचे नाव घेऊन पुढे पाऊल टाकले. सुळका

ओलांडण्यास अर्धे मिनिटही लागले नसेल, पण त्या क्षणी मनात कायकाय विचार आले असतील, कुणाकुणाच्या आठवणी आल्या असतील ते माझे मलाच माहीत !

जवळ जवळ सारे लोक सुळका पार करून आले. शेवटल्या संरक्षकाने सुळका ओलांडला आणि प्रचंड हिमखंड शंभर तोफा उडाव्यात तसा आवाज करीत कोसळला ! हजारो टन वजनांचे बर्फ ठिकऱ्या ठिकऱ्या होऊन दरीत उधळले गेले ! या तुकड्यांवर सूर्यकिरण पडून हजारो लहानमोठी इंद्रधनुष्ये तयार झाली ! हा भीषणरम्य चमत्कार आम्ही डोळे विस्फारून पाहिला !

नोव्हेंबरच्या २५ तारखेस आम्ही तिबेटच्या हद्दीत शि-पो (पो म्हणजे नदी) च्या काठी तळ ठोकला. शि-पो ही त्सांग–पो (ब्रह्मपुत्रा)ची उपनदी. शि-पोच्या काठाकाठाने ब्रह्मपुत्रा गाठण्याचा आम्ही विचार केला.

मॅकमोहन रेषेच्या उत्तरेस तिबेटचा प्रदेश म्हणजे एक छानसे पठार आहे. भारताच्या तुलनेने हा प्रदेश बराच सपाट आहे. या भागातील नद्याही आपल्या हिमालयीन नद्यांच्या मानाने संथ वाहतात. आम्ही झपाट्याने मार्ग आक्रमू लागलो.

परंतु संकटाशिवाय आमच्या नशिबी दुसरे काहीच नव्हते की काय कुणास ठाऊक ! का ईश्वर आमच्या ध्येयनिष्ठेची कसोटी घेत होता ? आमच्यावर एक नवेच संकट कोसळले !

त्या दिवशी मी, अशोष व शिवस्वामी ७–८ भोटिया व संरक्षक घेऊन पाहणीस निघालो. शि-पोच्या खोऱ्यात कुठे लोखंड मिळते की काय याचा आम्हांस अदमास घ्यावयाचा होता.

" या भागात लोखंड नक्की सापडेल ? " शिवस्वामीजींनी विचारले.

" का नाही ? " मी म्हणालो, " त्सांग-पो व शि-पोच्या दुआबात साऱ्या जगाला पुरेल एवढा लोखंडाचा साठा आहे. अर्थात् आपल्या या वरवरच्या पाहणीचा कितपत उपयोग होईल ही गोष्ट वेगळी ! "

आता शिवस्वामींना आपण इंजिनीअर असल्याचे आठवले. समोर शोधक बुद्धीने पाहत म्हणाले, " त्या समोरच्या टेकडीकडे पाहा ! कशी काळी कुळकुळीत आहे. त्यात लोखंड नक्कीच असणार ! "

" मग तुम्हीही काळे आहात..." अशोषनं पोरकट विनोद केला. वर्मा नसल्यामुळे त्याची संक्रांत शिवस्वामींवर वळली होती. सुदैवाने त्याने हा विनोद बंगालीत केल्यामुळे अय्याला तो कळला नाही !

मी काही न बोलता शोधनसामग्री जुळविण्याच्या तयारीला लागलो.

"आणि काहो..." अशोषचे ते वाक्य अर्धवटच राहिले. त्याच्या जवळचा एक

मोटिया एकदम आडवा पडून हातपाय झाडू लागला. चिरक्या आवाजात एक संरक्षक ओरडला, " सावधान, आडवे व्हा ! "

आम्ही सारे जमिनीवर पालथे पडलो. मी सरपटत त्या मोटियाकडे गेलो. तो गतप्राण झाला होता !

एका बाणाने त्याचा प्राण घेतला होता !

आता आमच्यावर सर्व बाजूंनी बाणांचा वर्षाव होऊ लागला. आमच्या संरक्षकांनी मोर्चे धरले. पण शत्रूने आम्हांस पूर्णपणे घेरले होते. पहिल्याच फेरीत त्यांनी-आमचे ३ संरक्षक व आणखी दोन मोटियांना ठार केले. त्यांचे किती मेले ते समजण्यास मार्ग नव्हता. कारण ते सुरक्षित जागी होते.

थोड्याच वेळात आम्हांला त्यांनी कैद केले !

आम्हांला कैद करणारे खेरवा जमातीतील लोक होते. हे खम्पा जमातीपैकी पण अधिक रानटी व क्रूर होते. एकेक प्राणी किळसवाणा ! ओकारी येईल असा विद्रूप चेहरा पुढील दोन दात पाडून घेतल्यामुळें अधिकच भेसूर वाटत होता. त्यांनी डोक्यावर केस चक्राकार बांधले होते. आपल्याकडे चिपळूणकरी पगडी घालीत तसे ! त्यांनी किती दिवसांत आंघोळ केली नव्हती कुणास ठाऊक ! त्यांच्या अंगाच्या वासातच एखाद्याचा जीव घेण्याची शक्ती होती ! ते आम्हांला कुठे नेत होते ते समजत नव्हते. ते आमचे काय करणार याचा उलगडा होत नव्हता. आम्ही किती वेळ चालत होतो याचेही आम्हांला भान नव्हते. काही वेळाने दूरवर, ढोल-नगाऱ्याचा आवाज कानी ऐकू लागला. हळू हळू आवाज स्पष्टपणे ऐकू येऊ लागला. डोंगरांच्या एका कोपऱ्यातून बारीक धूर बाहेर पडल्याचे दिसू लागले. जवळपास खेरवांची वस्ती असावी.

आम्ही एका खेड्याजवळ पोहोचलो. वेशीजवळ बरीच बाया-मुले शिकार पाहण्यासाठी धावत आली. आम्हांला पाहताच कुतुहलपूर्वक आमच्याकडे बोटे करून आपसात काहीतरी बोलू लागली.

संध्याकाळ झाली. थंडीचा जोर वाढू लागला. लगेच आमच्या समोर आगटी पेटविण्यात आली. सारे खेरवा लोक आम्हांला मध्ये घेऊन आगटीभोवती फेर धरून नाचू लागले.

" अशोष, काय होणार आहे आपले ? " मी प्रश्न केला.

उत्तरादाखल अशोषने माझा हात हळूच दाबला. जिवाचे पाणी होण्याचा हा प्रसंग. पण अशोष शान्त होता. साध्या विनोदाला खुदकन हसणारे, दुसऱ्याच्या यातनेने रडणारे, हे पोर या भयंकर प्रसंगी गंभीर होते. आणि मी भेदरलो होतो. संकटाच्या प्रसंगीच माणसाची धैर्याची खरी पारख होते म्हणतात !

रात्रभर ते लोक आगटी भोवती नाचत होते. त्यांचा नाचही त्यांच्यासारखाच भयानक व हिडिस होता. ढोल व तुताऱ्यांचे आवाज छाती भेदून जात होते. कसला

विधी होता हा ?

आम्हांला बळी तर देणार नव्हते ?

सकाळ होत आली तेव्हा त्यांच्या नाचाचा वेग वाढला. झांजा, ढोल, तुताऱ्यांचे कर्णकटू सूर वाढले. हळूहळू नाचणारे खेरवा आता जलद पावलं टाकू लागले. हातातील भाले उंच करून त्यांची टोके आकाशात एकत्र मिळविली. ३०-४० भाल्यांचा एक तंबू तयार झाला. ढोलाच्या तालावर हे भयानक लोक तांडव नृत्य करू लागले !

गाता गाता ते एकदम थांबले !

साऱ्यांच्या नजरा पूर्वेकडे वळल्या. मीही तिकडे पाहिले.

समोरच्या टेकडीवर वर्मा व कुणाल उभे होते.

दोघेच ! आणि नि:शस्त्र ! !

सारे खेरवा शस्त्र सावरून तयार झाले. वर्मा त्यांच्याकडे पाहत निर्भयपणे टेकडी उतरू लागले. पाठोपाठ कुणालही टेकडी उतरू लागला. वर्मांची मूठ वळलेली होती. कुणाल 'ॐ पदमेन्' चा मंत्र जोरजोरात म्हणू लागला.. कुणालचा मंत्रघोष ऐकताच शस्त्रे मागे गेली. बाजूस सरकून लोकांनी वर्मांना वाट करून दिली.

हळूहळू दोघे रिंगणात येऊन उभे राहिले. वर्मांनी क्षणभरच आमच्याकडे पाहिले. नंतर ते निर्भयपणे चालत टोळीप्रमुखाकडे गेले. त्यांनी आपली मूठ त्यांच्यापुढे उघडी केली.

ते मीठ होते !

मीठ पाहताच प्रमुखाचे डोळे विलक्षण आनंदाने चमकले. मानव सुधारलेला असो वा रानटी पण प्रत्येकाला मीठ आवश्यकच आहे. समुद्रापासून हजारो मैल दूर असलेल्या या प्रदेशात मीठ म्हणजे अप्रूप वस्तू ! वर्मानी हे बरोबर हेरले होते. त्यांची व प्रमुखाची खुणाखुणी झाली. वर्मांनी खूण करताच टेकडीमागून भोटियांनी मिठाच्या गोण्यांनी लादलेले चार झोंबू आणले.

मिठाच्या खंडणीवर आमची सुटका झाली. आम्ही पुढे होऊन वर्मांना घट्ट मिठी मारली. काल आम्ही रात्री तळावर परत आलो नाही म्हणून सर्वांना काळजी वाटू लागली होती. चारी बाजूस शोधक तुकड्या पाठविण्यात आल्या होत्या. आवाजाच्या रोखाने वर्मा आमच्या दिशेस आले. आम्ही रानटी टोळयांच्या तावडीत सापडलो असू असा त्यांचा कयास होता व म्हणून खंडणीसाठी त्यांनी अप्रूप मीठ बरोबर घेतले होते.

याच मिठाने आमचा अचानक जीव वाचविला.

तिबेटच्या पुढील प्रवासात सांगण्यासारखे विशेष काही घडले नाही. शि-पो व नंतर त्सांग-पोच्या काठाने डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात आम्ही ग्यालापेरी

शिखर गाठले. यापुढे त्सांग-पो उत्तरेकडे जाऊन नामचा बारवा नावाच्या २५,४४५ फूट उंचीच्या शिखरास वळसा घालून दक्षिणाभिमुख होते. आम्ही नदीचा काठ सोडून सरळ पूर्वेचा रस्ता धरला व थोडयाच वेळात पुन्हा त्सांग-पोच्या काठी आलो.

येथून भारतीय हद्दीतील कार्बो सरळ अंतरानं पाचच मैल दूर होते.

एका दुपारी आम्ही सारे एका टेकडीवर उभे होतो. समोर भारतीय हद्दीतील टेकडया होत्या. आम्ही उभे असलेल्या टेकडीच्या पायथ्याजवळून त्सांग-पो ऊर्फ ब्रह्मपुत्रा भारतीय हद्दीत प्रवेश करीत होती. सरहद्द भागात तिला दिहांग हे नाव आहे. आम्ही उभे असलेल्या तिबेटी टेकडीवर शेवाळी वनस्पती व झुडपे होती भारतीय टेकडयांचा तिबेटकडील उतार मात्र निष्पर्ण व बर्फमय होता. केवळ काही यार्डांचे अंतर असलेल्या दोन भूभागातील विषमता पाहून मला आश्चर्य वाटले.

पण वर्मांनी त्याचा खुलासा केला. ते म्हणाले, " आपण तिबेटी टेकडयांच्या दक्षिण उतारावर उभे आहोत ते भारतीय टेकडयांचा उत्तरेकडील उतार आपल्या-समोर आहे. कर्कवृत्ताच्या उत्तरेस सूर्य कधीच डोक्यावर येत नाही. कर्कवृत्त कलकत्त्याजवळून जाते म्हणून तुम्हांला या गोष्टीचा अनुभव आहेच. कलकत्त्याच्या उत्तरेस सूर्यकिरणे तिरपी पडतात. हिमालयीन भागांत सूर्यकिरणांचा फायदा फक्त दक्षिणमुखी टेकडयांनाच मिळतो. उत्तराभिमुखी उतारावर सूर्यकिरणे पडत नाहीत, त्यामुळे या उतारावर बर्फाचा खच पडलेला असतो ! "

( नुकताच चिनी आक्रमकांना याच नैसर्गिक अनुकूलतेचा फायदा मिळाला. )

सरित सांगू लागला, " आपल्यासमोर काही अंतरावर आपला भारत आहे. आपली मायभूमी आपल्याला बोलवत आहे ! "

बोलता बोलता सरित हेलावला. घोगऱ्या आवाजात तो पुढे बोलू लागला,

" मित्रांनो, आपण मनात बाळगलेल्या ध्येयपूर्तीची वेळ आता आली आहे. आपला कष्टमय प्रवास संपला, पण त्याहीपेक्षा कठोर परिश्रम आता आपल्याला करावे लागणार आहेत. यापुढे आपली बुद्धिमत्ता, योजकत्व, संघटनाचातुर्य या साऱ्या गुणांची कसोटी लागणार आहे. "

तो माझ्याकडे वळून म्हणाला,

" आमोद, आता तुझं काम येथून सुरू होत आहे. येथून भारतीय हद्दीत कार्बोच्या दक्षिणेस दिहांगच्या एका उपनदीच्या काठी आपला तळ राहील. शिवस्वामी व तुझ्याकडे शस्त्रनिर्मितीचे काम आहे. तिबेट हद्दीतून लोखंड मिळण्याची सोय झाली आहे. "

" आणि हत्यारे पोचविणार कशी ? " अशोष अंग शहारून म्हणाला. " आलो त्याच रस्त्याने तर नव्हे ना ? "

" नाही " सरित म्हणाला. " सरदारजींनी त्याची सोय केली आहे. सादियाच्या

क्रांतिकारक मंडळाने 'आसाम टिंबर कंपनी' च्या संचालकांशी संधान बांधलं आहे. या कंपनीचा दिहांगच्या जंगलातून इमारती लाकूड गोळा करण्याचा मक्ता आहे. त्यांच्याकरवी आपली हत्यारे सादियाला पोचतील. सादियाहून नागा टेकड्यांतून ही शस्त्रास्त्रे आजाद हिन्द सेनेच्या हाती पडतील ! "

हा सारा तपशीलवार बेत ऐकून मी चकितच झालो. किती थोड्या काळात सरित व त्याच्या मित्रांनी ही साखळी उभी केली होती. आमचा कलकत्ता ते कार्बो हा प्रवास व हत्यारांची कार्बो ते ब्रह्मदेशपर्यंत वाहतूक ! सारेच अचाट ! सारेच अवाढव्य ! ! सारेच विलक्षण ! ! !

१९४३ च्या शेवटच्या रात्री आम्ही सारे एकत्र जमा झालो. नव्या वर्षाच्या सुमुहूर्तावर आम्ही भारतीय भूमीत प्रवेश करणार होतो. साऱ्यांची अधीरता वाढली होती. आमची छाती जोरात उडत होती. आपली प्रिय मातृभूमी आम्हांला बोलावत आहे असे वाटत होते. आमच्यापासून केवळ हाकेच्या अंतरावर भारतीय मुलूख होता. भारताचाच भाग असलेला परंतु इंग्रजांच्या प्रत्यक्ष शासनाखाली नसलेला स्वतंत्र मलूख आम्हांला बोलावत होता. खरं म्हणजे आम्हांला भारतीय हद्द सोडून पुरे दोन महिनेही झाले नव्हते. पण हा विरहकाल केवढा मोठा भासत होता ! मायभूमीची ओढ काय असते हे ज्याने अनुभवले त्यालाच कळेल !

घड्याळाचा काटा हळूहळू पुढे सरकू लागला. १२ ला पाच मिनिटे कमी असताना सरित उभा राहिला. त्याने छोटेसे भाषण केले.

"मित्रहो ! कठीण प्रसंगांना तोंड देऊन आज आपण भारतीय हद्दीत प्रवेश करीत आहोत. थोड्याच वेळाने नवीन वर्ष सुरू होईल. वर्ष संक्रमणात आपण स्वतंत्र भारतात प्रवेश करू. स्वतंत्र भारत ! जेथे गुलामशाही नाही. पिळवणूक नाही ! जेथे शांती, समृद्धी व समता नांदते आहे असा भारत आपल्याला निर्माण करावयाचा आहे. हा प्रयत्न अवघड आहे. या ध्येयासाठी हजारो वीर आपल्या प्राणांची आहुती देत आहेत. या समरयज्ञात आपलाही हविर्भाग असला पाहिजे ! बोला, आजाद भारत..."

"जिंदाबाद"च्या प्रचंड घोषणांनी आम्ही साथ दिली.

नव्या वर्षी भारतमाता, आजाद हिंद सेना व नेताजींच्या जयजयकारात आम्ही साष्टांग नमस्कार घातला. ती पवित्र माती उचलून आपल्या कपाळास लावली व भारतीय हद्दीत प्रवेश केला.

सारे जग युद्धाच्या वणव्यात होरपळत होते. जपानची डुक्कर मुसंडी चालूच होती. १९४४ च्या पहिल्या महिन्यात ब्रिटिश फौजांची आराकानमध्ये दाणादाण करून जपानी सेना भारतीय हद्दीकडे सरकत होती. ब्रिटिश व अमेरिकन


सैन्य हा लोंढा अडविण्याचा प्रयत्न करत होते. जपानने कलकत्त्यावर हल्ला करण्यासाठी दोन आघाड्या उघडण्याचा बेत केला होता. एक आघाडी चितगाँगमार्गे व दुसरी इंफाळ-गोहत्तीमार्गे. अशी ती योजना होती. ब्रिटिशांनी चितगाँगच्या संरक्षणाची कडेकोट तयारी तयारी केली होती. पण भौगोलिक अडचणींमुळे दोस्तांना आसाम भागात फार मोठ्या हालचाली करता येत नव्हत्या, हे हेरून जपानने याच भागातून घुसण्याचा विचार केला. जपानी सैनिक जंगलपठारांतून लढण्यात वाकबगार व अन्नपाण्याबाबत स्वावलंबी असतो. त्यामुळे जपानला ही आघाडी लढविणे सोपे जाणार होते. जपान्यांनी भारतात घुसणे नेताजींना मंजूर नव्हते. जपान काही आपल्यावर उपकार करण्यासाठी लढत नाही. तो जिंकलेला प्रदेश मुळीच सोडणार नाही हे इंडोचायना, ब्रह्मदेश यांच्या उदाहरणावरून त्यांना स्पष्ट दिसत होते. जपान्यांनी भारत व्यापल्यास भारताची स्थिती आगीतून निघून फुफाट्यात पडल्यासारखी होणार हे नेताजी जाणून होते. त्यांनी जपानी सर्वाधिकारी जनरल टोजो याला जपानी सेनेचा भारतात प्रवेश आपण सहन करणार नाही असे स्पष्टपणे बजावले. भारताची मुक्तता भारतीयच करतील. ते काम आजाद हिंद सेनेवर सोपवा असे त्याला कळविले.

या प्रसंगानंतर जपान व आजाद हिंद सरकारचे संबंध अतिशय ताणले गेले. जपानची मदत न घेता स्वातंत्र्यलढा स्वतःच्या बळावर लढविण्याचे नेताजींनी ठरविले. परंतु ऐनवेळी ज. टोजोला शहाणपणा सुचला. नेताजी व जनरल मुतागुची यांच्यांतील वाटाघाटी यशस्वी होऊन भारतीय भूमीवर भारतीय सेनेनेच प्रवेश करावा व जपानने त्यांना योग्य ती मदत द्यावी असा करार झाला !

अत्यंत उत्साहाने आजाद हिंद सरकार स्वातंत्र्य संगराच्या तयारीस लागले. ले. क. ए. सी. चॅटर्जी यांच्या नेतृत्वाखाली ५० हजार सैनिक भारतीय सीमेजवळ ब्रह्मी हद्दीत मेमीनो येथे जमा झाले. या सेनेसाठी तातडीने शस्त्रपुरवठा करण्याचा आम्हांला हुकूम झाला.

कार्बोच्या पूर्वेस काही मैलांवर उंच पहाडांनी घेरलेल्या किर्रर जंगलात, आम्ही आमच्या कारखान्याची उभारणी केली होती. आम्ही आमच्या वसाहतीस 'आजाद नगर' असे नाव दिले. त्या भागात राहणाऱ्या मिन्यांग जमातीच्या मदतीने आम्ही आमचे काम दोन महिन्यांतच उरकले. 'आसाम टिंबर कंपनी'चा डेपो जिडोजवळ होता. जंगलातून तोडून आणलेले ओंडके प्रथम जिडोस आणण्यात येत. तेथून त्याचे तराफे करून दिहांगच्या पात्रात सोडण्यात येत. कंपनी ते सादियाला उचलून घेत असे. तसा दिहांगचा प्रवाह काही सपाटीवरून वाहत नाही. मध्येमध्ये बरेच खडक व धबधबे आहेत. अशा ठिकाणी कंपनीने चौक्या बसविल्या होत्या. तराफे तेथे येताच हत्तीच्या मदतीने ते वर काढून पुन्हा खालच्या प्रवाहात सोडण्यात येत.

या तराफ्याच्या मदतीने आमची शस्त्रे पाठविण्यात येणार होती. जिडोजवळ



जिवापाड मेहनतीनं आमचा कारखाना उभा झाला.

दिहांगला मिळालेली उपनदी आमच्या कारखान्याजवळून जात होती. आमच्या भागात आम्हीदेखील कंपनीसाठी तराफे बनविण्यास सुरुवात केली. फेब्रुवारीचा संपूर्ण महिना आमचे हे निर्माण कार्य चालू होते.

सारी तयारी झाली. मध्यंतरी क. रामसिंगांनी सादियामार्गे येऊन आमचे काम पाहून समाधान व्यक्त केले. वेळ अतिशय थोडा होता. जपानने मदतीचे आश्वासन दिले होते पण मदत देण्यात तो अंगचोरपणा करीत होता. अशा वेळी आजाद हिंद सेनेची सारी भिस्त आमच्यावर होती. आम्ही जिवापाड मेहनत करीत होतो. रात्रंदिवस आम्हांला झोप नव्हती. शिवस्वामी तर अतिश्रमाने आजारी पडले पण तशाही स्थितीत पठ्ठ्याने थोडीही विश्रांती घेतली नाही.

अखेर तो दिवस उजाडला !

शस्त्रास्त्रांचा ताबडतोब पुरवठा करण्याचा आम्हांला आदेश मिळाला. सर्वांना हुकूम गेले. साखळी कार्यप्रवण झाली. तयार केलेल्या तराफ्यांच्या खालच्या बाजूस शस्त्रे बांधण्यात आली. कंपनीच्या नोकर वर्गात आमचे काही लोक होते. ते लोक तराफ्यावर चढले. अशोषही त्यांच्याबरोबर चढला आणि भारतमातेच्या जयजयकारात हे तराफे पाण्यात लोटण्यात आले. आमचे ध्येय साध्य होत असल्याचे दृश्य आम्ही पाहत होतो. भरल्या डोळ्यांनी आम्ही अशोषला निरोप दिला.

जिडोला कंपनीने साऱ्या तराफ्यांना क्रमांक दिले. त्यातील आमच्या तराफ्यांना क्रमांक आम्ही सादियाला संदेशाद्वारे कळविले. ठरल्या वेळी तराफे सादियाला निर्विघ्नपणे पोचले. क्रांतीमंडळाने ती शस्त्रास्त्रे हस्तगत करून नाग लोकांच्या मदतीने त्युएनसांगच्या जंगलातून ब्रह्मदेशातील शिंगब्वियांग (Shingbwiyang)ला व तेथून मितक्यांग (Myitkying)ला पोचविली. मेमिन्योचा आजाद हिंद

सेनेचा तळ येथून जवळच होता.

दिनांक १९ मार्च ! भारतीय इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदला जाणारा दिवस ! आजाद हिंद सेनेने या पवित्र दिवशी भारतीय हद्दीत समारंभपूर्वक प्रवेश केला ! राष्ट्रपित्याच्या आशीर्वादाने, नेताजींच्या आदेशाने भारताच्या स्वातंत्र्य सेनेने भारतमातेच्या श्रृंखलेवर पहिला घाव घातला :

"शेरे हिंद आगे बढ मरनेसे तू कभी न डर
आसमाँपे उठाके सर ..जोशे कदम बढाये जा ! !"

इंग्रजांच्या प्रतिकारास न जुमानता ही सेना पुढे निघाली. घनघोर युद्धानंतर २१ तारखेस कोहिमा ही नागा राज्याची आजची राजधानी जिंकून घेतली ! इंफाळ तर तावडतोब पडले होते. कोहिमा व इंफाळवर व्याघ्रचिन्हांकित भारतीय राष्ट्रध्वज अभिमानाने फडकू लागला ! मुक्त भूमीवर आमचा राष्ट्रध्वज ! सारी जनता भारतीय सैन्याच्या अतुल पराक्रमाने थरारून उठली. कळीकाळास आमंत्रण देणारी सेना ! अरे, मृत्यूचं भय कोणाला ! ज्याला जीवनाची आसक्ती आहे त्याला ! ज्याने आपले जीवनच देशासाठी वाहिले त्याला कसले आले आहे भय ! भारतीय सेनेच्या शौर्याची कहाणी ऐकताच लोकांची छाती गर्वाने फुगून आली. नसानसांतून गरम रक्त वाहू लागले ! साऱ्या भारतात एक आगळचा चैतन्याचा संचार झाला. भारताचा एक कोपरा स्वतंत्र झाला आणि इतर कानाकोपऱ्यांतून इंग्रजांचा दरारा पार लुप्त झाला ! सारे लोक आजाद हिंद सेनेचे स्वागत करण्यास अधीर झाले. केव्हा येणार तो मंगल क्षण ! केव्हा ?

भारतीय सेनेने आपले काम फत्ते केले. नेताजींच्या इच्छेप्रमाणे भारताचा स्वातंत्र्य संगर भारतीयांकडूनच सुरू झाला होता. नेताजींना दुसऱ्याच्या मदतीने मिळालेले स्वातंत्र्यही नको होते. लढून मिळविले तेच स्वराज्य ! "रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले ?" लढणाऱ्यालाच स्वातंत्र्याची किंमत कळते. कारण ती त्याने स्वतःच्या रक्ताने दिलेली असते ! शिराळशेटांना फुकटचे स्वातंत्र्य दिल्यास त्याची त्यांना किंमत काय !

नेताजींनी मुक्त प्रदेशास भेट दिली. स्वातंत्र भारताचे नागरिक आपल्या पहिल्या राष्ट्रप्रमुखाच्या दर्शनासाठी वेडे झाले. त्यांनी नेताजींचा जयजयकार केला. त्यांची सुवर्णतुला केली ! रक्ताने प्रतिज्ञापत्रके लिहून दिली ! नेताजी सर्वत्र हिंडले. मोर्चावर जाऊन त्यांनी शूर सैनिकांना उत्तेजन दिले. इस्पितळात जाऊन जखमी सैनिक पाहिले. जखमी सैनिकांच्या वेदना पाहून त्यांच्या डोळ्यांत पाणी आले. स्वातंत्र्याच्या इच्छेने झपाटलेले हे सैनिक मोबदल्याची अपेक्षा न करता देशासाठी प्राण देत होते ! अशा अनेक शूर सैनिकांची किंमत अमोल होती. त्यांचे शौर्य शस्त्रांअभावी वाया जाऊ नये म्हणून आम्ही प्रयत्नांची पराकाष्ठा केली. आमची शस्त्रे वेळेवर त्यांच्या हाती पडली. नेताजींनी आमचे अभिनंदन केले. नेताजींच्या

शब्दांनी आमचा उत्साह शतगुणित झाला. इंफाळ व कोहिमा मुक्त झाल्यामुळे शस्त्रास्त्रे आता सरळ आघाडीवर रवाना होऊ लागली. त्यामुळे स्वातंत्र्य सैनिकांची प्रहारशक्ती वाढली. त्याच वेळी क्रांतिकारक दलाने बंगाल–आसाम भागात विध्वंसक उपायांनी ब्रिटिश सत्ता खिळखिळी करून टाकली. आता शेवटचा एकच घाव घातला की कलकत्ता !

...आणि मग चलो दिल्ली ! !

मानवाच्या सर्व इच्छा, आकांक्षा जशाच्या तशा पूर्ण झाल्या असत्या तर जगाचे नंदनवन झाले असते. पण वास्तवात तसे घडत नाही. सत्कर्मांत राक्षसच आडवे येतात असे नसून कधी कधी ईश्वरही येतो असे म्हटले पाहिजे. नाहीतर आजाद हिन्द सरकारवरही संकटपरंपरा कशी कोसळली असती ! जर्मनीच्या पराभवानंतर जपानने काही दिवस नेट धरला, पण पश्चिम आघाडीवरून मुक्त झालेले दोस्तांचे लाखो सैनिक पूर्व आघाडीवर उतरू लागले तसा त्याचा धीर सुटू लागला. बंगालमध्ये अमेरिकन सैन्य उतरले. आसामचा कच्चा दुवा इंग्रजांनी मजबूत केला. आजाद हिन्द सेनेवर २ लाख ब्रिटिश अमेरिकन सैनिक तुटून पडले. आमच्या पुरवठ्याच्या राजमार्गांवरून दोस्त सैन्याचे रणगाडे धावू लागले. आमची पुरवठा साखळी तुटली. पुन्हा त्युएनसांगमार्गाने पुरवठा करण्याचा आम्हांला आदेश झाला! बिचारा अशोष फेऱ्या मारून थकून गेला. सादिया मेमिनोस नागा पहाडातून टोळीवाल्यांबरोबर जाऊन आपल्या सेनेला पुरवठा करण्याची त्याने कोशिश केली. त्याने हे जोखमीचे काम घेऊ नये म्हणून त्याला सर्वांनी सांगून पाहिले पण त्याने कुणाचेच ऐकले नाही आणि त्यानेच घात झाला. इंग्रजांच्या टेहळणी तुकडीशी चकमक झडून अशोष ठार झाला !

कॅ. गुरुनाथ हल्दरही त्याच तुकडीत होते. किर्र जंगलातून ही तुकडी जात असताना इंग्रजी तुकडीने त्यांच्यावर एकदम हल्ला केला. हल्दरने लाइनिंग पोझिशन घेऊन प्रतिकार करण्याचा आदेश दिला. कोठून तरी कोंडी फोडून निघून जाता येईल का हे चापचण्याचा त्यांचा हेतू होता. रस्ता शोधणाऱ्या तुकडीला आपले काम करता यावे म्हणून एका अशोषने ४ साथीदारांच्या मदतीने मारा करून इंग्रजी तुकडीला अडवून ठेवले. वाट शोधणाऱ्या तुकडीस वाट मिळाली. परंतु अशोष घायाळ होऊन बेशुद्ध पडला होता. त्याला उचलून सुरक्षित जागी नेण्यात आले. थोड्या वेळाने तो शुद्धीवर आला. त्याला जबरदस्त जखम झाली होती. गोळी छातीतून आरपार निघून गेली होती. भयंकर रक्तस्राव होत होता. तो हल्दरना कसाबसा म्हणाला ' मित्रांना..,सांग !...मी कर्तव्यात...कसू . र...केली...नाही !' हे अशोषचे शेवटचे वाक्य ! अशोषचे शेवटचे वाक्य ! अशोषला वीरगती मिळाली.

जन्मभर दारिद्र्य, संकटे आणि यातना भोगणारा अशोष! घाडसाच्या कार्यात आघाडीवर राहणारा अशोष हौतात्म्याच्या कार्यातही आघाडीवरच राहिला!

अशोषच्या मृत्यूची वार्ता आम्हांला वज्राघातासारखी वाटली. खुरटलेल्या त्या शरीराचा पण उरात अभंग आवेश असलेला अशोष! हसरा अशोष, शूर अशोष! आमच्या कारखान्यावर छापा घालणारा धाडसी अशोष! खेरवांच्या तावडीत सापडल्यावरही न घाबरता बेडरपणे उभा राहिलेला अशोष! त्याच्या मृत्यूने साऱ्यांना अतिशय दुःख झाले. वर्मा तर धाय मोकलून रडले! अशोषच्या मृत्यूने-आमचा एक आधार गळून पडला. आजाद हिन्द सेना आणि आमच्यातील एक दुवा निखळला!

काळ कोणासाठी थांबत नाही. अशोषच्या मृत्यूचे दुःख गिळून आम्ही आमचे काम पुढे चालू केले. आजाद हिन्द सेना लढत होती पण त्यांची शक्ती अपुरी पडत होती. जपानी सेना ब्रह्मदेश सोडत होती. भारतीय सेनेच्या पिछाडीस पोकळी निर्माण होत होती. आघाडीवर दोस्त सैन्याचा दाब वाढत होता. अपुऱ्या सामग्री-निशी आमचे सैन्य लढत होते. लढता लढता त्यास मागे हटावे लागत होते. हटता हटता लढावे लागत होते. आघाडी दूर गेली त्याच प्रमाणात शस्त्रपुरवठा करणे आम्हांला अवघड झाले! त्यांतच यंदाचा पावसाळा नेहमीपेक्षा लवकर सुरू झाला. होते नव्हते ते मार्ग विस्कळित झाले. दिहांग दुथडी भरून वाहू लागली. त्युएनसांगचे पर्वत उभे झिरपू लागले! ईश्वरच कोपला तेथे मानव काय करणार! आजाद हिन्द सेनेस कुमक घेऊन खुद्द जनरल शहानवाजखान निघाले पण ऊखरूल येथे ते विषमज्वराने आजारी पडले. इकडे आमचा पुरवठामार्ग पूर्णपणे बंद झाला. भारतीय सेना नाइलाजाने मागे हटली. नेताजींचे दुर्दैव की स्वातंत्र्यवीरांची पुण्याई कमी पडली का देशाचे नष्टचर्य अजून संपले नव्हते म्हणून असेल, पण भारतीय स्वातंत्र्याचा हा प्रचंड प्रयत्न फसला! ८६ वर्षांनंतर उभे राहिलेले दुसरे स्वातंत्र्ययुद्ध अयशस्वी झाले.

१७ ऑगस्टला रंगून येथे झालेल्या आझाद हिन्द सरकारच्या बैठकीत स्वातंत्र्य संगर थांबविण्याचा निर्णय घेतला. जपानच्या शरणागतीनंतर एकेकाने लढण्यात अर्थच नव्हता. त्याच दिवशी नेताजी जपानला जाण्यास निघाले पण नियतीची इच्छा वेगळी होती. स्वातंत्र्यलढ्याच्या युद्धपर्वास या दुर्दैवी घटनेने पूर्णविराम मिळाला.

आम्ही उभारलेला कारखाना स्वहस्तेच उध्वस्त करून टाकला. त्या वेळी मनाला काय यातना झाल्या असतील त्या आमच्या आम्हांला माहीत. एका अंधाऱ्या रात्री आम्ही सादियाला परत आलो. आम्ही जिवंत परतलेले पाहून सर्वांनाच आश्चर्य वाटले. आम्हांला रानटी टोळ्यांनी बंदिवान केले होते हा खुलासा सर्वांनाच पटला!

आम्ही परत आपल्या घरी आमच्या माणसांत आलो. या पुढचा आमचा इतिहास काहीच सांगण्यासारखा नाही. काही काल अलौकिक जिणं जगलो तेच खरं आयुष्य ! बाकी आयुष्यात आणि कुत्र्या-मांजराचा जीवनांत काळीच फरक नाही. आजची सारी कामगिरी गुप्तपणे झाली होती. त्यामुळे आमच्या कर्तबगारीची लोकांना जाणीव झाली नाही. लोकांच्या दृष्टीने आम्ही आज सामान्य माणसे आहोत. क्वचित् 'राजनिष्ठ' म्हणून लोकांच्या उपेक्षेचा व कुचेष्टेचा विषय आहोत. आता मी माझ्या घरी माझ्या कुटुंबियांसह कालक्रमण करीत आहे. फाळणीमुळे सरित आपल्या जहागिरीस मुकला. तो आता कलकत्त्यास कसले-तरी दुकान उघडून बसला आहे. वर्मा शिवस्वामी कोठे आहेत हे मला माहीत नाही. कदाचित् वर्मा कुठल्याशा शाळेत शिक्षक असतील. शिवस्वामी लहानसा कॉंट्रॅक्टर असेल ! स्वतंत्र भारतात, आझाद हिंद सेनेचे हजारो सैनिक, क्रांतिकारक, स्वतंत्र वीर उपेक्षेचे जीवन जगत आहोत. आम्हीही त्यांपैकीच ! आम्ही कुठल्याही वैयक्तिक लाभाच्या आवेशाने स्वातंत्र्य संगरात सामील झालोच नव्हतो. लोक आम्हांला विसरले. विसरू द्या ! आम्हांला विसरा पण आमच्या कार्याची जाणीव ठेवा ! हजारो हुतात्म्यांच्या त्यागाने उजळलेली स्वातंत्र्याची ज्योत अशीच तेवत ठेवा ! त्यात आम्हांला सर्व काही मिळाले !

[ समाप्त ]


खास प्रवासी डब्याने आलिशान व्यवस्था

२४ जुलै १९६६

काशी हरद्वार यात्रा

२१ ऑगस्ट १९६६

भू–नंदन काश्मीर सहल

**राजकमल यात्रा कंपनी**

मालक–कर्वे बंधू

६०५ शनवार, लोखंडे तालमीजवळ, पुणे २.
फोन : ५४४५७.

# जे नव्हते ध्यानी मनी

## We never meant to go so far

## या माविस रॉन्सनकृत पुस्तकाचा परिचय

लेखांक सहावा

[ भारतातील मुक्काम आटोपून माविस व बार्बारा रंगूनकडे निघाल्या... ]

माविस व बार्बारा यांनी रंगूनला काही दिवस मुक्काम केला. माविसची क्लारा ही मैत्रीण रंगूनला राहत असल्यामुळे दोघी तिच्याकडेच उतरल्या. त्या वेळी ब्रह्मदेशात सुस्थिर असे राज्य नव्हते. रंगून-मंडाले रेल्वेमार्गही सुरक्षित नव्हता. रंगूनच्या भोवतालच्या काही विभागांत तर राज्यव्यवस्था पूर्णपणे कोसळलेली होती. निरनिराळ्या पक्षांचे सोयर सांगणाऱ्या सशस्त्र टोळ्या धुमाकूळ घालीत त्या भागात वावरत होत्या.

ब्रह्मदेशाच्या लोकांना जवळून पाहावयाचे तर शहरातच रेंगाळून उपयोग नव्हता. क्लाराने सुचवले की मॉंगनाय या रंगूनपासून सुमारे दोनशे मैलांवरील गावात तिच्या चांगल्या ओळखीचा स्वाबवा आहे. स्वाबवा म्हणजे गावाचा जणू पाटीलच. फक्त ही पाटीलकी बऱ्याच गावांची असते. मॉंगनाय ही मॉंगनाय राज्याची राजधानी होती. शान टेकड्यांत अशी बरीच छोटी छोटी राज्ये निर्माण झालेली होती. अशा राज्यांच्या सुलतानालाच स्वाबवा म्हणत असत. या सुलतानांना ब्रह्मदेशात राहणे पसंत नव्हते. त्यांचा ओढा लाओस, थायलँड किंवा चीन अशा शेजारच्या देशांकडे होता. ही सर्व मंडळी मूळची चीनच्या युनान प्रांतातून आलेली होती. त्यांनी म्हणजे त्यांच्या पूर्वजांनी कर्तबगारीवर ही संस्थाने शान टेकड्यांत ठिकेठिकाणी निर्माण केली होती.

मॉंगनायला जाण्यासाठी दोघी एका लॉरीत बसल्या. क्लाराने सांगितले की, प्रवास लॉरीतून केला म्हणजे वाटेत दरोडेखोर भेटले तरी त्रास होत नाही. मोटारींतून जाणाऱ्यांना श्रीमंत समजून या टोळ्या लुटतात.

लॉरीतला प्रवास जवळजवळ तीन दिवस निर्वेधपणे झाला. मग एका पहाटे पुढच्या सीटवर डुलक्या खात असताना लॉरी एका प्रचंड हिसक्याने थांबली. म्हणून माविसने डोळे उघडले तो समोर सात-आठ हत्यारबंद लोकांनी लॉरी अडवली होती. लॉरीला गराडा घालून ते सर्वांना खाली उतरण्यास सांगू लागले.

ड्रायव्हर खाली उतरला व त्यांच्याशी हुज्जत घालून परत आला व त्याने सांगितले,

"या लोकांना तुमची चीजवस्त नको आहे. त्यांना लॉरीच हवी आहे. तुम्हांला इथेच उतरावे लागेल. हे लोक लष्करी मोहिमेवर आहेत."

सर्वजण पहाटेच्या काळोखात खाली उतरले. गराडा दिलेल्या लोकांनी लॉरीत उड्या मारताच धुरळा उडवीत लॉरी निघून गेली.

अंधारात दूर एक खेडे दिसत होते. पहाटेचे काही कंदिल लागले होते. गळ्यांत कॅमेरे व दोन्ही हातांनी होल्डॉलचे एकेक टोक धरून अडमडत धडपडत माविस-बार्बारा त्या खेड्याच्या दिशेने इतरांबरोबर चालू लागल्या.

त्यांच्या नशिबाने अर्धा-पाऊण मैल रखटपट्टी केल्यावर जी झोपडी लागली तीत तीन पोलीस पत्ते खेळत होते. त्यांनी सर्वांना झोपडीत घेतले.

उजाडल्यावर तिथली बस पकडून दोघी मॉंगनायला पोचल्या.

मॉंगनाय हे एकरस्ती खेडेगाव होते. ओं काऊंग हा तिथला पाटीलच क्लाराचा मित्र होता. सगळ्या गावात एक विटांचे घर होते—ते म्हणजे या गावपाटलाचे. दोघी घरात शिरल्या. पाटलाच्या बायकोने दोघींना एका मोठ्या दिवाणखान्यात नेले. दिवाणखान्यात एका टोकाला हतरी पसरून त्यावर ओं काऊंग मांडी ठोकून उघडाच बसला होता. त्याचे सर्वांग गोंदलेले होते. क्लाराचे पत्र त्याच्या हाती दिल्यावर त्याने काहीशा निरीच्छेनेच दोघींना 'राहा' म्हणून सांगितले.

ब्रह्मदेशाच्या एक कोटी ऐंशी लाख लोकसंख्येपैकी वीस लाख लोक या शान-भागात राहतात. "दुसऱ्या दिवशी ब्रह्मदेशचे पंतप्रधान मॉंगनाय शेजारील धबधबा पाहण्यासाठी येणार आहेत," पाटील दोघींना माहिती सांगू लागला.

पंतप्रधानांच्या भेटीसाठी धबधब्यापर्यंतचा कैक मैलांचा खडीचा रस्ता काऊंगने गेल्या काही दिवसांत बांधला होता. एखादा रस्ता व्हायला हवा असेल तर त्या भागातल्या आमदाराने निदान मुख्यमंत्र्याला त्या भागात केसल्यातरी उद्घाटनाला बोलवावे ही युक्ती येथे नव्हती. परंतु स्वागत चांगले व्हावे ही भावना.

दुसऱ्या दिवशी पहाटे माविस मच्छरदाणीत लोळत असताना काऊंगने मच्छर-दाणीत तोंड खुपसून सांगितले, "पंतप्रधान उद्या येत नाहीत. नाही येत तर गेले खड्ड्यात. आपण मात्र धबधबा पाहायला जाऊच. लवकर आटपा."

दचकलेल्या माविसने मच्छरदाणीबाहेर उडी मारली व बार्बाराला उठवले.

एका छोट्या मोटारीतून काऊंगबरोबर दोघी निघाल्या. पाटलाने आपल्या चार बायकांपैकी दोघी बरोबर घेतल्या होत्या. बरोबर खाण्याचे पदार्थ बरेच घेतलेले होते. मोटारीतली बरीच जागा त्यांनीच अडवली होती. त्यामुळे संरक्षणाकरता घेतलेले दोघे हत्यारबंद सैनिक मोटारीच्या बाहेर मडगार्डवरच उभे राहिले होते.

धबधबा फारच प्रचंड होता. धबधब्याच्या शेजारी काऊंगची झोपडी होती.



ब्रह्मी अफिमाची मुलाखत

झोपडी अशा ठिकाणी बांधली होती की तिथून पडते पाणी अगदी जवळून दिसावे. पडणारा घो घो प्रवाह पाहत चांगले जेवण होणार या कल्पनेत दोघी होत्या. परंतु ताटात जे पदार्थ पुढे आले ते पाहून दोघींच्या पोटात ढवळू लागले. धबधब्याच्या वेगाने पोटातील पाणी तोंडावाटे बाहेर येऊ लागणारसे त्यांना वाटू लागले. तळलेल्या मोठ्या मुंग्या, कावळ्याच्या छत्र्या असलेले पदार्थ त्यांनी कधी खाल्ले नव्हते.

जेवताना बोलता बोलता काऊंग आपली माहिती देऊ लागला. अमेरिकेहून सहा महिन्यांपूर्वीच तो परतला होता. त्याच्या अधिकाराखाली ५५,००० माणसे होती. एकंदर उत्पन्नाचा ⅐ भाग त्याला एकट्याला मिळे. चार बायका असल्याचे त्याने सांगताच माविसने विचारले, "चौघींचे पटते का ?"

पाटील थोडासा वरमला.

"सर्वांत थोरली महादेवी हीच फक्त राजवाड्यात राहते. दुसरी राजवाड्यातच

पण खालच्या मजल्यावर राहते. तिसरीचे खानदान मोठे नाही. तिचा बंगला गावात आहे.

चौथीसंबंधी त्याने मौन पाळले.

रात्री तेथेच मुक्काम होता. दोघींना दोन बांबूंच्या खाटांवर पथाऱ्या टाकण्यास सांगण्यात आले. रात्री पाटील व दोघी वायका कोठे झोपल्या ते दोघींना कळले नाही.

## हे कसले बौद्ध ?

सकाळ झाली. माविस उठून खिडकीशी आली. आणि समोर चालू असलेला प्रकार पाहून तिच्या अंगावर शहारे आले.

एका जिवंत माकडाला नोकरांनी पकडून आणले होते. पाहता पहाता एकाने त्याची खांडोळी केली. सांडणारे रक्त बाटल्यांमध्ये भरण्यात येत होते. बिअर किंवा इतर मद्यांमध्ये हे रक्त मिसळले की चव चांगली येते यासाठी हे चालू होते.

पाटलाचे दोन्ही हत्यारबंद सैनिक पलीकडे नदीत डायनामाईट फेकून मासे मारीत होते. स्वतः पाटील जंगलात शिकारीला गेला होता.

बार्बाराला जेव्हा माविसने उठवून माकडे मारण्याचा प्रकार दाखवला तेव्हा ती खवळली. म्हणू लागली,

" ही माणसे बुद्ध धर्म सांगतात ! ही कसली बुद्धधर्मीय माणसे ? यांना लाजा कशा वाटत नाहीत ?"

बरे झाले. हे ऐकायला फक्त माविसच होती, बुद्ध शिकारीला गेला होता.

दुपारी जेवताना सापाचे तळलेले तुकडे पानात आले. पाटलाने शेवटी साप मारून आणले होते.

रंगूनहून निघताना क्लाराने ब्रह्मदेशात कसे वागावे याच्या सूचना माविसला दिल्या होत्या. त्या अशा होत्या—

(१) आंघोळ करताना पुरुषांची तपेली वापरायची नाही. बायकांची तपेली निराळी असते.

(२) कुणाकडे गेलात तर पाय धुऊ नका. कारण ते पुसण्याकरता तुम्ही टॉवेल मागता व हा टॉवेल फेकून द्यावा लागतो. यजमानाला असे खर्चात पाडू नका. ब्लाऊज, रुमाल व स्कार्फ हे कपडे एका बादलीत धुवा व स्कर्ट पॅन्ट यांसाठी निराळी बादली वापरा. चुकून एखादा कपडा या बादलीतून त्या बादलीत गेला तर फेकून द्यावा लागेल.

(३) स्कर्ट डोक्यातून घालावयाचा नाही.

(४) स्कर्ट व ब्लाऊज पुरुषांच्या कपडे वाळत घालण्याच्या स्वतंत्र दांड्या असतात त्यावर वाळत घालावयाचे नाहीत.

(५) उशांवर कधी बसायचे नाही.

(६) पुरुषांच्या खाटेवर बसायचे नाही. कपड्यांवर बसायचे नाही.

(७) कुणाकडे घरात जाताना प्रथम पायतणे काढा. मग यजमानाने परवानगी दिली तर पादत्राणे घालून पुनः घरात जा.

(८) बुद्धांचा जो गुरुजी असतो त्याला चुकूनसुद्धा स्पर्श करू नका.

बौद्ध धर्मात स्त्रियांना काय स्थान आहे त्याची ही निशाणीच होती. स्त्रियांना शिक्षण तर वर्ज्यच होते.

कॅमेराला काहीतरी खाद्य हवे म्हणून दोघींनी माँगनायच्या आसपास भटकण्याचे ठरवले. एके दिवशी बाजारातून भटकत असताना खेड्यातून आलेली चारपाच खेडूत माणसे दोघींनी पाहिली. सर्वांचे चेहरे भयानक होते. बरोबरच्या पाटलाच्या वाटाड्याने त्यांना सांगितले की, पन्नास पन्नास मैल तुडवीत हे गिरीजन येथे येतात. तंबाखू किंवा कापूस थोडाफार होतो. तो विकून यांना फारसे मिळत नाही पण ही माणसे अफू विकतात व चांगला पैसा करतात.

माविसने विचारले, "अफू विकता येते का ? ते कायदेशीर कसे ?"

वाटाड्या म्हणाला,

"यांना खायला तर मिळाले पाहिजे. शिवाय ब्रह्मदेशात इतके अफिम आहेत की त्यांची गरज कोण भागवणार ? तुम्ही अफूचा गुत्ता पाहिला नाहीत काय ?"

लगेच वाटाड्या दोघींसह अफूच्या गुत्त्याकडे निघाला. बाजारच्या रस्त्याला लागून एका बोळकंडीतून त्या दोघी चालू लागल्या. एका मोठ्या शाकारलेल्या घरात तिघे शिरले. आत बराच अंधार होता. भितींना रंगीबेरंगी कागद लावून शोभा आणण्याचा प्रयत्न केला होता. एक रेडिओ लष्करी बँडचे संगीत कोकलत होता. काजू भाजताना सुटतो तसा मादक, गोड वास खोलीभर जाणवत होता.

लाकडाचे ठोकळे उशाला घेऊन काही माणसे लोळत होती. एका खिडकीतून अफू तोलून विकली जात होती.

### गुत्त्यातील मुलाखती

दोघींकडे कुणाचेच लक्ष नव्हते. वाटाड्या दरवाजापाशीच थांबला. एका अफिमाजवळ बार्बारा बसली.

विशीतला तो तरुण नाकीडोळी चांगला होता. त्याच्या डोळ्यांत अफू चढलेली होती. अफूचा पाइप सारखा करताना त्याचे हात थरथरत होते.

अफूचा भरपूर स्टॉक घेऊन लाकडाच्या ठोकळ्याची उशी करून तो पडलेला होता. जवळच एक बुधली जळत होती. चमचाभर अफू एका पितळेच्या छोट्या वाडग्यात ओतून त्याने बुधली वर धरली. अफूचा तो चीक उकळल्यावर त्याने वाडगा खाली ठेवला. वाडगा थंड होताच अफूची पेस्ट तयार झाली. त्याने तिची डांगराच्या लाटीसारखी लाटी केली. त्या लाटीचे चार भाग केले. अफूचा हुक्का म्हणजे एक लांब फूटभर बांबूची नळी होती. तिच्या टोकाला धातूचे पात्र बसवलेले

होते. अफूची एक लाटी त्या पात्रात ठेवून त्याने ते पात्र पुन्हा बुधलीवर धरले व दुसऱ्या बाजूने तो अफूचा धूर आत ओढू लागला. तो अफू ओढू लागताच बांबूच्या पात्यात हवा ओढताना पाहिजे तसा आवाज होत होता. दोन–तीन प्रचंड झुरके घेतल्यावर तो दोन–तीन मिनिटे स्वस्थ पडून राहिला. त्याच्या चेहऱ्यावरून तो या जगात नव्हता हे स्पष्ट दिसत होते. हे आन्हिक असेच तासन् तास चालू राहणार होते. तिथे असलेली सर्व गिऱ्हाइके ही कामगार होती. दिवसभर श्रमून संध्याकाळी ती गुत्त्यात येत. काहीजण अखंड तिथेच पडलेले असत.

एक पौन्ड अफू ही सामान्य अफिमाला वर्षभर पुरते. एका पौन्डाला तीनशे रुपये पडत होते. म्हणजे महिन्याकाठी २५ ते ३० रुपयांची अफू खाणे ही सामान्य चैन होती.

अफूच्या गुत्त्यातून दोघी घरी आल्या व त्यांनी पाटलाला आपण गुत्त्यात गेलो होतो व तिथे काही, अफिमांच्या मुलाखती व फोटो घेण्याचा उद्योग केला, हे जेव्हा दोघींनी सांगितले तेव्हा त्या पाटीलरूपी बुद्धाला फीटच आली. बाई आणि अफूच्या गुत्त्यात !

दुसऱ्या दिवशी दोघी पास्कल नावाच्या कस्टम अधिकाऱ्याला भेटायला गेल्या. पास्कल अँग्लो–बर्मी होता. म्हणजे बाप इंग्लिश व आई बर्मी. त्याने माहिती दिली.

" मध्य ब्रह्मदेशात अफू सेवनाला बंदी आहे. शान भागात मात्र प्रत्येक खेड्यात अफूचा गुत्ता आहे. कुणालाही तिथे जाऊन अफू सेवन करता येते. मॉन्गनाय भागात असे तीस गुत्ते आहेत. या स्वाबवा लोकांना ब्रिटिशांनी आपल्या अमदानीत अफू विकायला परवानगी दिली होती. आणि आता त्यांना बंदी घालण्याची ब्रिटिश सरकारची हिंमत होत नाही."

हे गावपाटील दरवर्षी अफू विक्री परवान्यांचा लिलाव करतात. माँगनाय भागात दरवर्षी जो माणूस हे लिलाव घेत असे, त्याचे नाव दाऊद. हा चिनी मुसलमान होता. वर्षाचे जवळ जवळ १५,००० रुपये दाऊद या परवान्यासाठी देत असे व त्यांच्या कितीतरी पट पैसे अफू विकून मिळवीत असे.

पास्कलकडून दोघींना कळले की, ब्रह्मदेशात जी अफूची महत्त्वाची दोन केंद्रे आहेत. त्यांतले एक टांग्यान आहे. पास्कल दोघींना तिथे घेऊन जायला तयार होता. पास्कलची गाठ पडून नव्या साहसाची सिद्धता होताच माविस–बार्बारा यांनी ओं काऊंगला ' टाटा ' केले. दोघी टांग्यानला निघाल्या. [ अपूर्ण ]

**रा. म. शास्त्री**

—निशिकांत मिरजकर

# १ : 'वणवा'.....अविकृत नवकथा

दि. बा. मोकाशींच्या पंधरा लघुकथांचा हा संग्रह आहे. मोकाशी यांच्या साहित्यिक व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू या लघुकथांतून प्रभावीपणे दिसतात. निरनिराळ्या प्रकारच्या आणि निरनिराळ्या पातळ्यांवरील लघुकथा येथे एकत्र आल्या आहेत. काहींना कथासूत्राची परिमाणे आहेत. लांबी, रुंदी आणि खोली आहे. काहींनी कथासूत्राला केवळ स्पर्श करून मनाच्या वर्तुळातली गती शब्दांत पकडण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे. 'वणवा' ही अशा प्रकारची कथा. डोंगरात वणवा पेटतो, आकांताने धडपड करून माणसे तो विझवितात. बरीचशी गुरे होरपळतात. ही यातली घटना पण या घटनेभोवती भिन्नभिन्न प्रकृतींची वेधक गुंफण लेखकाने केली आहे. त्यात बेचैन सरस्वती आहे, डोंगर पेटला तरी खिडकी लावून घोरणारा तिचा नवरा आहे, संतापलेला दुर्दैवी भीमा आहे, इमारतीपेक्षा उंच होणारे परोपकारी उत्साही हरिभाऊ आहेत आणि वेडा काळूही आहे. सारी वर्तुळे आपापल्या परीने पूर्ण आहेत. पण तरीही साऱ्यांनी मिळून एक चित्र सांधले आहे. परस्परांशी काही संबंध नसूनही एकाच चित्राचे हे तुकडे आहेत. डोंगरावरचा वणवा साऱ्यांना वेढून पसरला आहे.

'खोली,' 'अनुनय,' 'एक दिवस कळण्याचा' या कथांत मात्र घटना आणि मनाच्या वर्तुळातली ही गती यांचा प्रवास परस्परांना छेदत चालतो. सोनेरी ढग, खिडकीतील स्त्री, पत्ता विचारणारी मुलगी, पार्टिशनवरची सोळा पोरींची थडथड, या साऱ्यांमुळे फुललेला राणेचा उल्हसित चेहरा, खोली सजविण्याची त्याची धडपड या गोष्टी कथेला 'आकार' आणतात. ('खोली'). पण कथा तेथेच थांबत नाही. राणेच्या मित्राची– निवेदकाची–अस्वस्थ, अकारण, अस्वस्थ हुरहूर ती दाखवून, पटवून जाते. 'अनुनय' या कथेतल्या घटना अगदी छोट्या. चित्रपटाप्रमाणे डोळ्यांपुढून सरकन् पळत जातात. आणि शेवटी सुरेखाने विरघळलेल्या 'त्या'ची हतबुद्ध स्थिती दाखविताना एकदम थांबतात. साऱ्याला एक टोक येते. खुपणारे नव्हे, पण जाणवणारे, उठून दिसणारे. वैद्य पंचानन नेनेशास्त्री यांची सत्तरी आल्यावर ते दवाखाना बंद करतात, तेव्हा 'एक दिवस कळण्याचा' उगवतो. आलेल्या बाईचा रोग गरिबीचा आहे हे तर ते स्पष्टपणे सांगतातच, पण 'आपण फक्त रोगनिदान केलं. याहीपुढे जाऊन आपणांला औषध द्यावं लागणार–दिलंच पाहिजे. तिची काहीतरी सोय केली पाहिजे,' हे त्यांना जाणवते. गणेश इंडस्ट्रीजमध्ये ते तिला

नोकरी लावून देतात. हे कळणे, आजवरच्या साऱ्या रोग्यांना निराळीच औषधं करायला हवी होती. त्यांची मनं निरोगी करायला हवी होती. आयुष्य कसं घ्यावं–घालवावं–हे शिकवायला हवं होतं, हे त्यांना समजतं. कथा उंच चढते.

'गुलाम,' 'बुट्टी,' 'पहारा,' 'पाप,'–या कथांना गोष्ट फारशी नाही. एखाद्या घटनेचे निमित्त करून एखाद्या मानसविश्वाची घडामोड, त्यातल्या विचारांच्या खळबळी यातून दाखविल्या आहेत. मने चितारली आहेत. फार यशस्वीपणे चितारली आहेत. मुंबईच्या ऐन मध्यावरच्या एका काळ्या, रुंद, डांबरी रस्त्यावर टॉमीगन सरसावून उभा असलेला गोरा सोजीर पाहून पारतंत्र्याबद्दल, आपण गुलाम असल्याच्या जाणीवेने संतापणारे एक दुबळे मन आपल्याला 'गुलाम' या कथेत दिसते. या मनाचा संताप अनावर होतो आहे, ते तडफडते आहे, पिचते आहे. सैनिकाला कुणीतरी उचलून फेकून द्यावे, असे त्याला वाटत आहे. पण हे मन दुबळे आहे. 'गुलाम' आहे. त्याचा संताप, त्याच्या सुडाच्या कल्पना सारे पारतंत्र्यातल्या भेकडपणाच्या आवरणाखाली दडपलेले आहे. एकदाच या मनाचा संताप अनावर होतो. सोजिराच्या टॉमीगनला अकारण बळी पडलेल्या, तडफडणाऱ्या लस्सीवाल्याकडे ते धावत जाते. हळुवारपणे पुढे झुकते आणि तोच त्याला आपण काय केले, याची जाणीव होते. उडालेले भीतीचे घुबड पुन्हा मानगुटीवर येऊन बसते. आचके देणारा भैय्या दिसत असूनसुद्धा त्याचे दोन्ही हात घाबरून डोक्यावर अधिकाधिक उंच होण्यात गुंततात अतिशय हळुवारपणे, पण अगदी खंबीरपणे आणि उत्कटतेने लेखकाने या मनाचे चित्रण केले आहे. 'बुट्टी,' 'पहारा' आणि 'पाप' या कथाही याच प्रकारच्या आहेत. एखाद्या प्रसंगाचे दार उघडून मोकाशी पात्रांच्या मनांत शिरतात आणि तिथल्या साऱ्या हालचालींचा चलच्चित्रपट काढून घेतात. शाळेला बुट्टी मारून बागेत रमून जाणारा मुलगा, पळून गेलेल्या गुन्हेगाराच्या मागावर घरदार सोडून भटकणारा अन् त्यापायी हैराण झालेला हवालदार, घाटावरील पहिलवान आणि कपडे धुणारी देखणी स्त्री पाहून त्यांच्याविषयी भलभलत्या कल्पनांचा खेळ आपल्या दुबळ्या मनात करीत राहणारा तरुण–अशा तऱ्हेची विविधतेने रंगलेली मन:सृष्टी ते दाखवतात. या साऱ्या कथा फार उच्च दर्जाच्या आहेत. मनाच्या अनाकलनीय व्यापाराचे सूक्ष्म पदर उलगडणाऱ्या आहेत. त्यातही 'पहारा' ही कथा परिणामकारकतेच्या दृष्टीने फार उत्कृष्ट आहे.

'फिरतं जोडपं' आणि 'शरावती' या कथा अगदी निराळ्याच ढंगाने सांगितलेल्या आहेत, 'फिरतं जोडपं' दाखविणारे निवेदक आहेत. नगरीतले रस्ते, पूल, झाडं, बाग, इमारती, टेलिफोनचे आणि विजेचे खांब इत्यादी या साऱ्या 'लोकांना' रामभाऊ आणि जानकी या जोडप्याविषयी लोभ जडतो. त्यांच्या हालचाली, त्यांचे बोलणे ते लक्षपूर्वक पाहू लागतात. त्यातून माणसांच्या सवयींवर, समाजावर शेरे देतात. या जोडप्याची कहाणी त्यातून गुंफली जाते. त्याचे लग्न झाल्यापासून दोघे

या जगातून निघून जाईपर्यंत त्याच्या संसारात उद्‌भवलेले प्रसंग, त्यांच्या जीवनाचा सरळधोपट मार्ग आणि त्यात मधूनच होणारी वादळे; आणि शेवटी एकमेकांना पूर्ण जाणल्याने झालेला त्यांचा नि:शब्द प्रेमळ सहवास याचे वर्णन अगदी आपुलकीच्या भाषेत केले गेले आहे. मानवी समाजाच्या बाहेरील 'व्यक्तींनी' हे केलेले असल्याने त्यात वेगळीच खुमारी आली आहे.

'शरावती' ही गोष्ट लिहिली गेली २००१ साली आणि घडली होती १९८० साली. शरावती ही भारतातून अंतराळात जाणारी पहिली महिला. सगळ्या जगाचे लक्ष तिच्याकडे लागलेले. तिचे अंतराळयान अवकाशात गेल्यावर काही दिवसांनी लक्षात येते की, शरावतीला दिवस गेले आहेत. यातून निर्माण झालेला पेच आणि त्यामुळे साऱ्या पृथ्वीवर उडालेली खळबळ हा या कथेचा विषय आहे. कथा खुसखुशीतपणे रंगली आहे. जाताजाता अनेक मिस्किल शेरे कथेला खमंगपणा आणून देतात. कथनपद्धती आणि विषय या दोन्ही दृष्टींनी ही कथा अगदी नावीन्यपूर्ण आहे.

मोकाशींच्या या कथांतून मराठी लघुकथेची अनेक स्वरूपे दिसतात. यांत उत्कंठा निर्माण करणारी धावत्या घटनांची चित्रणे आहत, व्यक्तींचे नानाविध स्वभाव आहेत, बांधेसूद कथानके आहेत, तर कधी विशिष्ट मन:स्थिती अथवा नुसते वातावरण प्रभावीपणे निर्माण केलेले आहे. जेथे कथानके आहेत, तेथे ती डौलदार, घाटदार आहेत; तर जेथे कथानके नाहीत, तेथे त्यांची उणीव भासल्याची जाणीव मुळीच होऊ न देणारी वेधकता आहे. 'बुट्टी 'सारखी कथा काव्यपूर्ण आहे, तर 'देऊळ' ही कथा म्हणजे मूर्तिमंत नाटय आहे. जीवनातील फक्त सुंदर घटनाच दाखविण्याचा सोवळेपणा लेखकाने मुद्दाम केलेला नाही. पण बीभत्स, विकृत, कंटाळवाणा असा जीवनाचा भागही कुठल्याच कथेत आवर्जून दाखवविलेला नाही. कदाचित हा योगायोग असावा परंतु बीभत्सपणा अथवा विकृती यांच्या आहारी न जाता उत्कृष्ट नवकथा लिहिता येतात हे सिद्ध करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना मोकाशींच्या या पुस्तकाचा उपयोग होईल.

मोकाशींच्या कथांच्या रचनेत ढिलाई, विस्कळीतपणा नाही हे चटकन जाणवते. कथेच्या स्वरूपानुसार त्यांची भाषा काहीशी बदलते पण कोठेही ती संयमाचा हात सोडून जात नाही. मोजक्या अलंकाराच्या मार्मिक उपयोगामुळे मोकाशींची काही वाक्ये फार परिणामकारक बनलेली दिसतात. "पाण्यात धान्य भिजत ठेवावं तसं सगळं गाव शांततेत भिजत दबलं होतं" ......"हॉटेलात गेलो, थट्टा झाल्या, चित्रपट पाहिले, उताराव़रच्या चाकासारखे दिवस जाऊ लागले." .. ..."हात वर करून कवायतीला मुलं उभी राहावी तशा, हिरव्याहिरव्या, काळ्या, पिवळ्या, लहानमोठ्या शेंगा पाय जुळवून लांबलचक उभ्या होत्या. 'आराम' म्हटलं की त्या हात खाली करतील नि जमिनीवर येतील." यांसारखी ही वाक्ये हवे ते वाता-

वरण चटकन निर्माण करतात. मराठी लघुकथेच्या वाटचालीचा विचार करताना दि. बा. मोकाशींच्या या पुस्तकाची दखल निश्चितपणे घ्यावी लागेल.

**[ 'वणवा' – दि. बा. मोकाशी, मौज प्रकाशन, किंमत ६ रु., पृष्ठे १८४. ]**

## २ : 'पाण्याचा वेग'

"या संग्रहातील चौदा कथांत कदाचित वाङमयीन मूल्ये नसतीलही, कदाचित त्यांचे कथांतच चुकलेही असेल; पण मला जे सुचले...भावनेच्या आवेगात लिहावेसे वाटले, ते लिहिले......" असे निवेदन लेखकाने सुरुवातीलाच केलेले आहे, तथापि यातल्या काही कथा चांगल्या आहेत. 'येरे माझ्या मागल्या' या कथेत संघर्षाचे उठावदार चित्रण आढळते. हेकेखोरपणाने वागून अरुणाला मारहाण करणारा तिचा नवरा ती वर्ष सव्वा वर्ष माहेरी जाऊन राहताच मेणासारखा मऊ येतो; इतका मऊ की तिला शेवटी वाटू लागते– 'असला बेगडी संसार नको मला. खारट तुरट चालेल. पण असलं साखरेत घोळलेलं मिळमिळीत सौभाग्य नकोच.' 'वैरी' या कथेतही विक्षिप्त मनोगंडाने पछाडलेल्या सोन्याचे अगदी समर्थ चित्रण आहे. आपल्या भोवतालचे सारे लोक–आपले आईबापही–आपले वैरी आहेत. आपला छळ करण्यासाठी टपलेले आहेत, असे त्याला वाटत राहते. त्याच्या या विक्षिप्त, तऱ्हेवाईक मनोभूमिकेचे दर्शन लेखकाने समजदारपणे घडविले आहे.

'संशय', 'संकट' आणि 'त्रिकूट' या आणखी काही चांगल्या कथा. दिनूसारख्या वेडसराच्या मनात होणारी प्रचंड खळबळ 'संशय' या कथेत वर्णन केली आहे; तर अचानक वाचेला आलेले दुष्ट यश पाहून भांबावून, घाबरून गेलेला सुरेश 'संकट' या कथेत दिसतो. पिंगा, नमू आणि रामभट या तीन एकल्या जिवांच्या त्रिकूटाची कहाणी नावीन्य आणि सहृदयता या दोन्ही दृष्टींनी परिपूर्ण आहे. लेखकाच्या प्रतिभेची भरारी कुठवर जाऊ शकेल याचा अंदाज घेण्यास या कथा निश्चित समर्थ आहेत.

अर्थात त्याला अजून बराच पल्ला गाठावयाचा आहे याचीही जाणीव ठिकठिकाणी होते. 'भावनच्या आवेगात लिहावेसे वाटले, ते लिहिले,' असे करूनच केवळ समर्थ वाङमय निर्माण होत नाही. भावनेच्या आवेगात लिहिल्यानंतर, आवेग कमी झाला की, जे लिहिले ते पुन्हा वाचून पाहणे, आपल्याला ते जितके आवेगपूर्ण वाटले होते, तितके खरोखर आवेगपूर्ण, भावनाशील बनविण्यासाठी त्यात विचारपूर्वक काही बदल करणे याला काहीच हरकत नसते. मातबर साहित्यिकांनाही हे करावे लागते. लेखनाच्या आरंभकाळात तर ते आवश्यकच ठरते.

बिडकरांनी ही पथ्ये लक्षात ठेवली तर त्यांच्या कथा याहून कितीतरी चांगल्या बनू शकतील. मानाचे स्थान मिळवतील. 'अहेर' ही कथा चांगली आहे. अनावश्यक फापटपसारा त्यात कौशल्याने टाळला आहे. पण त्यात रेखीवता नाही. अका-

रण रूक्षता आणि तुटकपणा जाणवतो. एखादे बातमीपत्र सांगितल्याच्या ढंगात कथा सांगितली जाते.

बिडकरांच्या कथांतला वर्णनात्मक भाग खरोखरीच सुरेख आहे. वातावरण-निर्मिती प्रभावी होण्यास त्याने मोलाची मदत होते. परंतु अनावश्यक गोष्टींना अकारण प्राधान्य देण्याची सवय त्यांनी सोडली पाहिजे. बापू आणि कुलकर्णी यांच्या गोष्टींना सुरुवातीलाच "दिवसभर गिऱ्हाईक मिळालं नसल्यानं म्हादा चांभार निराश झाला होता. खाली मान घालून तो चामड्याचा ढीग चाचपत बसला होता." हे आवर्जून येण्याचे काही कारण नाही. म्हादा चांभाराचा कथेशी काहीच संबंध नाही.

संवादांतील सफाई अजून बिडकरांना जमत नाही. माणसे बोलताना पुस्तकातील उताऱ्याप्रमाणे किंवा परीक्षेतील 'कारणे द्या' या प्रश्नाला उत्तर दिल्याप्रमाणे बोलत नाहीत. 'पाण्याचा वेग' या कथेतील नंदाच्या तोंडची वाक्ये या प्रकारची वाटतात.

अर्थात हे वरवरचे दोष झाले. बिडकरांच्या प्रतिभेचा गाभा सजीव आहे यात शंका नाही. त्यांच्या पुढल्या पुस्तकांतून अधिकाधिक चांगल्या दर्जाच्या कथा वाचावयास मिळतील याची खात्री वाटते.

[ **'पाण्याचा वेग'** —मधुकर विष्णू बिडकर, प्रकाशक; गो. शं. सोनसळे, सह्याद्री प्रकाशन, मूल्य अडीच रुपये. ]

## ३ : 'चंद्रमुखी'

प्रा. फडके यांच्या लघुकथांचा आदर्श डोळ्यांपुढे ठेवून लिहिलेल्या सहा लघुकथा य. ज. आठल्ये यांनी या पुस्तकात एकत्र केल्या आहेत. "प्रा. फडके यांचा आदर्श' असं म्हणण्याचं कारण असं की 'प्रतिभासाधन' या आपल्या ग्रंथात प्रा० फडक्यांनी लघुकथांच्या स्वरूपाची जी शास्त्रशुद्ध चर्चा केलेली आहे, त्यातील कसोट्यांना या साऱ्या कथा अगदी सहीसही उतरतात. मग स्वतः लेखकाची तशी प्रवृत्ती असो वा नसो. आज मराठी लघुकथा 'प्रतिभासाधनाच्या खूपच पुढे गेली आहे. जीवनाच्या नव्या जाणीवा तिने आत्मसात् केल्या आहेत. आणि साहित्य व जीवन यांच्या मूल्यांचा संगतवार आलेख तिनं सांभाळला आहे. 'प्रतिभासाधना' त फडक्यांनी लघुकथेला आखून दिलेली आकर्षक चौकट आता तिला अपुरी पडते आहे; किंबहुना कोणत्याही चौकटीत बसू शकणार नाही असं नवं जिवंत रूप मराठी लघुकथेनं आत्मसात केलं आहे. आज तिला नुसतीच लांबी-रुंदी नाही, तर तिला खोलीही प्राप्त झाली आहे.

आठल्यांची कथा मात्र 'प्रतिभासाधनाच्या' चौकटीतच दिमाखाने उभी आहे. अर्थात् तिची प्रकृतीच अशी आहे, की ती चौकट तिला चांगली शोभून दिसते.

'प्रतिसाधना 'तल्या कसोटचा वापरल्या तर असं निश्चितच म्हणावं लागतं, की या लघुकथा उत्कृष्ट आहेत, मोहक आहेत, रंजक आहेत.

निरनिराळ्या स्वभावाची वैचित्र्यपूर्ण पात्रं, त्यामुळं निर्माण होणारे वैशिष्ट्यपूर्ण प्रसंग, त्यांची गुंतागुंत, संघर्ष, त्याला बसणारी निरगाठ आणि शेवटी त्याची होणारी अनपेक्षित उकल यामुळे प्रत्येक कथा मोहक बनलेली आहे. प्रा० फडक्यांना वाटणारं. ' ओ, हेन्री 'चं अनिवार आकर्षण श्री. आठल्यांनाही वाटत असावं. प्रत्येक कथेचा शेवट त्यांनी अगदी अनपेक्षित केला आहे. आठल्यांची कथा रंगते छान. उत्कर्षबिंदूपर्यंत चांगली चढत जाते. आणि शेवटी अपेक्षाभंगाचा सुंदर धक्का देऊन वाचकाला स्तिमित करते.

त्यातही ' खूळ, ' ' घाटावरनं आला पाहुणा ' व ' मज्जा ' या कथा सफाई आणि सौंदर्य या दोन्ही दृष्टींनी उत्कृष्ट ठरतील. खेळकर भाषाशैली, खुसखुशीत संवाद आणि चित्रमय वर्णने ही आठल्यांच्या लेखनाची आणखी वैशिष्टये आहेत. त्यामुळं ' चंद्रमुखी ' हा लघुकथासंग्रह म्हणजे रंजक साहित्यातलं एक दालन झालं आहे.

[ **'चंद्रमुखी '**–य. ज. आठल्ये, चंद्रकांत शेटचे प्रकाशन मंदिर, मूल्य रु. ३-५०, पृष्ठे ११८. ]

## ४ : ' पारिजात '

दिवाकर गंधे या तरुण लेखकाचा हा पहिलाच कथासंग्रह आहे. लेखनाविषयीचे प्रेम आणि लिहिण्याचा उत्साह त्यांच्या कथांमधून जागोजाग दिसतो. गंध्यांचा साहित्यिक पिंड अजून घडतो आहे त्याची पूर्वतयारी चालू आहे. या पुस्तकामधून गंधे दिसतात ते पूर्वसूरींच्या लेखनाने भारलेले. त्यांच्याप्रमाणे आपणही काहीतरी करावे, अमाप लिहावे, चांगले लिहावे या दुर्दम्य उत्साहाने भारलेले. कथासंग्रह प्रसिद्ध होणे हे त्यांनीच सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे त्यांचे पाच–सात वर्षांपासूनचे स्वप्न होते. आज हे स्वप्न त्यांनी साकार केले आहे. या त्यांच्या प्रगट स्वप्नामध्ये ' परिजात, ' ' बाहेर पाऊस पडतो आहे, ' ' छाया ' यांसारख्या सांकेतिकतेचे पटल पांघरलेल्या, बासनातल्या कथा आहेत; तशाच ' हाक, ' ' उपेक्षिता ' आणि ' तडा ' यांसारख्या स्वतंत्र आविष्काराकडे झुकणाऱ्या कथा आहेत. खांडेकर आणि साने गुरुजी या त्यांच्या आवडत्या लेखकांची ( तसा ' ओ हेन्री ' ही त्यांना आवडतो म्हणे ! ) त्यांच्या लिखाणावर दाट सावली पडलेली असली तरी ' तडा ' या कथेसारखा नाजूक विषय अगदी समर्थपणे आणि हळुवारपणे त्यांनी हाताळलेला दिसतो. यांसारख्या आणखी कथा गंध्यांच्याकडून लिहिल्या जातील अशी आशा वाटते.
[ **' पारिजात '**– दिवाकर द. गंधे ( लेखक व प्रकाशक ); मूल्य रु. ३-५० पृष्ठे १३५. ]

# श्रीमंत फुटबॉलपटू पेले

: लेखक :

प्रताप पटवर्धन

'ज्युलियस रिमेट' करंडकासाठी जागतिक फुटबॉल सामने यंदा लंडन येथे या महिन्यात भरविण्यात येणार आहेत. ऑलिंपिक स्पर्धांप्रमाणेच हे जागतिक फुटबॉल सामने दर चार वर्षांतून एकदा भरविण्यात येतात. यंदा जागतिक फुटबॉल स्पर्धेत १६ राष्ट्रांच्या संघांनी भाग घेतला आहे. ब्राझीलचा संघ १९५८ व १९६२ साली या स्पर्धेत विजयी झाला आहे. या विजयी संघाच्या सर्वोत्कृष्ट खेळाडूचा हा परिचय....

"जागतिक फुटबॉल क्षेत्रात एडसन अरान्टेस नस्किमेन्टो नावाच्या खेळाडूचे नाव आपण ऐकले आहे का ?" असा प्रश्न जर कोणास विचारला तर तो गृहस्थ थोडा वेळ विचार केल्यावर सांगेल, "छे, बुवा आपण तरी हे नाव कधीच ऐकले नाही."

"अहो, मी आता सांगितलेला खेळाडू तर सर स्टॅनले मॅथ्युज, फिन्नी, लॉ, ग्रीव्हज, डीस्टेफॅनो, सॅरिझ व पुस्कास या रथी महारथी समजल्या जाणाऱ्या खेळाडूंपेक्षा श्रेष्ठ आहे, असे म्हणताच तो गृहस्थ पुरता गोंधळून जाईल. अखेर तो म्हणेल, "माफ करा, आपला तरी काही सांगता येत नाही."

एडसन अवान्टेस नस्किमेन्टो हे त्या खेळाडूचे नाव खरे, पण ते फारच थोड्या लोकांना माहीत असेल, एरवी पेले याच नावाने त्याला सारे जग ओळखते. अमाप कीर्ती लाभलेला असामान्य फुटबॉलपटू म्हणून पेलेचा उल्लेख केला जातो.

क्रिकेटमध्ये डॉन ब्रॅडमन, हॉकीमध्य मेजर ध्यानचंद तसेच फुटबॉलमध्ये पेले. ५ फूट ८ इंच उंचीचा, बळकट, १५० पौंड वजनाचा हा फुटबॉलपटू ' ब्लॅक सीझर ', ' ब्लॅक पर्पल ', ' ब्लॅक डायमंड ' अशा अनेक गावांनी सर्व परिचित असला तरी त्याच्या घरातली मंडळी त्या ' डिको ' या लाडक्या नावाने हाक मारतात व मित्रमंडळी ' सासि ' म्हणू ओळखतात. एवढा थोर खेळाडू पण त्याला ना सिगारेटचे व्यसन ना दारूचे ! हे ऐकून अनेकांना आश्चर्य वाटेल. कित्येक सिगारेट व अल्कोहल कंपन्यांनी अक्षरशः पाण्यासारखा पैसा देऊन जाहिरातीसाठी त्याचे फक्त एक छायाचित्र मागितले, पण त्यांची ही मागणी पेलेने साफ धुडकावून लावली.

अतिशय प्रतिकूल परिस्थितीतून पेले आज नावारूपाला आला आहे घरची अत्यंत गरिबी, मग त्याच्या खेळाकडे कोण लक्ष देणार ? पायात घालायला फुटबॉलचे बूटही नव्हते. त्यामुळे अनवाणी पायाने त्यालो सामना खेळावा लागे. अवघा १४ वर्षांचा असताना ब्राझीलमधील दुय्यम दर्जाच्या फुटबॉल सामन्यात तो प्रथम चमकला. त्याच वेळी जगप्रसिद्ध सॅन्टोज या फुटबॉल क्लबच्या तज्ज्ञाने त्याला अचूक हेरला व आपल्या क्लबाच्या वतीने त्याला खेळावयास बोलाविले. ' सॅन्टोज '-सारख्या मातबर क्लबने आपणहून बोलाविणे हा पेलेच्या दृष्टीने मान होता. त्याने लगेच त्याचे आमंत्रण स्वीकारले व तेव्हापासून आजतागायत तो त्याच क्लब-कडून खेळत आहे. यासाठी ' सॅन्टोज क्लब ' त्याला दर आठवड्याला ८०० पौंड पगार देतो. समुद्रकिनाऱ्यावर एक आलिशान बंगला व हिंडायला मोटार. शिवाय पेलेला इतर सर्व सोयी त्यांनी उपलब्ध करून दिल्या आहेत. जगातील सर्वांत श्रीमंत फुटबॉलपटू म्हणून पेलेचे नाव घेतले जाते.

शेफिल्ड-वेन्सडे व सॅन्टोज यांमध्ये सामना सुरू होता. सॅन्टोजला ' पेनल्टी किक ' मिळाली शेफिल्डचा गोलरक्षक स्प्रिगेट्ट डोळयांत तेल घालून पेलेची प्रत्येक हाल-चाल बारकाईने पाहत होता. ' पेनल्टी किक ' मारण्यासाठी चेंडू पुढयात ठेवून पेले उभा होता. चेंडू गोलमध्ये मारण्यासाठी त्याने धाव घेतली. गोलरक्षक स्प्रिगेट्ट गोल अडविण्यासाठी सज्ज झाला, पण पेलेने क्षणार्धात धाव बदलून कोणत्या कोनातून कसा गोल मारला हे गोलरक्षक स्प्रिगेट्ट व प्रेक्षक यांपैकी कोणालाही समजले नाही.

१९५८ साली स्वीडन येथील ' वर्ल्डकप ' फुटबॉल सामन्यांत पेले जेव्हा प्रथम खेळला, तेव्हा तो अवघा १७ वर्षांचा होता. पेलेच्या खेळाचे तंत्र, शैली, गती व कौशल्य पाहून तज्ज्ञांनी त्याचे श्रेष्ठत्व एकमुखाने मान्य केले. इटलीतील एका प्रसिद्ध फुटबॉल क्लबने त्याला पाच लक्ष पौंड पगार देऊन आपल्या संघाकडून खेळावयास बोलविले. पण पेलेने स्पष्ट नकार दिलाच पण ब्राझील सरकारनेही त्याला ब्राझील व्यातिरिक्त इतर कोणत्याही देशाकडून खेळावयास बंदी घातली. कारण पेले म्हणजे ब्राझीलचे भूषण आहे याची ब्राझील सरकारला जाणीव आहे. आतापर्यंत पेलेने ५५० फुटबॉल सामन्यांत ६४० गोल मारले आहेत.



एडसन अवान्टेस नस्किमेन्टो

रिओ–डी–जानोरी येथे भरविण्यात आलेल्या इन्व्हिटेशन टूर्नामेंटमध्ये इंग्लंड विरुद्ध ब्राझील या सामन्यात तर पेलेने कमाल केली. पहिल्या अर्ध्या खेळात कोणीच कोणावर गोल करू शकले नाहीत. विश्रांतीनंतर खेळ सुरू झाला. दोन्ही संघांनी आता आक्रमक पवित्रे घेतले होते, तरीदेखील गोल होण्याची चिन्हे दिसेनात. दोन तुल्यबल संघांतील ही लढत अखेर बरोबरीने सुटणार असे वाटू लागले. इतक्यात पेले ब्राझीलच्या मदतीला धावून आला. त्याने अवघ्या आठ मिनिटांत लागोपाठ तीन गोल मारून विजयश्री खेचून आणली आणि प्रेक्षक पेलेला डोक्यावर घेऊन अक्षरशः नाचले.

पेलेच्या खेळाचा अभ्यास करण्याचे अनेकदा प्रयत्न झाले पण ते व्यर्थ ठरले. पेलेच्या प्रत्येक सामन्याला हजर राहून तज्ज्ञांनी त्याचा खेळ पाहिला तर जर्मनी व इटलीने सामने सुरू असताना त्याच्या खेळाचे चलत्चित्रीकरण करून त्याची हाल-चाल टिपून त्याचा अभ्यास केला पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. काहींना पेलेच्या अंगी दैवीशक्तीचा अंश असावासा वाटतो तर काहींना तो चमत्कार वाटतो. पेले म्हणजे फुटबॉल जगताला आजपर्यंत न सुटलेले कोडे आहे, एवढे मात्र खरे !

# ज्ञा न वि ज्ञा न

## □ युगोस्लाव्हियातील नवे बदल

माओनंतर कोण, या प्रश्नावर चीनमध्ये मोठी सत्तास्पर्धा चालू असल्याच्या बातम्या येत असता युगोस्लाव्हियात टिटोनंतर कोण हा प्रश्न शांततेच्या व लोकशाहीच्या मार्गाने सोडविण्यात येत आहे. टिटो ७४ वर्षांचा म्हणजे माओपेक्षा दोन वर्षांनी मोठा असून त्याची प्रकृती व कार्यक्षमता चांगली आहे. अजून काही वर्षे देशाची सूत्रे तो कार्यक्षमतेने हलवू शकेल; तरीही आपल्यामागून सत्तेसाठी स्पर्धा न लागता सत्तासंक्रमण शांततेने व सुरळीतपणे व्हावे, यासाठी टिटोने आतापासूनच योजना आखल्या आहेत.

तोंडाने मार्क्सवादाची पढीक पोपटपंची चालू ठेवायची पण प्रत्यक्षात मार्क्सवादाचा आपणांस पाहिजे तसा सोयीचा अर्थ लावावयाचा, असे रशिया व इतर कम्युनिस्ट राष्ट्रांप्रमाणे न करता मार्क्सवाद खऱ्या अर्थाने अंमलात आणण्यासाठी आपल्या देशाची विशिष्ट परिस्थिती लक्षात घेऊन टिटो नवे प्रयोग प्रथमपासून करीत आला आहे. यासाठीच स्टालिनच्या सर्वंकष हुकुमशाहीविरुद्ध बंड पुकारून कॉमिन्‌फॉर्ममधून तो बाहेर पडला. राजकीय व आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याच्या योजना त्याने हाती घेतल्या व निर्धाराने अंमलात आणल्या.

कोणत्याही एका व्यक्तीच्या किंवा पक्षाच्या हाती सर्व सत्ता केंद्रित होऊ नये, या उद्देशाने युगोस्लाव्हियाची १९६३ ची घटना तयार करण्यात आली असून त्यानुसार देशात व्यवयाच्या सार्वजनिक निवडणुकांची तयारी आता सुरू आहे. राज्यसंस्थेचे विसर्जन हे साम्यवादाचे अंतिम उद्दिष्ट ते गाठण्याची भाषा रशियन नेते अजून बोलत असले तरी प्रत्यक्षात तेथे राज्यसत्तेचे केंद्रीकरण कमी होण्याऐवजी वाढतच आहे. युगोस्लाव्हियात मात्र व्यक्तिमाहात्म्य, तसेच पक्षमाहात्म्य कमी करण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला जात आहे. समाजवादी संयुक्त आघाडीच्या (सोशॉलिस्ट अलायन्स) वार्षिक परिषदेतील कामकाज या दृष्टीने लक्षात घेण्यासारखे होते परिषदेत कोणत्याही दिवंगत किंवा विद्यमान प्रमुख नेत्यांचा फोटो—टिटोचासुद्धा—कोठे लावलेला नव्हता. पक्षाचे प्रमुख नेते त्यांच्या स्थानांनुसार व मानानुसार व्यासपीठावर आणि पुढच्या खुर्च्यांवर बसल्याचे दृश्य कोणत्याही परिषदेत पाहावयास मिळते. पण या परिषदेत निराळेच दृश्य दिसले. सर्व प्रतिनिधी इंग्रजी वर्णमालेतील त्यांच्या नावाच्या क्रमानुसार बसले होते व पक्षाचा

एखादा प्रमुख नेताही अगदी मागच्या रांगेतून पुढे येऊन भाषण करताना दिसे. दूर अंतरावरूनच दिसणारा एक प्रचंड लाल तारा, गेल्या परिषदेचे वेळी सर्व प्रतिनिधींचे लक्ष आकर्षून घेत होता पण साम्यवादी चळवळीचे हे प्रतीकात्मक चिन्हही यावेळी कोठे दिसले नाही. हातोडा कोयतावाला लाल बावटा फक्त कम्युनिस्ट पक्षाच्या मुख्य कचेरीवर होता. राष्ट्रध्वज मात्र सर्वत्र दिसत होते.

समाजवादी आघाडी ही कम्युनिस्ट व इतर काही डाव्या पक्षांची आघाडी आहे पण इतर ठिकाणच्या कम्युनिस्ट पुरस्कृत संयुक्त आघाड्यांप्रमाणे येथे कम्युनिस्टांचे वर्चस्व नाही. एकूण ८० लाख सभासदांपैकी फक्त १५ लाख कम्युनिस्ट आहेत. पुढच्या वर्षी देशात होणाऱ्या निवडणुकांच्या तयारीची पहिली पावले आघाडीच्या या परिषदेत टाकली गेली. या निवडणुकांचा एक विशेष म्हणजे त्यातील उमेदवार राजकीय पक्ष उभे करणार नसून स्थानिक प्रतिनिधी सभा निवडतील. तीन वर्षांपूर्वी नवी घटना तयार झाली तेव्हा हे केवळ कागदावरचे स्वप्न आहे, प्रत्यक्षात तसे काही घडणार नाही असे काहींना वाटत होते, पण आता घटना अमलात आणण्यासाठी खरोखरच पावले टाकली जात आहेत. कम्युनिस्ट व इतर राजकीय पक्षांचा विर्सजनाचा उद्देश नव्या घटनेमागे आहे. आपल्याकडे पक्षहीन लोकशाहीची कल्पना जयप्रकाश नारायण अनेक वर्षे मांडीत आहेत. आपल्याकडच्या विशिष्ट परिस्थितीत ती कल्पना अनेकांना अव्यवहार्य वाटते पण युगोस्लाव्हियात त्या दिशेने प्रत्यक्ष पावले टाकली जात आहेत.

टिटोच्या मागून कार्देलज किंवा रँकोव्हिक यांपैकी कोणाकडे तरी सूत्रे जातील असे अंदाज गेल्या वर्षापर्यंत फक्त करण्यात येत होते. हे दोघेही गेली पंचवीस वर्षे टिटोंचे सहकारी असून त्याच्यापेक्षा वीस वर्षांनी लहान आहेत. असे असले तरी यापेक्षाही तरुण नेते जबाबदारीच्या जागांसाठी तयार केले जात असून नेतृत्व त्यांच्याकडे जाण्याचा अधिक संभव आहे.

या सर्व घटना स्वागतार्ह असल्या तरी एक दोन गोष्टी त्याच्याशी विसंगत आणि खटकणाऱ्या वाटतात. टिटो हयात असेपर्यंत राष्ट्राचे प्रमुखपद घटनेनुसार त्याच्याकडेच राहणार आहे. त्यात बदल होणार नाही. असे का? आपल्या हयातीत सत्तेची सूत्रे सोडायला टिटो तयार नाही असाच याचा अर्थ नाही का? टिटोचा टीकाकार मिलोव्हन जिलास याने ज्या सुधारणा सुचविल्या होत्या त्यांच्यापेक्षाही पुढचा टप्पा नव्या घटनेने गाठला आहे असे असता जिलास अजून बंदिवासात का याचाही समाधानकारक उलगडा होत नाही.

## ☐ माणसाला भीमबळ देणारा सूट

माणसाला चिलखताप्रमाणे घालता येईल, असा ॲल्युमिनिअमचा सूट अमेरिकन संशोधक तयार करीत आहेत. या सुटाचे नाव हार्डीमॅन. तो घातल्यावर

माणसाच्या अंगी भीमबळ येऊन केवढेही अजस्र ओझे माणूस उचलून नेऊ शकेल. पंधराशे पौंड वजनाची वस्तू सहा फूट उंचीपर्यंत तो उचलू शकेल. याचा अर्थ हा सूट घातला तर दोन माणसे एखादी मोटार सहज उचलून बरोबर घेऊन चालू शकतील.

सुटाचा आकार दिलेले हे यंत्रच आहे. जनरल इलेक्ट्रिक कंपनीने त्याचा शोध लावला. लष्कर व आरमाराच्या उपयोगासाठी तो तयार करण्यात येत आहे व अशी अनेक यंत्रे तयार करण्याचे कंत्राट या कंपनीस मिळाले आहे.

## □ मोटारी व असुरक्षित जीवन

वेगवान वाहनांमुळे जीवन कसे असुरक्षित झाले आहे, यासंबंधी 'अन्सेफ अॅट एनी स्पीड' नावाचे पुस्तक राल्फ नाडर यांनी लिहिले व अमेरिकेत त्याने खळबळ उडवून दिली आहे. अमेरिकनांमध्ये एक प्रकारचा 'सुरक्षितता गंड' निर्माण झाला असून त्याचा परिणाम मोटारींच्या धंद्यावर होत आहे. मे महिन्याच्या पहिल्या दहा दिवसांत मोटारीची विक्री पंधरा टक्क्यांनी घटली. कारखाने बंद होत आहेत, असे हेन्री फोर्ड यांनी बिझिनेस कौन्सिलच्या सभासदांपुढे बोलताना नुकतेच सांगितले.

नाडर यांचे पुस्तक ३० नोव्हेंबर १९६५ ला प्रसिद्ध झाले. आयोवाचे अॅटर्नी जनरलनी सुरक्षिततेसंबंधी एक चौकशी केली. त्यापुढे जानेवारीत नाडर यांची साक्ष झाली. गाड्यांची रचना कशी सुधारता येईल, वाहनांची टक्कर झाल्यास उतारू जखमी किंवा ठार होऊ नयेत यासाठी काय करता येईल, यासंबंधी त्यांनी काही सूचना केल्या. अमेरिकन सिनेटच्या समितीपुढे त्यांची साक्ष झाली. मोटार कारखानदारांना काळजी वाटू लागली. जनरल मोटरचे तर एक खासगी गुप्तहेर नाडर यांच्या खासगी जीवनाची माहिती मिळविण्यासाठी त्यांच्यामागे सोडला. रस्त्यात पाठलाग केला. नाडर यांच्या मित्रांची भेटी घेतली. सिनेट हॉलमध्येसुद्धा त्यांचा पिच्छा सोडण्यात आला नाही. नाडरनी वाहनांपासून सुरक्षिततेसंबंधात जे कार्य केले त्यापेक्षा ते समसंभोगी आहेत का ज्यू आहेत, या गोष्टीची माहिती मिळविण्याकडेच हेरांचे अधिक लक्ष असल्याचे दिसले. आपला छळ करून आपणास बदनाम करण्यात येत आहे आरोप नाडरनी केला. जनरल मोटर्स कंपनीने प्रथम इन्कार केला पण नंतर दिलगिरी व्यक्त केली.

सुरक्षिततेसंबंधीच्या संशोधनासाठी सध्यापेक्षा दुप्पट म्हणजे एक कोट डॉलर खर्च करण्याचा कार्यक्रम अध्यक्ष जॉन्सन यांनी नुकताच जाहीर केला. म्हणजे दर वाहनामागे ११ सेंट असे या खर्चाचे प्रमाण आहे. अपघातांमुळे दरवर्षी एक हजार कोटी पौंड म्हणजे वाहनामागे १०० डॉलर नुकसानी होते.

## ☐ ब्रिटनमधील वर्णभेद

ब्रिटनमध्ये वर्णभेद किती तीव्र आणि कोणकोणत्या क्षेत्रांत आहे, याची पाहणी बेन–हूर येमिनी यांनी हाती घेतली असून विलसडेन (पूर्व) या भागातील चाचणी-पाहणीचे निष्कर्ष नुकतेच प्रसिद्ध केले आहेत. या भागात स्थायिक झालेल्या १५४ काळ्या लोकांकडे त्यांनी एक प्रश्नपत्रिका पाठविली. नोकरी, राहण्याची जागा, शिक्षण, विमा, सार्वजनिक ठिकाणे या क्षेत्रांत तुम्हांला कितपत भेदभावाने वागविले जाते यासंबंधी प्रश्न त्यात होते. नोकऱ्यांच्या बाबतीत असे दिसून आले की ९५ टक्के लोकांनी गोऱ्या मालकांकडे नोकरीसाठी अर्ज केले त्यांपैकी ३८ टक्के अर्जदारांना ते केवळ काळे म्हणून नोकरी नाकारण्यात आली, १३ टक्के लोकांना ते काळे म्हणून बडतर्फ करण्यात आले आणि १३ टक्के कृष्णवर्णीयांना नोकरी मिळाली पण बढती नाकारण्यात आली. पाहणीस निवडले त्यांपैकी ८० टक्के काळ्या लोकांनी गोऱ्या कामगारांबरोबर काम केले पण गोरे कामगार आपल्याशी समानतेने वागत नाहीत, अशी तक्रार त्यांपैकी १६ टक्के नोकरांनी केली. कारकून व सेक्रेटरीच्या जागांसाठी या पाहणीपैकी २ टक्के लोकांनी अर्ज केले पण त्या सर्वांना नकार मिळाला. कमी पगारावर जास्त काम करावे एवढेच नव्हे तर नोकरीच्या कक्षेबाहेरची हलकी कामेही करावी अशी गोऱ्या मालकांची अपेक्षा असल्याची तक्रार काहींनी केली. काळा–गोरा भेद पाळू नये, असे कारखान्यांचे आणि कामगारसंघांचे धोरण असले तरी काळ्यांना कमी लेखण्याच्या वृत्तीचा पगडा गोऱ्या कामगारांवर असून काहींनी काळ्या कामगारांबरोबर काम करण्याचे नाकारले.

या पाहणीतील ३५ टक्के काळ्या लोकांनी गोऱ्या घरमालकांकडे जागेसाठी अर्ज केले, त्यांपैकी ८४ टक्के जणांना सरळ नकार मिळाला. सहा टक्के जणांना घर खरेदी करायलाही नकार देण्यात आला. नोकरी व घरांच्या बाबतीतील भेदभावाचा अनुभव विम्याच्या क्षेत्रांतही आला. मोटारीच्या विम्यांसाठी २४ टक्के काळ्यांनी अर्ज केले. त्यांना पॉलिसी मिळाली पण स्थानिक लोकांपेक्षा जादा प्रिमिअम आकारण्यात आला. सर्वच परदेशी नागरिकांना कंपन्या जादा प्रिमिअम आकारतात, हे खरे पण दहा वर्षांपेक्षा अधिक काळ ब्रिटनमध्ये स्थायिक झाल्यानंतरही काळ्यांना परदेशी मानले जाते, अशी तक्रार पाहणीतील एकाने केली.

सार्वजनिक उद्याने, नृत्यगृहे, उपाहारगृहे वगैरे ठिकाणीही काळ्यांना वर्णभेद सहन करावा लागतो. पाहणीतील अठ्ठावन्न टक्के लोकांनी उपाहारगृहांना भेट दिली त्यांपैकी १५ टक्के जणांना प्रवेश नाकारण्यात आला. अकरा टक्के काळ्यांनी नृत्यगृहांना भेट दिली पण त्यांपैकी २० टक्के जणांना प्रवेश नाकारण्यात आला.

शिक्षणाच्या क्षेत्रात मात्र वर्णभेद फारसा नाही. पाहणीतील ४३ टक्के काळ्या लोकांनी शिक्षणसंस्थांत प्रवेशासाठी शैक्षणिक अधिकाऱ्यांची भेट घेतली पण आपणांस भेदभावाची वागणूक मिळाल्याची तक्रार त्यांपैकी कोणीही केली नाही. ●

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## □ भाड्याच्या किंकाळ्या

अस्मादिकांचे बालपण ज्या गल्लीत गेले, तेथे बरीच मारवाडी कुटुंबे होत त्यांपैकी एखाद्या घरात कुणीतरी दगावला की, आमचे टोळके गोट्या खेळाय थांबवून एका दृश्याकडे नेहमी डोके खाजवीत बघायचे, ते दृश्य म्हणजे भाड्या रडायला येणाऱ्या बायकांचा आक्रोश. तीर्थरूपांनी अनध्यायाबद्दल कान उमटल किंवा मातोश्रींनी " मला गीळ मेल्या ! " अशा प्रेमळ शब्दांत पाठीत धपाट घातला की स्वयंस्फूर्तीने रडायचे एवढेच त्या रम्य बालपणी माहीत होते, त्यामु " मोले घातले रडाया " हा प्रकार आमच्या बालबुद्धीला अखेरपर्यंत मर्मजला नाही. आता मोठे झाल्यावर वाटायला लागले होते, काय ही आमच्या देशातल वेडगळ पद्धत.

—पण नाही. ही पद्धत वेडगळ तर नाहीच, उलट इतकी डोकेबाज आहे, क थेट अमेरिकेनेही (जरा निराळ्या स्वरूपाने) ती उचलली आहे. नुकतेच वाचल की हॉलिवुडमधल्या सिनेमा कंपन्या सिनेमा काढताना कथानकात हिरॉइनव किंचाळण्याचा प्रसंग झाला तर तिच्या नाजुक घशाला ताण पडू नये म्हणू भाड्याने किंकाळणाऱ्या इतर बायका नोकरीला ठेवतात. रेडीमेडचा जमान म्हणतात तो हा !

आता भाड्याच्या किंकाळ्या आहेत तर भाड्याचे उसासे का नकोत ? भाड्याचे रडू आहे तर भाड्याचे हसू का नको ? उदाहरणार्थ, प्रेमकाव्य लिहि णाऱ्या मंडळीच्या नाजूक छातीला निःश्वासांची दगदग होऊं नये म्हणून त्यांनी भक्कम छातीचे पहिलवान उसासे सोडायच्या कामावर नेमले तर किती तरी किंचित्-कवींचे आयुष्य वाढेल. आणि उसने हसू तर अक्षरशः पावलोपावली लागते, त्याच्याऐवजी भाड्याचे हसू वापरले तर उसनवारीचा मिंधेपणाही पत्क रावा लागणार नाही. चांगले दहा रुपये आपल्याकडून उसने घेऊन दोन दोन महिने नाव गोष्ट न काढणारी वल्ली समोर भेटली—आणा तोंडावर हसू. नुकतीच ड्रायक्लीन करून आणलेली टेरिलीनची पॅंट आपल्याला न विचारता घालून बायकोचा भाऊ इम्प्रेशन मारायला गेला—आण तोंडावर हसू इतकेच काय पण मैत्रिणींशी ओळख

करून देताना "आमचे हे किनई बायकांना भारीच बाई बुजतात !" अशा शब्दांत प्रत्यक्ष हिने आपल्या आदर्श सभ्यतेची संभावना केली—आणा तोंडावर हसू, या व अशा अनेक दुःखद प्रसंगी कोणी भाड्याचे हुकमी हसू पुरवायला तयार असेल तर आपण वाटेल तो रेट द्यायला तयार आहोत.

## ☐ ॲब्स्ट्रॅक्ट चिंपाझी

माणसाची उत्क्रांती माकडापासून झाली असावी असा दाट संशय डार्विनपासून बऱ्याच शास्त्रज्ञांनी आतापर्यंत दाखवलेला आहे. साध्या सरळ माणसाचा कालांतराने नवकवी झाला तेव्हा माझ्याही मनात हीच शंका बळावली. पुढे तो न-नाटककार झाला तेव्हा तर माझी जवळजवळ खात्रीच पटली.—अन् आता उरला सुरलेला पुरावा हाती लागला आहे. लंडन झूमधल्या एका चिंपाझी माकडाने काही ॲब्स्ट्रॅक्ट चित्रे काढली आहेत ती पाहून त्या अत्याधुनिक मानवनगरीतल्या तमाम जाणत्या टीकाकारांनी त्या माकडाला डोक्यावर घेतले आहे, असे परवा वर्तमानपत्रांत वाचले. म्हणजे कवी आणि कपी यांच्यांत मामुली भेद तरी आहे, पण चित्रकार अन् चिंपाझी यांच्यांत तेवढाही नाही, हे सप्रमाण सिद्ध झाले म्हणायचे.

आता माकडचेष्टेतून नवचित्रकला उत्क्रांत झाली की नवचित्रातून माकडचेष्टा सुरू झाली हा एक संशोधनाचा विषय होऊ शकेल. पण अशा संशोधनातून काहीही निष्पन्न झाले तरी आधीच मर्कट तशातही चित्रकार झाला म्हणजे माकडाचा माणूस व्हायला वेळ लागत नाही असे दिसते.

प्रस्तुत चिंपाझीच्या चित्रात टीकाकारांना नक्की काय दिसले असावे याचा नुसता तर्क करण्याचेही धाडस करीत नाही; कारण अमेरिकेत एकदा ॲब्स्ट्रॅक्ट चित्रकलेचे प्रदर्शन पाहायला गेलो—आणि एका मित्राने सतत दोन दिवस नाकाशी कांदा धरल्यामुळेच शुद्धीवर आलो हे अजून विसरलो नाही. त्या चित्रात टीकाकार माणसांना जे समजले ते प्रत्यक्ष चित्रकार चिंपाझीला तरी समजले का हेही न विचारलेलेच बरे. कारण पाहणाऱ्याला समजते ती चित्रकला नाही, अन् काढणाऱ्याला समजते ती नवचित्रकला नाही. ते काही असले तरी प्रसिद्धीच्या शिखरावर पोचलेले हे चित्रकार—माकड आता समृद्धीत लोळणार यात शंका नाही. आता ते दररोज वसईची केळी अन् कोवळ्या भुइमुगाच्या मेजवान्या झोडणार आणि दर वर्षी नवीन मॉडेलचे झाड घेणार. फावल्या वेळात ते एक नवीन सिद्धांत मांडणार— 'मानवाच्या कल्याणासाठी माकडाच्याच हाती कोलीत किंवा कुंचला दिला पाहिजे.'

• • •

# १ : मेरा साया

रहस्यमय हिन्दी चित्रपट म्हणजे खून, मारामाऱ्या, नाईट क्लब्स यांची रेलचेल, असा समज असला तरी 'मेरा साया' हा चित्रपट त्याला बऱ्याच अंशी अपवाद आहे. चांगल्या प्रादेशिक चित्रपटांची कथा हिन्दीसाठी निवडून मूळ कथेचे वाटोळे करण्यात हिन्दी चित्रपटांचे पटकथा लेखक फार कुशल असतात. परंतु 'पाठलाग' वरून तयार केलेल्या 'मेरा साया'च्या पटकथेमध्ये श्री. ग. रा. कामत यांनी बराच प्रामाणिकपणा दाखवला आहे.

हिन्दी चित्रपटाचा श्रीमंती दर्जा येण्यासाठी 'पाठलाग'मधील साध्या वकिलाच्या जागी उदेपूरच्या श्रीमंत घराण्यातील ठाकूर निर्माण करण्यात आला आहे. या बदलाचा उपयोग घरातील संपन्न वातावरण दाखवण्यासाठी व उदेपूरच्या परिसरातील निसर्गसौंदर्य टिपण्यासाठी करण्यात आला आहे व म्हणूनच तो योग्य वाटतो.

स्वतःच्या हातानेच जिच्यावर अग्निसंस्कार केले ती पत्नी जिवंत होऊन परत येते व पति-पत्नींनाच माहीत असणाऱ्या अनेक घटना खुलासेवार सांगते. हा कथानकाचा मुख्य दुवा, अत्यंत रहस्यमय व सामान्य प्रेक्षकाला तीन तास न कंटाळता बसवण्याइतका प्रभावी आहे व तो चित्रीत करताना दिग्दर्शक 'राज खोसला' यांनी निवडलेले अनेक प्रसंग फार योग्य व परिणामकारक आहेत. ठाकूर व गीता यांच्यामधील, गीता आपल्या पतिराजांना उठवायला जाते हे प्रेमदृश्य तर अप्रतीम आहे.

एवढे असूनसुद्धा 'पाठलाग' मध्ये इतर अनावश्यक गोष्टी न दाखवण्याचा जो संयम दिग्दर्शकांनी दाखवला तो राज खोसला यांचा काही ठिकाणी सुटलेला आढळतो. उदाहरणच द्यायचे तर—धुमाळ व मुक्री यांच्या सामान्य विनोदी प्रसंगांवर विनाकारणच फिल्म वाया घालवली आहे. मोलकरणीला दिलेले फाजिल महत्त्व प्रेक्षकांची दिशाभूल करून जाते.

पण वरील दोष वगळता चित्रपट खरोखरच प्रेक्षणीय आहे. सुनिलदत्त व साधना यांनी आपल्या भूमिका आपल्या परीने जिवंत करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. तरीसुद्धा 'पाठलाग' मधील विनाकारण आरडाओरड न करणारा काशीनाथ घाणेकर व सहज काम करून जाणारी 'भावना'च प्रेक्षकांना अधिक आवडण्याची शक्यता आहे. चित्रपटाची अन्य तांत्रिक अंगे

समाधानकारक आहेत. चित्रपटातील दोन गीते "मेरा साया साथ देगा" "बरेलीके बाजारमें झुमका गिरा रे" ही बरी आहेत.

काही शंका :—केवळ पतिपत्नींनाच ठाऊक असणाऱ्या गोष्टी दोन तास कोर्टात ओरडून सांगणाऱ्या व अनेक पुरावे देणाऱ्या गीतेवर विश्वास न ठेवणारा वकील दरोडेखोरानें सांगितल्यावर विश्वास कसा ठेवतो ? दरोडेखोराचे कथन पूर्वनियोजित आहे, असे त्याला का वाटत नाही ? गीताच्या डायरीबद्दल शंका निर्माण झाल्यावर तिचे हस्ताक्षर का घेत नाही ?

कथेतील हे दोष चित्रपट पाहत असताना नाही, तर फार विचार केल्यावर सापडतात व म्हणूनच राज खोसला हे फार चांगले दिग्दर्शक आहेत, असे म्हणायला हरकत नाही.

—शरद गोखले

## २ : ॲन्ड माईल्स टू गो...

पडद्यावर प्रथम दिसतो नुसता अंधार व मग हळूहळू प्रकाशित होणारा सूर्य ! त्यानंतर कॅमेरा स्थिर होतो काही माणसांवर. माणसांचे लक्ष सूर्यावर! नवीन दिवस सुरू होणार म्हणून काळजीने डवरलेले चेहरे !

कॅमेरा झर्‌दिशी फिरतो व आपणांस एका बंगल्यात नेतो. बंगल्यात एक 'साहेब' व एक 'मड्डम' झोपलेली असते. प्रथम साहेब उठतो व पलंगापाशी असलेली बेल वाजवून 'बेअरा' ला बोलावितो. चहा येतो. साहेब मडमेकडे बघतो. ती अजून साखरझोपेतच असते. त्याचक्षणी कॅमेरा आपणांस एका झोपडपट्टीत नेऊन पोचवितो. तिथे कुणीतरी भुकेल्यापोटी बसल्या बसल्या झोपेचा प्रयत्न करीत असतो. झोपेची नाहीतरी त्याला आवश्यकता असते.

इतक्यात आपण पुन्हा एका बंगल्यात येतो. एक स्त्री मोठ्या बिलोरी आरशापुढे बसून आपले सौंदर्य खुलवीत असते तर इथे कुठल्याशा झोपडीत एक गरीब स्त्री एका फुटलेल्या आरशासमोर डोक्यावर असलेल्या वीतभर केसांवर तुटलेला कंगवा फिरवीत असते. तिथेच कुठेतरी रॉकेलसाठी मैल-दीड मैल लांबीची 'लाईन' लागलेली असते. कुठेतरी पाण्यासाठी भांडणे चाललेली असतात. कुठेतरी गटारातील पाण्यातच कुणीतरी भांडी धूत असतो, तर कुठल्यातरी बंगल्यात ह्याचवेळी नाचण्याला ऊत आलेला असतो. लोक आनंदात नाचत असतानाच दूर एकजण आपल्या टीचभर पोटासाठी अंगावर वेताने मारून घेत असतो. जमलेली माणसे भयोत्सुक नजरेने ते न्याहाळीत असतात.

आणि आपला कॅमेरा कधी बंगल्यात तर कधी झोपडपट्टीवर फिरतच राहतो. अन् अचानक निवेदन सुरू होते. चित्रपटाइतकंच महत्त्वाचं! निवेदक सांगतो, "आपण सारी माणसं आहोत." आपल्याला तेवढ्यात दिसतं ते हुतात्मा स्मारक! त्या स्मारकापाशी पोलिसांनी केलेलं कडं व लोकांचा काहीतरी मागण्यासाठी जमलेला जमाव. निवेदक सांगतो, "दोघंही माणसंच! एक पोलीस तर दुसरा जमाव. पण त्या वेळेस ते वैरी असतात. पोलीस वरून आलेल्या आज्ञा पाळतात व पोटामुळे जमाव ओरडत असतो, "आम्हांला अन्न द्या, पाणी द्या, आसरा द्या!" निवेदक सांगतो, "आम्हांला अन्याय नको श्रीमंतांबद्दल आमच्या मनात आकस नाही. परंतु श्रीमंत अधिक श्रीमंत व गरीब अधिक गरीब होता कामा नये एवढ्याचसाठी हा झगडा. पण न्याय मागताना हिंसक कृत्ये करू नका!" मोर्चातला कुणीतरी रस्त्यावरचा दिवा फोडतो. त्याला उद्देशून निवेदक म्हणतो, "अशानं आपलंच नुकसान होतं. ही सर्व आपली संपत्ती आहे." कुठेतरी एक पुतळा दोन हात फैलावून उभा असतो अन् चित्रपट संपतो!—एक हुरहूर मागे ठेवून!

हल्ली फिल्म्स् डिव्हिजनतर्फे हा अनुबोधपट दाखविण्यात येतो. एस्. सुखदेवनं हा चित्रपट निर्माण केला आहे. एस्. सुखदेव हा एक गुणी कलावंत आहे ह्या माहितीपटातील फोटोग्राफी व संकलन उत्कृष्ट आहे. गरीब व श्रीमंत ह्यांमधील भेदभाव दाखविताना केलेली कॅमेऱ्याची हालचाल उद्बोधक ठरते. असा गुणी कलावंत आज साबणाच्या जाहिरातीचे चित्रपट करीत खितपत पडावा ना! अशा माणसाला सरकारने आर्थिक पाठबळ देऊन चित्रपट काढण्यास मदत केली पाहिजे. सुखदेवांच्या गुणांचे चीज व्हायला हवे.

## ३ : गाईड

"गाईडची निर्मिती हा माझ्या आयुष्यातील एक अपूर्व अनुभव आहे," असे देवआनंदने हल्लीच एके ठिकाणी म्हटले आहे.

—त्याचा हा अनुभव प्रेक्षकांना पण देवच्या बाबतीत आलेला निराळाच अनुभव आहे. देवआनंद म्हणजे प्रणयाचा बादशहा. हलक्या फुलक्या विनोदी चित्रपटांनी प्रेक्षकांची करमणूक करणारा! पण गाईड मधील देवआनंद निराळाच वाटतो. आपल्या अभिनयाचा निराळाच पैलू तो प्रेक्षकांना दाखवितो.

'गाईड'च्या हिंदी आवृत्तीपेक्षा इंग्रजी आवृत्ती निश्चितच श्रेष्ठ ठरेल. हिंदी आवृत्तीत प्रेक्षकांची नाडी ओळखून अनेक ठिकाणी नृत्यांची व गाण्यांची

रेलचेल केलेली आहे. पण त्यामुळे काही ठिकाणी चित्रपट उगाचच रेंगाळतो. बावीस रिळांचा एवढा भव्य चित्रपट काढण्याऐवजी देवआनंदने बारा रिळांचा सुटसुटीत चित्रपट काढला असता तर दर्दी प्रेक्षकांना तो खचितच आवडला असता.

के. नारायण ह्यांचा 'गाईड' ह्या कादंबरीशी पटकथेनं प्रामाणिकपणा-राखल्यानं चित्रपटाची उंची खचितच वाढली आहे.

राजू नावाचा एक गाईड व जिला जिच्या पतीनं सोडलं आहे अशी रोझी. रोझीला राजू आधार देतो. नृत्याचं तिचं वेड पाहून तिच्यासाठी एक निराळंच विश्व निर्माण करतो. तिला प्रसिद्धी देतो. सर्व ठिकाणी तिचे नृत्याचे कार्यक्रम रंगतात व ती राजूपासून दूर जाते. तिच्यासाठी तो एका ड्राफ्टवर खोटी सही करतो व त्याला तुरुंगवास मिळतो. तुरुंगातून सुटल्यानंतर तो जीवनापासून पळण्याचा प्रयत्न करताना एका गावच्या भोला नामक माणसाला तो साधू आहे असा भास होतो; व नंतर सर्व गावकरी त्याला साधू मानतात. शेवटी दुष्काळापासून गावाला वाचविण्यासाठी तो उपोषण आरंभतो व त्यातच त्याचा अंत होतो.

विजय आनंदने पटकथा व संवाद लेखनाची कामगिरी उत्कृष्ट बजाविली आहे. श्री. राम येडेकर यांचे कला-दिग्दर्शन चित्रपटाला पोषक असं आहे. फली मिस्त्रींच्या फोटोग्राफीनं चित्रपटाला रंग भरलाय्. वहिदा रेहमानची नृत्ये मनाला मोहवितात. देव आनंदने साकार केलेला राजू दीर्घकाळ मनात राहील. इतर भूमिकांत लीला चिटणीस, जागिरदार, किशोर साहू, अन्वर हुसेन वगैरे आपापली भूमिका समजून करतात. राहूलदेव वर्मनने दिलेलं पार्श्वसंगीत बहारदार आहे. 'गाता रहे मेरा दिल,' 'तू ती न आये तेरी याद सताये', 'आज फिर जिनेका इरादा है' वगैरे शैलेंद्रानं लिहिलेल्या गीताना एस्. डो. बर्मनने न्याय दिला आहे.

विजय आनंद दिग्दर्शनात नाव कमावेल अशी आशा करण्यास काहीच हरकत नाही एवढं उत्कृष्ट दिग्मर्शन त्यांनी केले आहे.

—अभय नाडकर्णी



विदेशी चित्रपट

# पीटर ओ'टूल

नवा नट म्हणजे काय चीज असते ते हिंदी सिनेमाच्या प्रेक्षकाला तरी सांगायला नको. तो भकास निर्विकारी चेहरा, परबचा म्हणल्यासारखे वाटणारे ते संवाद, अत्यंत कृत्रिम हालचाली म्हणजे नवा नट अशी मुळी व्याख्याच होऊन बसली आहे. इंग्रजी चित्रपटांत मात्र नवा कोरा नटदेखील जुन्याच्या खांद्याला खांदा लावून उभा राहिलेला आपण नेहमी पाहतो पण आपल्या पहिल्यावहिल्या भूमिकेने 'ऑस्कर' पटविणाऱ्या, दुसऱ्या भूमिकेबद्दल 'नॉमिनेशन' मिळविणाऱ्या व तिसरी भूमिका इंग्लंडच्या राणीने आवर्जून पाहावी इतकी सुरेख वठविणाऱ्या 'नव्या' नटाबद्दल काय बोलावे.

त्या तरुण आयरिश नटाचे नाव आहे पीटर ओ'टूल! शॉन कॉनरी (जेम्स बाँड) प्रमाणेच पिटर ओ'टूलने प्रथम पदार्पणात हॉलिवुड जिंकून घेतले. लॉरेन्स ऑफ अरेबिया या अतिभव्य ७० मि. मी. चित्रपटातील मध्यवर्ती भूमिकेबद्दल तो 'ऑस्कर अॅवॉर्ड' घेऊन गेला. त्याच्या ह्या अपूर्व पराक्रमाने हॉलीवुड थक्क झाले. काहींना मात्र तो 'फ्लूक' वाटला. पण पीटरच्या दुसऱ्या चित्रपटाने इतिहास घडविला. 'बेकेट' मधील दुसऱ्या हेन्रीची त्याची भूमिका अमर ठरली. त्याला लागोपाठ दुसऱ्यांदा 'ऑस्कर नॉमिनेशन मिळाले. त्या वर्षी परितोषिक 'माय फअर लेडी' मधील प्रोफेसर 'हिगिन्सच्या भूमिकेबद्दल रेक्स हॅरिसनकडे गेले. पण अनेक जाणकारांच्या मते तो मान पीटर ओ'टूलला मिळायला हवा होता. आणि असात्र भारतात प्रकाशित न झालेला त्याचा तिसरा चित्रपट 'लॉर्ड जिम्' सध्या इंग्लड गाजवीत आहे. इंग्लंडच्या राणीनेदेखील त्याचे कौतुक केले.

एक निळेशार भावपूर्ण डोळे सोडले तर पाहताक्षणी नजरेत भरण्याजोगे ओ'टूलमध्ये काहीही नाही. देखण्या नटांत त्याची गणना होणार नाही. कॅरी ग्रँट, रॉक हडसन किंवा ग्रेगरी पेक यांच्यासारखी रूपाची देणगी त्याला लाभलेली नाही. कर्क डग्लस, मार्लन ब्रँडो किंवा जॉन वेनसारखी दणदणीत शरीरयष्टी त्याला देवाने दिलेली नाही. मध्यम उंचीचा, सडपातळ, धारदार नाकाचा पीटर ओ'टूल हॉलिवुडच्या श्रेष्ठ नटांच्या मालिकेत काहीसा विजोडच दिसेल. अत्यंत बोलके, भावदर्शी डोळे व कमावलेला आवाज ही त्याची वैशिष्टचे आहेत. कित्येकदा केवळ डोळ्यांच्या साहाय्याने तो भाव दर्शवितो. आवाजावरील बिलक्षण

हुकूमत ही मात्र रंगभूमीची देणगी असावी. आपल्या धारदार, लवचिक अवाजात संवादाची सफाईदार फेक करीत तो हां हां म्हणता प्रेक्षकांची मने जिंकतो. त्याच्या आवाजातील चढउतार मोठे मार्मिक व परिणामकारक असतात. गळ्याच्या शिरा ताणून तो जेव्हा टिपेला आवाज नेतो तेव्हा वाटते की मूर्तिमंत अभिनय-कलाच त्याच्या रूपाने उभी ठाकलीय.

'लॉरेन्स ऑफ अरेबिया' मधील भूमिकेसाठी दिग्दर्शक डेव्हिड लीन यांनी जेव्हा त्याला पाचारण केले, तेव्हा तो उद्गारला, "मला काही संवाद दिले आहेत का?" लॉरेन्सची मध्यवर्ती भूमिका त्याला दिली जाणार असल्याचे त्याला कळले, तेव्हा तो हाबकलाच. अलेक गिनीस, अँथनी क्विन, जॅक हॉकिन्स, ज्योस फेरर व अँथनी क्वेल यांसारख्या मुरलेल्या नटांबरोबर काम करावयाचे म्हणजे एक जबरदस्त आव्हान होते. पीटरने ते स्वीकारले. लॉरेन्स ही इंग्लंडच्या इतिहासातील एक अमर व्यक्ती होय. पहिल्या महायुद्धातील त्याच्या पराक्रमाच्या कथा अद्याप सांगितल्या जातात. शूर योद्धा व तत्त्वज्ञ, असा हा लॉरेन्स पहिल्या महायुद्धात अभूतपूर्व पराक्रम गाजवून गेला. तुर्की लोकांच्या मदतीने जर्मनी अरबस्तान घशात घालण्याच्या प्रयत्नात असतो. अरबस्तान—विशेषत: सुवेझचा कालवा—शत्रूच्या हाती पडू देण्यास अर्थातच इंग्लंड तयार नसते. अशा वेळेला दुबळ्या अरब राष्ट्राला मदत करून शत्रूचा नि:पात करण्याची कामगिरी तरुण लॉरेन्सवर सोपविली जाते. राजकारणातील डावपेचांची माहिती नसलेला सरळ मनाचा लॉरेन्स पराक्रमाची शर्थ करतो. अरबांच्या टोळयातील भांडणे मिटवितो. त्यांची अगणित दु:खे पाहून हेलावून जातो. त्यांचं राज्य त्यांना मिळवून देण्याची प्रतिज्ञा करतो. अशिक्षित, माथेफिरू, संशयी अरबांचा विश्वास संपादन करतो. ते त्याला देवदूत मानतात. पण शेवटी त्याला कळते की जर्मनांच्या घशातून ओढून काढलेल्या अरबांच्या जन्मभूमीवर खुद्द इंग्लंडचा डोळा आहे. अरबांना स्वातंत्र्य मिळवून देण्याचे त्याचे स्वप्न हवेत विरते. तो निराश होतो. पार खचून जातो. ज्यांनी विश्वासाने आपल्या खांद्यावर माना टाकल्या त्यांचा आपण विश्वासघात केला ही भावना त्याला पोखरते. इकडे त्याला एकामागून एक बढत्या मिळतात. पदके मिळतात. लेफ्टनंटचा तो कर्नल होतो पण हळव्या मनाचा लॉरेन्स कायमचा निराश होतो. सत्तेसाठी चाललेली ही सुंदोपसुंदी त्याला नकोशी होते. निराश होऊन तो परत फिरतो. लॉरेन्सची भूमिका ओ'टूलने सुरेख वठविली. खूप परिश्रम घेऊन वठविली. त्यासाठी लॉरेन्सवर लिहिला गेलेला शब्द न् शब्द त्याने वाचून काढला होता.

## बेकेट–हेन्री : जुगलबंदी

लॉरेन्सची भूमिका ओ'टूलने जिवंत वठविली त्याबद्दल त्याला ऑस्कर मिळाले.

सारं कबूल ! पण पीटर ओ'टूलचे नांव कायमचे निगडित झालंय ते 'बेकेट'शी. बेकेटमधील दुसऱ्या हेन्रीच्या रूपात पीटरला पाहिल्यानंतर त्याचा दुसरा कोणताही चित्रपट न पाहण्याचा निर्णय माझ्या एका मित्राने घेतला. दुसऱ्या हेन्रीची भूमिका ओ'टूल करीत नाही; तर तो ती जगतो. पीटर ओ'टूल म्हणजे दुसरा हेन्री व दुसरा हेन्री म्हणजे पीटर ओ'टूल ! धर्मसत्ता श्रेष्ठ की राजसत्ता श्रेष्ठ ? खरा-सत्ताधीश कोण–पोप की राजा ? हा पंधराव्या शतकात इंग्लंडमधे विकोपाला गेलेला ज्वलंत प्रश्न हा 'बेकेट' चा आत्मा आहे. राजसत्ता श्रेष्ठ मानणारा दुसर हेन्री व धर्मसत्तेसाठी प्राणपणाने झगडणारा दुसऱ्या हेन्रीचा एकेकाळचा जिवलग मित्र बेकेट यांच्यांतील संघर्ष हा चित्रपटाचा विषय आहे. आपल्या अत्यंत प्रभावशाली अभिनयाने ओ'टूल बेकेटचे काम करणाऱ्या रिचर्ड बर्टनसारख्या जातिवंत नटाला फिका पाडतो. ओ'टूल आणि बर्टनची ती अभिनयाची जुगलबंदी पाहताना भान हरपून जाते. तापट, हट्टी, बालिश, विनोदी, भाबडा आणि हळवा हेन्री ओ'टूल उभा करतो. सरदार, बायकामुले या साऱ्यांच्या मेळाव्यात असूनदेखील एकाकी असणारा, मित्रावर जिवापाड प्रेम करणारा आपला जिवलग मित्र आपल्याविरुद्ध गेलाय हे कळल्यावर पिसाळणारा–पण त्याचबरोबर मित्राचे भले चिंतणारा दुसरा हेन्री ओ'टूलने पडद्यावर अमर केलाय त्याची स्पष्टोक्ती अनेकदा प्रेक्षकाला पटते, आवडते. त्याचा भाबडा, हळवा स्वभाव मनात घर करतो. कित्येकदा तो चुकतोय हे कळते त्याचा हट्ट जाणवतो पण त्याचा राग येत नाही. कीवच येते. मरताना शेवटी बेकेट म्हणतो अगदी तीच प्रेक्षकांची भावना असते–"बिचारा हेन्री."

पीटर ओ'टूल तसा अबोल व प्रसिद्धीच्या झगमगाटापासून दूर राहणारा आहे. ऑस्कर स्वीकारण्यासाठी तो हॉलिवुडला आला, तेव्हा त्याच्यासाठी एक खास जंगी पार्टी आयोजित करण्यात आली होती. थाटमाट, श्रीमंती आणि भपका यांनी ओ'टूलला जिंकून घेण्याचा हॉलिवुडचा प्रयत्न सपशेल फसला. ओ'टूल मुळी पार्टीसाठी थांबलाच नाही. वेळ नसल्याचे सांगून त्याने चक्क पळ काढला. त्याची काही 'फॅंडस्' नाहीत की 'प्रकरणं' नाहीत. शर्ले मॅक्लीन त्याची आवडती नटी आहे, हे देखील त्याने मोठ्या नाखुशीने व लाजत लाजत सांगितले. अर्थात शर्लेला कोण आनंद झाला !

ओ'टूलला आपल्या चित्रपटातून चमकविण्याची निर्मात्यात चढाओढ लागली आहे. ओ'टूलने मात्र दोनच कामे स्वीकारली आहेत. आजवरच्या त्याच्या भूमिकांहून सर्वस्वी वेगळ्या अशा विनोदी भूमिका तो या चित्रपटांतून करीत आहे. 'व्हेअर इज् माय पुसी कॅट' जवळजवळ पूर्ण होत आला आहे. 'रोमन हॉलीडे'चा निर्माता ऑड्री हेप्बर्न व पीटर ओ'टूल ही जोडी घेऊन 'हाऊ टु स्टील अ मिलिअन डॉलर्स अँड लीव्ह हॅपिली एव्हरआफ्टर' या लांबलचक नावाचा विनोदी चित्रपट निर्माण करीत आहे.

**– शिरीष कणेकर**

साप्ताहिक

# माणूस

किमत चाळीस पैसे फक्त

पहिला अंक : १५ ऑगस्ट १९६६

या अंकापासून....

चीनमधील लाल क्रांतीचे महाभारत सांगणारी
माओच्या उदयास्ताची समग्र कथा कथन करणारी–


## 'आणि ड्रॅगन जागा झाला'

ही नवी, कोरी, प्रदीर्घ आणि रसरशीत लेखमाला
सुरू होत आहे.

वाचकांनी या पहिल्याच अंकापासून
स्थानिक विक्रेत्यांकडे आपली मागणी नोंदवून ठेवावी.
विक्रेत्यांनी २५ टक्के कमिशन वजा करून रोख रकमेसहित
१ ऑगस्टपूर्वी आपली मागणी पाठवावी.
व्ही. पी. पद्धत नाही.

**माणूस कार्यालय**
४१९, नारायण, पुणे २.

MANOOS (Fortnightly): 1–15 July 66 : 40 Paise : Regd. No. M H–649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर